म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का० वा०
दा. क्र. ३३८९.

# महाराष्ट्र शारदेचे मानकरी

ह. भा. वाघोलीकर

IRBK-0103391

विद्याशाळा प्रकाशन, पुणे

G10 Sh0
3329.

373. 29/20

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

महाराष्ट्र शारदेचे : भाग

# मानकरी १

[ महाराष्ट्र शारदेच्या सेवेंत ज्यांनीं मानाचें स्थान मिळविलें अशा थोर साहित्यिकांचा अल्प परिचय ]

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
दा. क्र. ३३६७ नों. दि.
वि. ............ क्र. ..............

लेखक

ह. भा. वाघोलीकर बी. ए. (ऑनर्स)

प्रस्तावना

डॉ. के. ना. वाटवे, एम्. ए. पीएच्. डी.

IRBK-0103391

IRBK-0103391

★ चित्रशाळा प्रकाशन, पुणें-२ ★

मुद्रक व प्रकाशक
दा. त्र्यं. जोशी, बी. ए. (टिळक),
चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ,
पुणे २.

किंमत दीड रुपया

: प्रथमावृत्ति :
आक्टोबर १९५०

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्र. 2९८०७
वा. वा.
2070
3-3-67

# ‘ मानकऱ्यां’ची ललकारणी

माझे शिष्य–मित्र आणि मराठींतील एक उदयोन्मुख व्यासंगी लेखक श्री. ह. भा. वाघोलीकर यांच्या ‘महाराष्ट्र शारदेचे मानकरी’ भाग १ ला या चरित्रात्मक ग्रंथाची ओळख मराठी वाचकांस करून देतांना मला आनंद वाटतो. सदर ग्रंथांत बाराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत ज्या लहानथोर कवींनीं मराठी भाषेचें व तिच्या द्वारा महाराष्ट्राचें वैचारिक वैभव वाढविलें त्यांपैकीं प्रमुख व्यक्तींचा धावता परिचय करून दिलेला आहे. हा परिचय करून देण्यांत रा. वाघोलीकरांची भूमिका संशोधकाची, भाषाशास्त्रज्ञाची, तत्त्वज्ञानविवरण-काराची किंवा काव्यसौंदर्यमीमांसकाचीहि नाहीं. सर्वसामान्य वाचकांना वरील कवींची स्थूलपणें व सुबोध पद्धतीनें प्राथमिक ओळख करून देणें हें माफक धोरण ग्रंथकारानें येथें पत्करलें आहे. त्यामुळें कवींच्या कालाबद्दलचे वाद, त्यांच्या तत्त्वज्ञानासंबंधीं चर्चा, त्यांच्या वाङ्मयीन, सामाजिक वा राजकीय कामगिरीचें मूल्यमापन अशासारख्या विषयांत शिरण्याची महत्त्वाकांक्षी दृष्टि हा ग्रंथ लिहितांना त्यांनीं ठेवलेली नाहीं. याबाबत आजवर झालेल्या विवेचनाचा मागोवा घेतच आपल्या चरित्रनायकांचें स्थूल व्यक्तिदर्शन ग्रंथकारानें येथें केलें आहे. त्यामुळें या ग्रंथाचें स्वरूप त्याच्या उद्देशास व नजरेसमोर धरलेल्या वाचकवर्गाच्या अपेक्षेस अगदीं साजेसें आहे.

मुकुंदराजापासून प्रभाकरशाहीरापर्यंतच्या साडेसहाशें वर्षांच्या दीर्घकालांत झालेले सर्वच मराठी कवी महाराष्ट्र शारदेचे मानकरी होण्यास आपापल्या

परींनीं पात्र असले तरी त्यांच्यामध्यें तारतम्य हें आहेच. त्याचें थोडें दिग्दर्शन येथें करणें अवश्य आहे. या चरित्र-ग्रंथांत आलेल्या एकोणीस कवींपैकीं कांहीं संतकवी, कांहीं पंडितकवी ( किंवा आख्यानकवी आणि कलाकवी ) व कांहीं शाहीर आहेत. मुकुंदराज, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम व रामदास हे संतकवी; दासोपंत, मुक्तेश्वर, वामनपंडित, रघुनाथ पंडित, निरंजनमाधव, महिपति आणि मोरोपंत हे पंडितकवी, आख्यान–चरित्र–कवी किंवा कलाकवी होत व उरलेले रामजोशी, अनंतफंदी आणि प्रभाकर हे शाहीर आहेत. यांत श्रीचक्रधर हे महानुभावपंथाचे प्रवर्तक असून महदंबा व जनाबाई या दोन कवयित्री आहेत. श्रीचक्रधरांनीं प्रत्यक्ष अशी ग्रंथरचना केली नसली तरी त्यांच्या तोंडचीं वचनेंच पुढें सिद्धान्तरूप झालीं. महदंबा व जनाबाई यांची भक्तिपर कविता कांहींशी आख्यान-काव्यांत मोडणारी व कांहीं संतकाव्याच्या वळणाची आहे. वरील एकोणीस कवी निवडण्यांत त्या कालखंडांतील झाडून साऱ्यांची संपूर्ण नोंद करण्याचा लेखकाचा हेतु नसून त्या त्या वर्गाच्या प्रमुख प्रतिनिधींचा परिचय वाचकांस करून देण्याचा आहे. त्यामुळेंच पंडितकवींपैकीं नागेश, विठ्ठल, सामराज, आख्यानकवींपैकीं श्रीधर, कवयित्रींपैकीं मुक्ताबाई, बहिणाबाई, वेणाबाई व अमृतराय, शिवदिनकेसरी, मध्वमुनि इत्यादि कटाव व पदें कौशल्यानें रचणारे कवी या परिचयग्रंथांत आलेले नाहींत. मीं त्यांची आठवण वाचकांस येथें करून दिली येवढेंच.

निवडलेले कवी ज्या वर्गाचे प्रतिनिधी आहेत असें मीं वर म्हटलें त्यांची थोडी ओळख आतां करून देतों. एक चक्रधर स्वामी व महदंबा वगळल्यास ( कारण चक्रधर हे महानुभाव पंथाचे प्रवर्तक व महदंबा ही त्यांची शिष्या) बाकीचे सारे कवी भागवतमार्गी होते. त्यांच्यामध्यें उपास्य-दैवतांची भिन्नता किंवा पंथ वा संप्रदाय याविषयींचा किरकोळ फरक असला तरी ते सर्व परम भागवत होते. त्यांचा कविता लिहिण्याची भूमिका, दृष्टि व उद्देश थोडा वेगवेगळा असला तरी फुटीर झालेल्या, नागवलेल्या भांबा-

बलेल्या व निराश्रय झालेल्या महाराष्ट्रीय जनतेला एका व्यापक धर्माच्या, एका भाषेच्या व एकाच सांस्कृतिक अभिमानाच्या सूत्रांत गोवून तिला एकसंध, संपन्न, निर्भय, विश्रब्ध आणि सनाथ करणें हाच सर्वांचा मुख्य कटाक्ष होता. त्यांपैकीं ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ व तुकाराम हे तर भागवत धर्माच्या मंदिराचे चार मुख्य आधारस्तंभच. बहिणाबाईचा एक सुंदर अभंग येथें वाचकांना स्मरेल. त्यांत मंदिराचें हेंच रूपक थोड्या निराळ्या तपशिलानें दिलें आहे.

> संतकृपा झाली, इमारत फळा आली ।
> ज्ञानदेवें रचिला पाया, उभविलें देवालया ।
> नामा तयाचा किंकर, त्यानें केला हा विस्तार।
> जनार्दनी एकनाथ, स्तंभ दिला भागवत ।
> भजन करा सावकाश, तुका झालासे कळस ॥१॥

हे भागवतधर्माचे आधार संतकवी सर्वच्या सर्व मोठे साक्षात्कारी अध्यात्मिक अनुभवानें संपन्न, भूतीं भगवद्भाव मानणारे आणि म्हणूनच आडरानीं शिरणाऱ्या जनतेचा कळवळा बाळगणारे होते. ' बुडते जन ' त्यांच्या डोळ्यांना पाहवत नव्हतें म्हणून त्यांच्या उद्धारार्थ त्यांनीं कविता लिहिली. त्यांनीं वेद, उपनिषदें, गीता व भाष्यें इत्यादींमधील अध्यात्म मराठींत आणलें. मानवाचें अंतिम साध्य मिळवून देणारी गूढ ब्रह्मविद्या त्यांना महाराष्ट्रांतील बहुजनसमाजापुढें विशद करून मांडावयाची होती. ओव्या व अभंग या सोप्या व साध्या छंदांतून ती ते मांडीत होते. पण त्या चौघानांहि ( विशेषत: ज्ञानेश्वर व तुकाराम यांना ) कवित्वाचें देणें ईश्वरानें भरपूर दिलेलें असल्यामुळें त्यांची अध्यात्मपर रचना काव्यमय झाली. त्यांनीं काव्य लिहावयाचें या जाणिवेनें काव्य लिहिलें नाहीं. त्यांना कवित्वापेक्षां संतपणाची मातब्बरी विशेष वाटत होती. त्यांनीं मराठींत आणलेली ब्रह्मविद्या जरी संस्कृतांतली असली तरी प्रत्यक्ष स्वानुभवानें ते ती विद्या

प्रथम जगले व मग त्यांनीं ती उपदेशिली. त्यामुळें त्यांच्या उद्गारांना संस्कृताचें उच्छिष्ट, भाषांतर किंवा रूपान्तर न म्हणतां त्यांना उपनिषद्-विद्येचा नवा मराठी अवतार समजणें योग्य होय. त्यांनीं पुन्हां एकदां अध्यात्मिक समता—किंवा आजची भाषा वापरावयाची तर अध्यात्मिक लोकशाही—स्थापिली. वर्णाश्रमांतील जन्मजाततेचा पीळ—या बाबतींत तरी—सैल केला. जातिभेदाची तीव्रता कमी केली. ‘ कुळजातिवर्ण, हें अवघेंचि अकारण ’ या तत्त्वाचा पुकारा करून ब्राह्मणापासून अंत्यजापर्यंत सर्वांना सारखाच मुक्तिमार्ग खुला केला.संन्यास,याग, योग,व्रतें,तीर्थयात्रा,अनुष्ठानें, कष्ट,तप इत्यादि गोष्टींस आलेलें अवास्तव बाह्यतंत्रविषयक महत्त्व दूर करून खऱ्या अंतरींच्या भक्तिभावाची—तळमळीची—त्या ठिकाणीं स्थापना केली. आणि आपापले संसार करूनहि भगवद्भक्तीनें तरून जातां येतें हें लोकांस दाखविलें. याचा दृश्य परिणाम म्हणजे हिंदु, मुसलमान, माळी, सोनार, कुंभार, शिंपी, न्हावी, तेली, स्त्रिया, वाणी, चांभार, महार इत्यादि सर्व जातींतील लोक संत झाले.

न्यायमूर्ति रानडे यांनीं आपल्या ‘ मराठी सत्तेचा उत्कर्ष ’ या ग्रंथांत संतमंडळींच्या या कामगिरीचा केलेला गौरव अवश्य पाहण्यासारखा आहे. संतमंडळींचें हें काम अध्यात्मिक तळमळींतून झालें असलें तरी त्याचा उपयोग राजकीय संघटनेला, सामाजिक समतेला, व राष्ट्रैक्याला झाला. कारण अध्यात्मिक जागृति ही सर्व जीवितव्यवहारांच्या बुडाशीं असणारी आधारभूत वस्तु आहे. रामदास हे इतर सर्व बाबतींत संतमंडळींसारखेच होते. त्यांचा विशेष येवढाच कीं त्यांनीं आपली दृष्टि इतर संतांपेक्षां थोड्या अधिक प्रमाणांत व्यवहारावर, खऱ्याखुऱ्या राजकीय परिस्थितीवर व प्रत्यक्ष कृतीवर दिली. इतर संतांचें लक्ष मोक्षाकडे अधिक कलतें असलें तर रामदासांस धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चारी पुरुषार्थ हवे होते. त्यासाठीं त्यांनीं नुसत्या भजनापेक्षां यत्नावर भर दिला. रामचंद्र आणि हनुमान् या स्वामिभक्तांच्या जोडीची तेजस्वी वृत्ति फैलावली व लोकांच्या

प्रतिकारसामर्थ्यास उठाव दिला. संतकवींनीं आख्यानकविता लिहिली नाहीं. याला अपवाद नाथांचें 'अध्यात्मरामायण', 'रुक्मिणीस्वयंवर' वगैरे काव्यें आणि रामदासांचे 'युद्धकाण्ड' हें होय. पण नाथांनीं रामायणाकडे अध्यात्माच्या व रामदासांनीं त्याच ग्रंथाकडे आक्रमक तेजास्वितेच्या दृष्टीनें पाहिलें.

पंडितकवींचा जो दुसरा मोठा वर्ग आहे, त्याचें सर्वसामान्य धोरण संतांनीं आंखून दिलेलेंच होतें. त्यांचे साध्य तेंच पण साधन मात्र भिन्न होतें. बहुतेक पंडितकवी संतांप्रमाणें अध्यात्मानुभवी किंवा साक्षात्कारी नव्हते. ते साधक किंवा मुमुक्षूच होते. ते लोकांच्या उद्धारार्थ काव्य करीत नसून स्वतांच तरून जाण्यासाठीं काव्यरचनारूपी वाङ्मयीन सेवा करीत होते. त्यांनीं जाणिवेनें व संस्कृत साहित्य आणि साहित्यशास्त्र यांच्या व्यासंगानें आपलें काव्य रचलें.नवरसात्मक, अलंकारमंडित व विदग्ध अशी वृत्तबद्ध रचना त्यांनीं केली. त्यांच्या नजरेसमोर थोडा अधिक सुशिक्षित व प्रगल्भ मराठी वाचकवर्ग होता. अशा काव्याचा त्यांचा मुख्य आधार म्हणजे रामायण, भारत व भागवत हे तीन ग्रंथ. ह्या तीन ग्रंथांपैकीं भारतासारखे समग्र ग्रंथ किंवा त्यांतील निवडक आख्यानें त्यांनीं मराठींत मोठ्या डौलदार भाषेनें सजवून आणलीं. संतांनीं मराठींत संस्कृत अध्यात्मिक शाखा पल्लवित केली; तर पंडितकवींनीं संस्कृत साहित्यशाखेचा विस्तार केला.

सामान्य संसारी माणसाला एकदम वैराग्य–भक्ति–ज्ञानांचें जड रसायन पचत नाहीं. म्हणून रामकृष्णादि ईश्वरी अवतारांच्या मानवी लीला वर्णून त्या गोड नवरसात्मक वर्णनाच्या अनुपानासह तेंच रसायन त्यांना शेवटीं घ्यावयास लावणें हा पंडितकवींचा उद्देश होता. यासाठीं त्यांना सुरस आख्यानें लिहावीं लागलीं व काव्यकला जाणिवेनें वापरावीं लागली, म्हणून त्यांना आख्यानकवी किंवा कलाकवीहि म्हणतात. वामन पंडित 'रासक्रीडे-'

च्या वर्णनप्रसंगीं हाच हेतु सांगतात ‘ जो नेणें विषयाविणें रुचि तया आम्हां–तुम्हांकारणें । केला गोपवधूविलास–रस हा विख्यात नारायणें । ’

संतचरित्रलेखनाचा एक नवा पायंडा मराठीमध्यें मराठी कवींनीं पाडला. श्रीचक्रधरांचें ‘ लीळाचरित्र ’ हा त्याचा पहिला प्रयत्न. पण प्राकृतजनाभिमुख असलेल्या मराठीपूर्वीच्या प्राकृत भाषांतूनच ही प्रथा सुरू झाली होती. नामदेव व निरंजनमाधव यांनीं लिहिलेलीं ज्ञानेश्वर चरित्रें, गिरिधरस्वामींनीं वर्णिलेला ‘ श्रीसमर्थप्रताप ’ व नाभाजीचीं ‘संतचरित्रें’ हें चरित्र-लेखनाचें नवें दालन अधिक संपन्न व परिपूर्ण करण्याचें काम महिपतीनें केलें. हा कवि संतभक्त होता. त्याच्या कवितेचें वळण संतकाव्याचेंच होतें. म्हणून त्यांचा समावेश पंडितकवींत करण्यापेक्षां संत-कवींतच करतां येईल किंवा त्याचा असा एक स्वतंत्र वर्गच कल्पितां येईल.

कवयित्रींचें काव्य हें मराठीचें एक मोलाचें वैशिष्ट्य आहे. स्त्री-हृदयांतील मार्दव, उत्कट भक्ति व स्त्रियांची म्हणून जी एक स्वतंत्र जीवन–वृत्ति असते तिचा लाभ मराठीला या कवयित्रींमुळें झाला.

वर वर्णिलेल्या वर्गांची कविता केवळ अध्यात्मिक वा धार्मिक होती. तिचा विषय शुद्ध अध्यात्म किंवा शंकरपार्वती, विष्णुलक्ष्मी इत्यादि देव-देवता, रामकृष्णादि अवतारी पुरुष, पांडवादि भक्त, संत, साधु, ऋषिमुनी असा होता. त्यांत लौकिक विषयाला वाव नव्हता. आपल्या भोंवतीं चाललेली प्रत्यक्ष घडामोड, तिचे आपल्यावर होणारे बरेवाईट परिणाम, व सामान्य जनांच्या संबंधांत सामान्य जनांना येणारे अनुभव याचा मागमूस जुन्या मराठी काव्यांत नव्हता. जो कांहीं थोडा पुसट अनुभव वाचकांस यावयाचा तो कृष्णगोपी, रामसीता, लवकुश, शुकरंभा, भीमार्जुन, रामरावण अशांच्या वर्णनाच्या आडपडद्यानेंच. पण येवढ्यावरच निर्वाह होणें शक्य नव्हतें. आमच्यांतच झालेल्या वीरांचे पोवाडे व प्रत्यक्ष ऐति-हासिक पराक्रमी पुरुषाचीं कीर्ति गाण्याची प्रथा संस्कृतांत जुन्या काळीं होती. चालुक्य राजे, पृथ्वीराज चव्हाण, बागलाणांतील राठोड, इत्यादींवर

संस्कृतांत महाकाव्यरचना आहे. या प्रवृत्तीचा थोडा फार आढळ मराठींत शिवछत्रपतींच्या काळापासून झालेला असला तरी तिचें पूर्ण विकसन पेशवाईतच झालें. पोवाडे व लावण्या रचणाऱ्या शाहिरांचा एक नवा वर्गच त्या काळीं निर्माण होऊन त्यानें लौकिक काव्यस्वादाची बहुजन-समाजाची तहान भागविली. पोवाडे व लावण्या हीं अनुक्रमें वीर व शृंगार या दोन रसांनीं रसरसलेलीं जिवंत काव्यें असून त्यांत तत्कालीन महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक जीवनांचें स्वच्छ प्रतिबिंब पडलेलें दिसतें.

लावण्यांतून उत्तान शृंगार प्रामुख्यानें असला तरी कांहीं लावण्या गंभीर वेदान्तपरहि आहेत. या शाहीर वर्गाचे तीनच प्रतिनिधी या ग्रंथांत केवळ स्थलसंकोचामुळें ग्रंथकारास घ्यावे लागले आहेत. तथापि होनाजी-बाळा, संगमनेरचा परशराम, सगनभाऊ अशी मातबर शाहीरमंडळी होऊन गेलेली आहेत. व त्यांनींहि मराठीचें हें दालन संपन्न केलें आहे.

असो. जुन्या मराठी कवितेचा साडे सहाशें वर्षें थाटलेला हा असा दरबार आहे. यांत योगिराज ज्ञानेश्वरापासून लावणीकार प्रभाकरापर्यंतचे मानकरी आपापल्या दर्ज्याप्रमाणें आम्हां मराठी वाचकांचा मुजरा घेण्यासाठीं उभे आहेत. रा. वाघोलीकरांनीं हा भव्य दरबार या ग्रंथाच्या रूपानें आपल्या-पुढें मोठ्या रसिकतेनें उभा केला आहे. त्याचें दर्शन घेण्यापूर्वी व मुजऱ्या-साठीं हात लवविण्यापूर्वी मराठी वाचकांच्या कानांवर मी या अलौ-किक मानकऱ्यांच्या आगमनाची 'ललकारणी' मोठ्या हर्षानें देत आहे. "नजर रखो ' महाराज ' या माझ्या पुकाऱ्यानें सावध होऊन या ' महा-राष्ट्र-शारदेच्या मानकऱ्यांना ' भक्तीचा मुजरा करण्याच्या तयारीस— वाघोलीकरांना दुवा देत देत—वाचकांनीं आतां लागावें येवढेंच सुचवून थांबतों.

योगकुंज, चिमणबाग,<br>
टिळकपथ, पुणें २<br>
१।१०।५०

के. ना. वाटवे.

# कृतज्ञता

महाराष्ट्र शारदेच्या दरबारांतील कांहीं थोर मानकऱ्यांच्या जीवनाचा व त्यांच्या कार्याचा अल्पसा परिचय महाराष्ट्र शारदेच्या दरबारांतील अनेक छोट्या सेवकांना करून देण्याचा हा माझा अल्पसा प्रयत्न आहे. अगदीं सुरवातीच्या काळापासून आजतागायतच्या मानकऱ्यांचा असाच परिचय दोन तीन भागांत करून देण्याचा विचार आहे. पुढील भाग यथाक्रम प्रसिद्ध होतीलच. या पहिल्या भागास माझे गुरु डॉ. के. ना. वाटवे यांनीं उत्तेजनपर प्रस्तावना लिहून दिली याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें. तसेंच 'चित्रशाळा प्रकाशनानें' मला हें पुस्तक लिहिण्याची संधि दिली त्याबद्दल त्यांचा व माझ्या अनेक पुस्तकांचें प्रेमळपणानें स्वागत करणाऱ्या माझ्या छोट्या वाचकांचा मी आभारी आहें.

२ आक्टोबर १९५० { ह. भा. वाघोलीकर

# महाराष्ट्र शारदेचे
# मा न क री
# : १ :

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | मुकुंदराज | १ |
| २ | महात्मा चक्रधर | ४ |
| ३ | श्रीज्ञानेश्वर | ११ |
| ४ | नामदेव | २२ |
| ५ | महदंबा | ३० |
| ६ | संत जनाबाई | ३६ |
| ७ | एकनाथ | ४१ |
| ८ | दासोपंत | ५१ |
| ९ | मुक्तेश्वर | ५६ |
| १० | तुकाराम | ६३ |
| ११ | रामदास | ७२ |
| १२ | वामनपंडित | ८५ |
| १३ | रघुनाथपंडित | ८९ |
| १४ | निरंजनमाधव | ९५ |
| १५ | महिपतिबोवा | १०० |
| १६ | कविवर्य मोरोपंत | १०७ |
| १७ | रामजोशी | ११७ |
| १८ | अनंतफंदी | १२४ |
| १९ | प्रभाकर | १३१ |

अनुक्रम
दि.
क्रमांक
ग्रं. वि.

# मुकुंदराज

:: १ ::

महाराष्ट्राचे आदिकवि म्हणून मुकुंदराज समजले जातात. महानुभावांचें वाङ्मय सोडलें तर मुकुंदराजांस दिलेलें हें अग्रेसरत्व बरोबर आहे असें अनेक विद्वानांचे म्हणणें आहे. ज्ञानेश्वरीची रचना झाल्यावर निवृत्तिनाथ ज्ञानेश्वरांस म्हणाले, ‘ भाष्यानुसार गीतेवर टीका लिहिलीस, पण पण धन्य मुकुंदराज कीं ज्यांनीं विवेकसिंधूसारखा ग्रंथ स्वमतीनें लिहिला; ’ यावर मीहि असा स्वतंत्र ग्रंथ लिहीन असें म्हणून ज्ञानेश्वरांनीं अमृतानुभवाची रचना केली. या आख्यायिकेवरून ज्ञानेश्वरापूर्वीं मुकुंदराज होऊन गेले असें मानलें जातें. शिवाय ‘ विवेकसिंधु ’ ह्या मुकुंदराजांच्या ग्रंथाच्या कांहीं हस्तलिखित पोथ्यांमधून पुढील दोन ओव्या आढळतात—

शके अकरा दाहोत्तरू । साधारण संवत्सरू ।
राजा शारंगधरू । राज्य करी ॥
ऐसा समयो सर्वोत्तमू । तेथ मुकुंद द्विजोत्तमू ॥
विवेकसिंधू मनोरमू । निर्मिता झाला ॥

ह्या ओव्यांवरून ‘ ज्ञानेश्वरी ’ पूर्वीं १०० वर्षें अगोदर ‘ विवेकसिंधु ’ ह्या ग्रंथाची रचना झाली असावी असें अनुमान काढावें लागतें. ह्या ग्रंथरचनेच्या वेळीं मुकुंदराजाचें वय साठीला पोचलें असावें असा अंदाज बांधला जातो कारण त्याच ग्रंथांत ‘ मज श्वासनिमेषाचा श्रम । तेथ कायसा या ग्रंथाचा उद्यम ॥ ’ असा उल्लेख आढळतो. ह्या सर्व अनुमानां-

वरून शके १०५० ते ११२० हा मुकुंदराजाचा काळ ठरतो. पण ह्या सर्वाला भक्कम असा इतिहासाचा दाखला मिळत नाहीं. उलट भाषेच्या दृष्टीनें पाहिल्यास मुकुंदराजाची भाषा ज्ञानेश्वरीच्या भाषेपेक्षांहि बरीच प्रगत असावी असें वाटतें. अर्थात् हा वादाचा प्रश्न आहे.

जोगाईच्या आंब्याचा राजा जैत्रपाळ याच्या सांगण्यावरून मुकुंदराजानें ' विवेकसिंधु ' ह्या ग्रंथाची रचना केली अशी एक आख्यायिका प्रचलित आहे. ह्या आख्यायिकेला ' विवेकसिंधु ' ह्या ग्रंथांतील पुढील ओव्यांचा आधार देण्यांत येतो.

' नृसिंहाचा बल्लाळ । तयाचा कुमर जयंतपाळ ।
तेणें करविला गदारोळ । ग्रंथरचनेचा ॥ '

ह्या जयंतपाळ राजाला ब्रह्म जाणण्याची इच्छा होती. त्यानें अनेक विद्वानांना पाचारण केलें व 'परब्रह्माचा तुम्हीं अनुभव घेतला आहे का ?' असा प्रत्येकाला प्रश्न टाकला. त्या पंडितांना शब्दज्ञान होतें, अनुभव नव्हता. ते त्याचें समाधान करूं शकले नाहींत. त्या सर्वांना त्यानें कैदेंत टाकलें. ही हकीकत मुकुंदराजाच्या कानीं गेल्यावर ते राजापाशीं येऊन दाखल झाले. मुकुंदराज नाथपंथी होते. ब्रह्मसुखाचा साक्षात् अनुभव त्यांना होता. त्यांनीं राजाला समाधिसुखाचा लाभ करून दिला. तेव्हां जयंतपाळ राजा त्यांच्या चरणीं लागला. त्याच्या सांगण्यावरून मुकुंदराजांनीं ' विवेकसिंधु ' ह्या ग्रंथाची रचना केली. ह्या आख्यायिकेला मुकुंदराजांच्या ग्रंथांतील वर उल्लेखिलेल्या ओव्यांनीं जरी साथ दिली तरी ह्या जयंतपाळराजाची ओळख इतिहास मात्र देत नाहीं.

मुकुंदराजांनीं आपल्या गुरुपरंपरेची माहिती आपल्या 'विवेकसिंधु'च्या शेवटीं खालीलप्रमाणें दिली आहे.

आदिगुरु श्री आदिनाथ । तेथूनि श्री हरिनाथ ।
तयाचा शिष्य श्री रघुनाथ । जो गुणसिंधु ॥

आदिनाथाचा शिष्य हरिनाथ, हरिनाथाचा शिष्य रघुनाथ, आणि ह्या रघुनाथाचा शिष्य मुकुंदराज. मुकुंदराजांनीं ह्या हरिनाथाचें चरित्र अधिक विस्तारानें वर्णिलें आहे. मध्यप्रांतांत वैनगंगेच्या कांठीं अंभोर नांवाच्या गांवीं ह्या हरिनाथाची समाधि आहे.रघुनाथाची समाधि मध्यप्रांतांतच छिंदवाड्यांत आहे व मुकुंदराजांची समाधिहि बैतुलजवळ खेडलें नामक गांवीं जुन्या पडक्या किल्ल्यांत आहे. ह्यावरून हे गुरुशिष्य मध्यप्रांताकडचे आहेत असें दिसतें.

मुकुंदराजांचे विवेकसिंधु व परमामृत असे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. विवेकसिंधु ग्रंथ मोठा असून त्याची ओवीसंख्या १६७१ आहे. ह्याचीं अठरा प्रकरणें असून हा ग्रंथ पूर्वार्ध व उत्तरार्ध असा दोन भागांचा आहे. परमामृत ग्रंथ लहान असून त्याची ओवी संख्या अवघी ३०३ आहे. त्याचीं प्रकरणें छोटीं असून १४ आहेत. या दोन ग्रंथांशिवाय पवनविजय,पंचीकरण, मूलस्तम्भ, कांहीं पदें, अभंग वगैरे मुकुंदराजांच्या नांवावर मोडतात. पण ही काव्य-रचना मुकुंदराजांची नसून मुकुंद, मुकुंदस्वामी, मुकुंददीन वगैरेसारख्याच नांवाचे पांचसहा कवी मुकुंदराजानंतर होऊन गेले, त्यांची असावी असें म्हटलें जातें.

मुकुंदराजांनीं विवेकसिंधु व परमामृत ह्या ग्रंथांच्या द्वारें मराठींतून शांकरवेदान्त सामान्य जनांस शिकविला. ते म्हणतात—

‘ श्री शांकरोक्ति वरी । मी बोलिलों मराठी वैखरी ।
म्हणूनी येथ धरावी चतुरीं । शास्त्रबुद्धि ॥ ’

खऱ्या ज्ञानाची प्राप्ति सद्गुरूकडून झाल्याशिवाय अज्ञान लोप पावणार नाहीं आणि तोंपर्यंत ब्रह्माची प्राप्ति होणार नाहीं. अज्ञानाचा निरास झाल्यावर जीव हा ब्रह्मस्वरूप आहे हें सहजच समजून येतें. परंतु अज्ञानामुळें आपलें स्वरूप मानवाला कळत नाहीं असा मुकुंदराजांचा ब्रह्मस्वरूपाविषयींचा सिद्धांत आहे. त्यांनीं सद्गुरु, सत्शिष्य व असत्‌शिष्य यांचीं लक्षणें आपल्या ग्रंथांत दिलीं आहेत. सद्गुरूचें वर्णन करितांना

'गुरुमेव सर्वत्र वरूखे उदारपणें' असें ते म्हणतात; तर सत्शिष्याबद्दल बोलतांना 'सद्गुरूचा अद्वयबोधसिंधु उचंबळविणारा शिष्यचंद्र' असें ते म्हणतात. जीव, ब्रह्म, सगुण, निर्गुण वगैरे क्लिष्ट विषयांचें मुकुंदराजांनीं संवादरूपानें सुगम विवेचन केलें आहे. अहंकाराचा नाश झाल्यावर ब्रह्मप्राप्ति होते असें मुकुंदराज पुन्हा पुन्हा सांगतात. 'तूंच ब्रह्म आहेस' असें म्हणून ते पुढें सांगतात. 'देहाचे ठिकाणीं आत्मबुद्धि ठेवल्यानें तुझें ब्रह्मस्वरूप तुला दिसत नाहीं' परमामृत ह्या ग्रंथांतहि त्यांनीं 'आत्मज्ञानावांचून मोक्ष नाहीं' हाच सिद्धान्त सुगम रीतीनें सुरस भाषेंत मांडला आहे. ते म्हणतात—

'आहे स्वयंभू आपण । जाणे आपली आपण खूण ।
परब्रह्म निर्वाण निजस्वरूप ॥'

मुकुंदराजांच्या ह्या विचारपद्धतीचा रामदासांच्या विचारपद्धतीवर परिणाम झाला असावा असें उभयतांच्या ग्रंथावलोकनानें आपल्या लक्षांत येतें. जनकाप्रमाणें प्रपंचांत राहूनहि अध्यात्मयोगाचा आनंद उपभोगणें यालाच मुकुंदराज 'राजयोग' म्हणतात. आणि आपल्या प्रवचनांत ह्या राजयोगावरच त्यांनीं भर दिला आहे.

रामदासहि 'प्रपंच करावा नेटका । मग करावें परमार्थ विवेका ॥' असें म्हणतात. मुकुंदराजांनीं सांगितलेला राजयोग सगुणोपासना व साधुसंगत यांनीं साध्य होतो. निर्गुणोपासक असणाऱ्या मुकुंदराजांनीं सगुणोपासना सांगावी हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. निर्गुणाकडे जाण्याचा सगुणोपासना हा मार्ग आहे असें भागवतपंथाप्रमाणेंच त्यांचें मत आहे. ते स्पष्टच सांगतात—

'चित्त अवलंबनेवीण । जरी न राहे स्थिरपण ।
तरी देवाचें सगुणपण । स्वरूप चिंतावें ॥'

सगुणोपासनेच्या व नवविधाभक्तीच्या मार्गानें जाऊन ब्रह्मज्ञान होतें व ज्ञानोत्तरभक्ति ही श्रेष्ठ आहे असें सांगणारे महाराष्ट्राचे आद्य वेदान्ती कवि मुकुंदराज शके ११२० मध्यें ब्रह्मपदीं विलीन झाले.

• • •

# महात्मा चक्रधर

:: २ ::

महाराष्ट्र भाषेची मोठ्या प्रमाणांत प्रथम सेवा करण्याचा मान महानुभाव पंथास द्यावयास हवा हें आतां सर्वमान्य आहे. ह्या महानुभाव पंथाची स्थापना श्रीचक्रधर ह्या थोर पुरुषानें बाराव्या शतकांत केली. म्हणून महात्मा चक्रधर ह्यांचें मराठी वाङ्मयाच्या इतिहासांत मोठें मानाचें स्थान आहे.

महात्मा चक्रधर ह्यांच्या कालाविषयीं निश्चित माहिती मिळत नाहीं. महानुभाव पंथांतील महिंद्रभट नांवाच्या आचार्यानें लिहिलेल्या 'लीलाचरित्र' नांवाच्या ग्रंथावरून श्रीचक्रधर ह्यांच्या चरित्राविषयीं बरीचशी माहिती मिळते. शिवाय केशवराजसूरी यांच्या 'पूजावसर मूर्तिप्रकाश' ह्या ग्रंथाधारें त्यांच्या चरित्रावर थोडा प्रकाश पडतो.

सुमारें आठशें वर्षांपूर्वीं गुजराथ प्रांतांत त्रिमल्लदेव नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याला मुलगा नसल्यामुळें त्यानें आपलें राज्य विशाळदेव नांवाच्या आपल्या सामवेदी ब्राह्मण प्रधानास दिलें.ह्या विशाळदेवाच्या पोटींहि पुत्रसंतान नव्हतें. श्रीदत्ताची त्यानें उपासना केली, तेव्हां श्रीदत्तात्रेयाच्या कृपेनें त्याला मुलगा झाला. त्याचें त्यानें हरिपाळदेव असें नांव ठेवलें. ह्या एकुलत्या एक मुलावर जिवावरचें दुखणें ओढवलें. त्यांतून तो बरा झाल्यावर विशाळदेवानें त्याचें कमलदेवी नांवाच्या राजकन्येशीं लग्न केलें. पुढें तो राज्यकारभार पाहूं लागला. एक-दोन वर्षें सुधीं जातात न जातात तोंच त्याला द्यूत खेळण्याचें व्यसन जडलें. ह्या व्यसनापायीं त्यानें आपलें सर्व वैभव घालवलें. वैभव गेलें पण व्यसन गेलें नाहीं. जुगारासाठीं त्यानें कमलदेवीजवळ द्रव्याची याचना केली. पतीच्या समाधानासाठीं त्या साध्वीनें दिलेंहि द्रव्य. पण हरिपाळदेवानें तेंहि द्रव्य घालवलें आणि कमलदेवीच्या दागिन्यासाठीं त्यानें हात पसरला. ते दागिने कमलदेवीच्या माहेरचे असल्यामुळें ते तिनें देण्याचें नाकारलें. संतत झालेल्या हरिपाळानें

'दागिने मिळाल्याशिवाय अन्न खाईन तर गोपाळकृष्णाची आण ' अशी शपथ घातली. कमलदेवीहि कमी नव्हती. ती म्हणाली, 'मीहि श्रीगोपाळ-कृष्णाच्या शपथ हे दागिने देणार नाहीं. ' पतिपत्नींचा हा झगडा वृद्ध विशाळदेवाच्या कानीं गेला. त्यानें त्या दिवसापुरतें हरिपाळदेवास द्यूत खेळण्यासाठीं द्रव्य दिलें. नेहमींप्रमाणें हरिपाळदेवानें तें द्रव्य द्यूतांत घालविलें. पण ह्या प्रसंगानंतर मात्र हरिपाळदेवाचें चित्त सर्वच बाबतींत उदास झालें. तो आपल्या आवडत्या द्यूत खेळण्याच्या व्यसनाकडेहि तितक्या उत्साहपूर्ण दृष्टीनें बघेना. मग संसाराकडे कुठला पाहणार ! त्याच्या मनाचा मुख्य धर्म जें वैराग्य तें त्याच्या मनाचा कबजा आतां घेऊं लागलें. राम-टेकच्या यात्रेला जाण्याविषयीं त्यानें हट्ट धरला. प्रधानाच्या सल्ल्यानें हरिपाळदेवाचें जाणें बरोबर नव्हतें. शेवटीं कांहीं यात्रेकरूंच्या मेळाव्यांत मिसळून हरिपाळदेवानें जावें असें त्याच्या आईनें ठरविलें. त्या योजनेबर-हुकूम हरिपाळदेव यात्रेकरूंसमवेत रामटेकच्या यात्रेला निघाला. परंतु मध्यं-तरीं इतर यात्रेकरू व हरिपाळदेव यांच्यांत चुकामूक झाली. हरिपाळदेव रामटेकचा रस्ता सोडून ऋद्धिपूरच्या रस्त्याकडे वळला. ही गोष्ट शके ११०७ च्या चैत्रांत घडली. ऋद्धिपुरीं गोविंदप्रभु नांवाच्या विरक्त विद्वान् ब्राह्मणाची व हरिपाळदेवाची गांठ पडली. त्यानें हरिपाळदेवास गुरूपदेश दिला व त्याचें नांव चक्रधर असें ठेवलें.

पूर्वाश्रमींचा हरिपाळदेव आता श्रीचक्रधर ह्या नांवानें ओळखला जाऊं लागला. देशपर्यटन करीत असतां श्रीचक्रधर औरंगल नांवाच्या शहरीं आले. त्या शहरांत कमळ नाईक नांवाचा सामवेदी ब्राह्मण होता. त्याच्या हंसांबा नांवाच्या रूपवान् व विद्वान् मुलीशीं श्रीचक्रधरानें विवाह केला. हा विवाह शके ११२२ च्या ज्येष्ठ शुद्ध सप्तमीस झाला. हंसांबाशीं कांहीं वर्षें सुखानें संसार केल्यावर श्रीचक्रधरांचें वैराग्यप्रेम उफाळून आलें. त्यानें त्या गांवाचा त्याग करून पुन्हा तीर्थयात्रेचा मार्ग धरला.

' लीळाचरित्र ' ह्या ग्रंथांतील उल्लेखांवरून श्रीचक्रधर बीड, प्रतिष्ठान

वगैरे भागांतून तीर्थयात्रा करीत चालले होते असें दिसतें. अशा रीतीनें देशपर्यटण करीत असतां श्रीचक्रधर अचळपुरीं रामदेवराव राणा ह्याच्या भेटीस गेले. रामदेवरावानें त्यांचा मोठा सन्मान केला, व आपली कन्या उमादेवी हिचा स्वीकार करण्याविषयीं श्रीचक्रधरांना विनंती केली. रामदेवरावाचा बराच आग्रह झाल्यामुळें श्रीचक्रधरांनीं उमादेवीशीं विवाह करून तिचें गौरी असें नांव ठेवलें. श्रीचक्रधरांचा हा तिसरा संसार तीन वर्षें सुरळीत चालला. तीन वर्षांनीं पुन्हा हाहि संसार वैराग्याच्या वावटळीनें उधळून दिला. संसारांत तर मन रमेना आणि गौरीचा त्याग करावा असेंहि मन म्हणेना. ह्या मनाच्या दुहेरी अवस्थेंत चक्रधर सांपडले. अशाच मानसिक अवस्थेंत असतांना श्रीचक्रधर एकदां चंद्रभागा नदींत पोहण्यासाठीं गेले. त्यांचें मन खोल विचारांत निमग्न झालें असतां त्यांचें शरीर खोल पाण्यांत शिरलें. श्रीचक्रधर कोठें दिसेनात हें पाहून तीरावरचे लोक ' रावो बुडाले ' असा गोंगाट करूं लागले. ही गोष्ट राणीवशांत गौरीच्या कानावर गेल्याबरोबर तिनें धाडकन आपलें शरीर जमिनीवर टाकलें आणि त्याबरोबर तिचे प्राणहि तिला सोडून गेले. इतक्यांत श्रीचक्रधर तीरावर आले. सगळ्यांना आनंद झाला. पण राजवाड्यांत आल्यावर गौरीच्या मृत्यूची बातमी कानीं येतांच ह्या आनंदाचा विरस झाला. श्रीचक्रधर आतां पूर्णपणें वैरागी बनले. अचळपूर सोडून ते पुन्हा देशपर्यटण करूं लागले. अंगावरच्या कपड्यांच्या त्यांनीं चिंध्या चिंध्या करून टाकल्या. कंबरेला एक लहानसें चिरगूट व डोक्याला एक बारकेसें पटकूर अशा अवस्थेंत हिंडत हिंडत श्रीचक्रधर भोगावती नदीच्या कांठीं आले. वैराग्याच्या निरनिराळ्या वलयांतून बाहेर पडून श्रीचक्रधरांचें मन आतां पूर्णपणें विरागी झालें होतें. इथेंच भोगावतीच्या कांठीं त्यांना श्रीदत्तात्रेयानें दर्शन दिलें. तेव्हां शके ११८५ च्या कार्तिक महिन्यांत श्रीचक्रधरांनीं संन्यासदीक्षा घेतली.

आतां श्रीचक्रधर आपला शिष्यसंप्रदाय वाढवीत, उपदेश करून

आपल्या पंथाचा प्रचार करीत हिंडूं लागले. त्यांनीं महानुभाव पंथाची स्थापना शके ११९५ मध्यें केली. एका स्वतंत्र पंथाचा संस्थापक म्हणून श्रीचक्रधरांचें चरित्र विचार करण्यासारखें आहे. त्यांनीं आपल्या पंथाचा दाक्षिणेकडे विशेष प्रसार केला नाहीं. शिष्यपरिवार घेऊन पंथतत्त्वज्ञानाचा प्रसार करीत ते उत्तरेकडे बदरिकाश्रमाकडे चालले होते. मध्यंतरीं आपले शिष्य मागें ठेवून ते पुढें जात होते. शेवटीं राहिलेल्या नागार्जुन नांवाच्या शिष्यालाहि मागें ठेवून श्रीचक्रधर हिमालयांत गेले. ह्यानंतरच्या त्यांच्या चरित्राविषयीं कांहीं माहिती मिळत नाहीं. नागदेवाचार्याला सोडून हिमालयांत जातांना श्रीचक्रधरानें नागदेवाचार्याला जो उपदेश केला तो केशवराजसूरींनीं ‘ मूर्तिप्रकाश ’ नांवाच्या ग्रंथांत फार सुंदर रीतीनें सांगितला आहे.

श्रीचक्रधर ह्यांनीं स्थापन केलेल्या पंथास महानुभावपंथ असें नांव आहे. त्या पंथास कुणी जयकृष्णपंथ, कुणी अच्युतपंथ असेंहि म्हणतात. श्रीचक्रधर ह्यांनीं वेळोवेळीं सांगितलेल्या सूत्रांच्या संग्रहास सिद्धान्तसूत्रपाठ असें म्हणतात. हा ग्रंथ ह्या पंथांत वेदतुल्य प्रमाणग्रंथ मानला जातो, पंथाची स्थापना झाली त्या वेळेस तो गुप्त रहावा अशी श्रीचक्रधरांची इच्छा नसावी म्हणून ग्रंथलेखन प्रथम बाळबोध लिपींत झालें. परंतु परिस्थितीमुळें पुढें ह्या पंथाला गुप्तता स्वीकारावी लागली. म्हणून पंथ स्थापनेनंतर साठ सत्तर वर्षांनीं पंथाचे ग्रंथ सकळ लिपी, सुंदरी लिपी, पारिमांडल्य लिपी वगैरे सांकेतिक लिपींत लिहिले गेले. ही एक इष्टापत्तिच म्हणावयाची. कारण मराठी भाषेंतील हे आद्यग्रंथ तत्कालीन भाषेंत फेरफार न होतां जपून ठेवण्यांत आले. ह्या पंथाचें तत्त्वज्ञान आपणांपेक्षां फारसें वेगळें आहे असें नाहीं. परमेश्वर निर्गुण निराकार आहे. पण तो कृपावश होऊन सगुण साकार होतो, असें महानुभाव मानतात. एक परमेश्वर मुख्य असून इतर दुय्यम दर्जाचीं दैवतें आहेत असें ते मानतात. त्यांच्या मतें माया निर्गुणाला सगुणत्व आणते व जीवाकडून सर्व व्यापार करविते. मनुष्य

आपल्या पूर्वकर्मानुसार फळें भोगतो आणि स्वर्ग, नरक, कर्मभूमि व मोक्ष अशा चतुर्विध कर्मफलास पावतो. महानुभावीयांना दशावतार मान्य आहेत; परंतु कृष्णावतार हाच एक पूर्णावतार आहे असें ते मानतात. ह्या पंथाबद्दल महाराष्ट्रांत विशेषसें अनुकूल असें मत नाहीं. तुकारामासारखे साधूदेखील त्यांची मानभावी म्हणून हेटाळणी करतात; त्यांनीं चातुर्वर्ण्यावर केलेला आघात हें ह्या कुप्रसिद्धीचें कारण असावें असें कांहीं विद्वान् मानतात. त्यांची गुप्तता, आचारवैचित्र्य, मुसलमानांच्या तावडींतून झालेली त्यांची सुटका ह्याही गोष्टी ह्याला कारण असाव्यात. त्यांचे पुष्कळ ठिकाणीं ओटे आहेत. लोक संन्यस्तवृत्तीनें राहून कृष्णवस्त्रें परिधान करतात. कृष्ण आणि दत्त हीं दैवतें एकच आहेत असें ते मानतात. महानुभावीय लोक पंच कृष्ण मानतात. श्रीचक्रधर हा पांचवा कृष्ण मानला जातो.

श्रीचक्रधरानें स्वतः प्रत्यक्ष लिहिलेला असा एकहि ग्रंथ नाहीं. त्यांनीं वेळोवेळीं सांगितलेलीं आचार्यसूत्रें सिद्धांतसूत्रपाठ नांवाच्या ग्रंथांत ग्रथित केलेलीं आहेत. श्रीचक्रधर ह्यांच्या तोंडून वेळोवेळीं जीं सिद्धांतवजा वाक्यें बाहेर पडलीं तीं महिंद्रभट ह्यांनीं जशींच्या तशीं लिहून ठेवून लीळाचरित्र हा चरित्र–ग्रंथ तयार केला. त्यांतील कांहीं सूत्रें निवडून केशवराजसूरी ह्यांनीं सिद्धान्त–सूत्रपाठ हा ग्रंथ तयार केला. हीं सूत्रें पूर्ण भक्तीनें सर्व महानुभावपंथी लोक नित्य वाचतात. ही आचार्य चक्रधरांची संहिता त्यांनीं जीवापलीकडे संभाळून ठेवली आहे. ह्या ग्रंथांत एकंदर १६०९ सूत्रें आहेत. हा ग्रंथ म्हणजे ह्या पंथाचा पाया आहे. ह्यावरच इतर धार्मिक ग्रंथांची उभारणी केलेली.

श्रीचक्रधराची शिस्त नांवाजण्यासारखी होती. आश्रमांत आपण नसतांहि सर्व व्यवस्था नीट आंखल्याप्रमाणे चालत असे. ते आपल्या शिष्य प्रशिष्यांकडून कांहीं घेत नसत. केवळ भिक्षावृत्तीनें राहात असत. त्यांची राहणी अत्यंत साधी असे. स्त्री–पुरुष, शूद्र–स्पृश्य, लहान–थोर ह्या सर्वांशीं ते समभावानें वागत असत. ते स्वतः शिष्यांना निरनिराळे विषय समजा-

वून सांगत असत. आपल्या पंथाविषयीं त्यांना नितांत आदर असला तरी दुसऱ्या पंथाचा ते अनादर करीत नसत, शिष्यांनाहि करूं देत नसत. त्याबद्दल ते अति कडक शासन करीत. 'निर्हेतुक भिक्षा कीजे: घरें न निवडितु भिक्षा कीजे: ओळखिचेआ घरा भिक्षे न वचावे' असे भिक्षेबद्दल त्यांचे नियम असत. ' महात्मेनि प्रियवक्तेआ होआवे: 'महात्मेनि सत्यार्जवा होआवे। हासताहि लटिके न बोलिजे: ' असें वागण्याविषयीं ते कटाक्षानें सांगत. पंथांत वाटेल त्याला प्रवेश मिळत नसे. श्रीचक्रधर आपल्या शिष्यांना अत्यंत प्रेमानें वागवीत. ' लीळाचरित्र ' ग्रंथांतील निरनिराळया उल्लेखांवरून श्रीचक्रधरांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल तत्कालीन राजेरजवाड्यांत मोठी आदराची भावना वसत असावी असें दिसतें. उदा० ' रामदरणा कटकेये जात असे: रामदरणा गोसावीयातें देखीले श्रीचरणा लागला. ' मनाचें औदार्य, दयालुत्व अजातशत्रुत्व, सर्व प्राणिमात्रांशीं समत्व, निर्वैरबुद्धि वगैरे श्रीचक्रधरांचे गुण विशेष होते. त्यांचें अजातशत्रुत्व तेल्याच्या गोष्टींत दिसतें. खांडे घेऊन गोसावीयांसि मारण्यास आलेला तेली ' माझेया घरां सोमनाथु आला: ' असें म्हणत श्रीचरणीं लागला. वरील गुणाप्रमाणेंच निस्पृहता, निग्रह, संयम वगैरे गुण त्यांच्या ठायीं होते. आपल्या पंथप्रचारासाठीं श्रीचक्रधरांनीं कांहीं चमत्कारहि दाखविले. उदा. ' रायेरी अवस्थान असे: तीये गांवीं वामन पैंद्यी ब्राह्मणु: त्याची भार्या निवर्तली: गोसावी तीयेतें म्हणितले: बाइ एथ पाणी पात्र दीया: मग ते बाइ जीयाली: ' श्रीचक्रधर अनेकांना समाधिसुख देत.

'आर्तातें परमेश्वरूं वाडोवाडी गिंवसती' 'जन्मजीवित परमेश्वरासि देआवे' ' जीव मोक्षा सर्वाधिकार्या, ' ' भाकीजडा धर्मी अधिकार नाहीं ' अशीं अनेक सूत्रें श्रीचक्रधरांनीं आपल्या पंथीयांच्या स्वाधीन केलीं व बाराव्या शतकाच्या शेवटच्या दशकांत ते हिमालयांत विलीन झाले.

• • •

क्रमांक २९८७६
वि. भा. बा. बा.
क्रमांक 2090
नों. दि. 3-8-61

# श्रीज्ञानेश्वर

मराठी भाषेला रसवत्तेच्या सुवर्तांत अमृताशींहि पैजा मारावयास लावणारा ज्ञानियांचा राजा श्रीज्ञानेश्वर हा मराठींतील अग्रश्रेष्ठ कवि होय असें म्हणावयास हरकत नाहीं. देशियेच्या क्षोणीं साहित्यसोनिया खाणी खोदणारा, विवेकाच्या वेलीवर संवादाचीं गोमटीं फळें आणणारा महाराष्ट्र शारदेचा हा लाडका मानकरी आजहि तिच्या गळ्यांतील देदीप्यमान सौभाग्यमणि आहे असें म्हणावेंसें वाटतें.

श्रीज्ञानेश्वरांचें घराणें मूळचें आपेगांवचें. ज्ञानेश्वरांच्या पणजांच्या पणजापासून ह्या घराण्याबद्दल थोडे उल्लेख सांपडतात. ज्ञानेश्वरांचे हे पूर्वज हरिहरपंत कुलकर्णी इ. स. ११३८ च्या सुमारास हयात असावेत. त्यांचे पणतू त्र्यंबकपंत देवगिरीकर यादवांच्या सेवेंत होते. ह्यांनीं पुढें गोरखनाथ ह्या नाथसंप्रदायांतील श्रेष्ठ विभूतीकडून नाथपंथाची दीक्षा घेतली. ह्यांचे ज्येष्ठ चिरंजीव गोविंदपंत ह्यांना गहिनीनाथांनीं उपदेश केला होता. हे गोविंदपंत म्हणजे ज्ञानेश्वरांचे आजोबा होत. त्यांचे चिरंजीव विठ्ठलपंत हे लहानपणापासूनच विरक्त होते. नामदेव महाराज म्हणतात—

'भक्ति नवमास भरले पूर्ण दिवस। आलें वैराग्य डोळस मूर्तिमंत ॥'

वेद, व्याकरण व काव्य यांचें पठण करून विठ्ठलपंत अल्पवयांतच निपुण शास्त्रवक्ते झाले. आपल्या ज्ञानास पूर्णता येण्यासाठीं विठ्ठलपंतांनीं तीर्थाटन केलें. पंढरपूरच्या वाटेवर असतांनाच विठ्ठलपंत शिवपीठ म्हणून प्रसिद्ध असलेल्या इंद्रायणी नदीच्या कांठच्या अलंकापुरी ( आळंदी ) ह्या प्रसिद्ध क्षेत्रीं आले.ह्या गांवचे सिधोपंत कुलकर्णी नांवाच्या एका सात्त्विक ब्राह्मण-श्रेष्ठानें विठ्ठलपंतास मोठ्या मानानें आपल्या घरीं नेलें. विठ्ठलपंताची शास्त्रनिष्ठा पाहून सिधोपंतास त्यास आपला जामात करून घेण्याची इच्छा उत्पन्न झाली. आणि 'स्वप्नावस्थेमाजि पंढरीनाथें येउनि कन्या सालंकृत यासी द्यावी' असें सिधोपंतास सांगितलें. विठ्ठलपंतासहि असा साक्षात्कार

झाल्यानें त्यांनीं सिधोपंतांची मुलगी रुक्मिणी हिचा पत्नी म्हणून स्वीकार केला. नंतर विठ्ठलपंत पत्नीसह आपेगांवीं आले. विरक्त विठ्ठलपंत आतां तरी प्रपंचाचा मांड मांडतील असें घरच्या मंडळीस वाटूं लागलें. पण ' संसाराची चिंता नाहीं विठ्ठलासी । अखंड वृत्तीशीं समाधान । ' अशी त्यांची स्थिति होती. ' संन्यास घ्यावासा वाटतो; वाराणसीस जावयाची परवानगी दे ' असें ते आपल्या पत्नीला म्हणत. ते श्वशुराच्या सांगण्यावरून आळंदीसच येऊन राहिले होते. 'नित्य हरिकथा नामसंकीर्तन' असा विठ्ठलपंताचा जीवनक्रम चालला होता. शेवटीं आळंदीस असतांना विठ्ठलपंत रात्रीच्या वेळींच गृहत्याग करून एका वस्त्रानिशीं वाराणसीच्या मार्गें चालूं लागले.

काशीस जाऊन विठ्ठलपंतांनीं श्रीपादस्वामीकडून संन्यासदीक्षा घेतली. विठ्ठलपंत आतां संन्यासाश्रमांतील चैतन्याश्रम झाले. एकदां कर्मधर्मसंयोगानें श्रीपादस्वामी रामेश्वरयात्रेस जात असतां आळंदीस आले. वटवृक्षास प्रदक्षिणा घालणाऱ्या साध्वी रुक्मिणीबाईनीं स्वामींना पाहून मनोभावें नमस्कार केला. ' पुत्रवती हो ' असा सहजस्फूर्त आशीर्वाद स्वामींच्या तोंडून बाहेर पडलेला पाहून रुक्मिणीबाई खिन्नतेनें हसली. स्वामींनीं कारण विचारल्यावर रुक्मिणीनें विठ्ठलपंतानें गृहत्याग केल्याची हकीकत सांगितली. हा विठ्ठलपंत म्हणजे आपल्या आश्रमांतला चैतन्याश्रमच असावा अशी स्वामींची खात्री झाली. त्यांनीं काशीस जाऊन चौकशी केली व विठ्ठलपंतास आळंदीस आणून पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारण्याची त्यास आज्ञा केली. विठ्ठलपंतांनीं रुक्मिणीचा स्वीकार करून पुन्हा संसाराची मांडणी केली.

विठ्ठलपंतांनीं संन्यासाश्रमानंतर पुन्हा गृहस्थाश्रमाचा स्वीकार केलेला पाहून जननिंदा सुरू झाली.

' चैतन्याश्रम हा गृहाश्रम करीं हें ऐकिलें ब्राह्मणीं ।
केला त्याग यया कुळासि सकळीं त्या सौहृदाच्या गणीं ।। '

असें निरंजनमाधवानें ह्या वेळचें विठ्ठलपंतांच्या स्थितीचें वर्णन केलें आहे.

विठ्ठलपंतांनीं मात्र गुरुवचनावर अढळ विश्वास ठेवून समाधान वृत्तीनें शास्त्राभ्यास व ईशचिंतन करण्यांत काळ घालविण्यास सुरवात केली. विठ्ठलपंतांनीं बारा वर्षें अत्यंत दुःखांत काढलीं. जातीबाहेर टाकणें, आप्तांनीं संबंध तोडणें, जननिंदा, दारिद्र्य अशा अनेक आपत्तींचा मारा सहन करीत विठ्ठलपंतांनीं गांवाबाहेर झोपडींत ह्या नव्या गृहस्थाश्रमाचीं बारा वर्षें काढलीं. आणि ह्या कडक तपश्चर्येचें फळच म्हणून कीं काय निवृत्ति, ज्ञानेश्वर, सोपान आणि मुक्ताबाई ह्या चार रत्नांनीं त्यांच्या उदरीं जन्म घेतला.

शके ११९५ माघ व. १ रोजीं निवृत्तिनाथांचा जन्म झाला. त्यांच्या पाठोपाठ शके ११९७ च्या श्रावण वद्य अष्टमीस म्हणजे जन्माष्टमीसच ज्ञानेश्वरांनीं अवतार घेतला. त्यांच्या पाठीवर सोपान व मुक्ताबाई ह्यांचा अनुक्रमें शके ११९९ कार्तिक शु. १५ व शके १२०१ आश्विन शु. १ रोजीं जन्म झाला. ह्या जन्मशकाबद्दल दुसरेंहि एक मत प्रचलित आहे.

' शालिवाहन शके अकराशें नव्वद । निवृत्तिआनंद प्रगटले ॥
त्र्याण्णवाच्या सालीं ज्ञानेश्वर प्रगटले । सोपान देखिले शाण्णवांत ॥
नव्याण्णवाच्या सालीं मुक्ताई देखिली । जनी म्हणे केली मात त्यांनीं॥''

या जनाबाईच्या अभंगाचा पुरावा घेऊन महाराष्ट्र सारस्वतकार के. वि. ल. भावे व प्राचार्य दांडेकर यांनीं ह्या चारहि भावंडांचे जन्मशक अनुक्रमें ११९०, ११९३, ११९६ व ११९९ हे असावेत असें म्हटलें आहे. पण ह्याच्या विरुद्ध अशा पहिल्या मतालाहि जनाबाईच्या अभंगांत पुरावा मिळतो.

शके अकराशें पंचाण्णव वत्सरीं । निवृत्ति उदरीं प्रगटले ।
सत्याण्णव सालीं ज्ञानदेव जाले । नव्याण्णवीं देखले सोपानदेव ॥
बाराशतें एकीं मुक्ताबाई जन्मली । जनी म्हणे केली मात त्यांनीं ।

असा एक भिन्न पाठहि त्या अभंगाचा उपलब्ध आहे. शिवाय ह्या

मताला:नामदेव, विसोबा खेचर व सच्चिदानंदबाबा ह्यांच्या अभंगांचाहि आधार मिळतो. म्हणून कै. पांगारकर, प्रा. रा. द. रानडे व प्रा. शं. गो. तुळपुळे ह्यांना हेंच मत अधिक ग्राह्य वाटतें. ह्या चार विभूतींच्या जन्मशकाबद्दल एवढेंच निश्चित सांगतां येईल कीं, तितकीशी निश्चित माहिती त्यांबद्दल मिळत नाहीं. ह्या चारी मार्तंडांचा जन्म आपेगांव ह्या ठिकाणींच झाला.

ह्या बालकांच्या जन्मानें विठ्ठलपंतांचे हाल अधिकच वाढले. ते प्रथम आपेगांवास व नंतर आळंदीस रहात असत. संन्याशाचीं मुलें म्हणून गांवांतील लोक ह्या बालकांचें तोंड पाहणेंहि अपशकुनाप्रमाणें मानीत. घराबाहेर जरी अशी अपमानाची अवस्था ह्या बालकांना सहन करावी लागत होती तरी घरांत मात्र तीं मातापित्यांच्या सात्त्विक आणि शीतल अशा छायेंत वाढत होतीं. विद्वान् अशा पित्याच्या सान्निध्यांत ह्या शीघ्रबुद्धीच्या बालकांचें चांगलेंच अध्ययन झालें असावें. शुक्लेंदुवत् वाढणाऱ्या निवृत्ति, ज्ञानदेव ह्या बालकांच्या मुंजीचा प्रश्न उभा राहिला तेव्हां विठ्ठलपंतास ब्रह्मांड आठवलें. आपल्या भ्रष्ट जीवनाची झळ निदान आपल्या मुलांना तरी लागूं नये म्हणून आपल्या डोळ्यांदेखत त्यांचे उपनयनसंस्कार व्हावेत, असें विठ्ठलपंतास वाटत होतें. पण जिथें आळंदीग्रामस्थ लोक ह्या जगाच्या उद्धारार्थ जन्मलेल्या बालकांचें मुखावलोकनहि अशुभ मानीत होते तिथें मुंजीचा प्रश्न काढायचा कसा ? एकदां काय तो निकाल लावण्यासाठीं विठ्ठलपंतांनीं ब्रह्मवृंदांची सभा बोलवून आपलें म्हणणें त्यांच्यापुढें मांडलें, पण त्या विद्वान् ब्राह्मणांना श्रुति, वेद ह्या ग्रंथांत विठ्ठलपंतांस पावन करून घेण्याचा मार्ग आढळेना.त्यांनीं 'देहान्त प्रायश्चित्त असें या बोलिले।।' असा आपला निर्णय दिला. आपल्या संततीच्या कल्याणाकारितां विठ्ठलपंतांनीं ब्रह्मवृंदांच्या आज्ञेप्रमाणें आपल्या देहाचा त्याग केला, व साध्वी रुक्मिणीबाईहि त्यांच्या मागोमाग आपल्या अल्पवयी अर्भकांना पृथ्वीमातेच्या हातीं सोपवून स्वर्गवासी झाल्या. शास्त्राधारानें ज्यांना निराधार

केलें त्याच शास्त्राविषयीं ज्ञानेश्वर, ‘ शास्त्र म्हणेल जें सांडावें तें राज्यहि तृण मानावें ’ असें म्हणतात ह्याबद्दल धन्यता वाटते.

विठ्ठलपंतांनीं इहलोकीची यात्रा संपविल्यानंतर निवृत्ति, ज्ञानदेव, सोपानदेव व मुक्ताबाई हीं भावंडें आळंदीकर ब्राह्मणांच्या सांगण्यावरून पैठणकर ब्राह्मणांचें प्रमाणपत्र मिळविण्यासाठीं पैठणास गेलीं. स्वयंसिद्ध निवृत्तिनाथांना ह्यांची आवश्यकता वाटली नाहीं, पण जगदुद्धार करणाऱ्या ज्ञानराजास स्वतःच्या लौकिक उद्धाराची आवश्यकता वाटली व त्याच्याच आग्रहावरून सर्वजण पैठणास गेले.

सध्यांचें पैठण म्हणजे त्या वेळचें दक्षिणकाशी म्हणून प्रसिद्ध असलेलें प्रतिष्ठान–क्षेत्र होय. तेथें गेल्यावर तेथील ब्रह्मवृंदांसमोर आळंदीच्या ब्राह्मणांचें परिचय–पत्र निवृत्तिनाथांनीं ठेवलें. सर्व वृत्त निवेदन झाल्यावर त्या प्रतिष्ठान क्षेत्रस्थ ब्राह्मणांनींहि ‘ नाहीं प्रायश्चित्त उभयतां कुळ भ्रष्ट ’ असा आपला निर्णय दिला व ‘ अनन्यभक्तीतें अनुसरावें ’ असा आपला संदेश त्यांनीं ह्या भावंडांस दिला. ह्याच वेळेस ज्ञानदेवांनीं आपल्या अद्भुत सामर्थ्यानें एका रेड्याकडून वेद म्हणविले. पैठणाला असतांना असेच अनेक चमत्कार ज्ञानेश्वरांनीं केल्यामुळें पैठणकर मंडळी त्यांच्या तेजानें दिपून गेली, व सूर्यास पणतीनें प्रकाश दाखवावा ह्याप्रमाणें बोपदेव प्रभृति पैठणकर ब्राह्मणांनीं ह्या भावंडांस शुद्धिपत्र दिलें. शुद्धिपत्र मिळाल्यावर सर्व ब्रह्मवृंदांस वंदन करून ह्या भावंडांनीं पैठण सोडलें.

ज्ञानदेवांनीं पैठणास केलेल्या चमत्कारांनीं व सुश्राव्य कीर्तनांनीं त्यांची कीर्ति सर्व महाराष्ट्रांत पसरली होती. ज्ञानेश्वर हे जसे थोर योगी होते तसे महान् आत्मानुभवी व वैष्णव होते. यामुळें त्यांच्या दर्शनास लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊन त्यांच्यापासून अध्यात्मश्रवणाचा लाभ घेण्यासाठीं म्हणून मोठ्या श्रद्धेनें त्यांस आपल्या गांवीं नेत. अशा रीतीनें कीर्तन, पुराण ह्यांच्या मार्गानें भक्तिमार्गाचा प्रसार करीत ही मंडळी नेवासें येथें आलीं. ह्याच गांवीं शके १२१२ त ज्ञानदेवांनीं आपला प्रसिद्ध ग्रंथ

ज्ञानेश्वरी हा रचिला. मागें ब्रह्मगिरीस असतांनाच नाथसंप्रदायांतील प्रसिद्ध साधु गहिनीनाथ यांनीं निवृत्तिनाथांना नाथपंथाची दीक्षा दिली होती. निवृत्तिनाथांनीं आपल्या भावंडांनाहि ती दीक्षा देऊन जगदुद्धारास अधिकारी केलें. ज्ञानदेवांनीं गुरुमहती गातांना आपल्या ज्ञानेश्वरी ग्रंथांत अनेक वेळां निवृत्तिनाथांचा सद्गुरु म्हणून आदरानें उल्लेख केला आहे. ह्या नाथपंथाचा संबंध ज्ञानदेवांच्या घराण्याशीं फार पूर्वीपासून आहे. ज्ञानेश्वरांचे आजोबा त्र्यंबकपंत ह्यांना गोरखनाथांनीं दीक्षा दिली होती. त्याचप्रमाणें विठ्ठलभक्तीहि त्यांच्या घराण्यांत पूर्वापार चालत आलेली होती. ह्या दोन्ही परंपरेचा समन्वय करून भागवतधर्माची पताका ज्ञानेश्वरांनीं मोठ्या उत्साहानें महाराष्ट्रांत उभारली आणि म्हणूनच भागवत धर्ममंदिराचा पाया ज्ञानेश्वरांनीं रचिला असें बहिणाबाई म्हणते.

ज्ञानेश्वरीचें रचनाकार्य संपल्यानंतर ज्ञानदेव भावंडांसह आळंदीस आले. ते आळंदीस आले तेव्हां प्रसिद्ध योगिराज चांगदेव त्यांच्या भेटीस आले. त्यांनीं पत्र लिहितांना वयानें लहान म्हणून आशीर्वाद द्यावा का ज्ञानानें थोर म्हणून साष्टांग नमस्कार लिहावा हें न उमगल्यामुळें ज्ञानेश्वरास कोरें पत्र पाठविलें. तेव्हां प्रत्यक्ष शक्तीचाच अवतार अशी मुक्ताबाई म्हणाली, ‘ अजून चांगदेव कोराच आहे, त्याचा अहंभाव गेला नाहीं. ’ ह्या पत्रावर ज्ञानदेवांनीं चांगदेवांना केलेला उपदेश ‘ चांगदेवपासष्टी ’ म्हणून प्रसिद्ध असलेला ग्रंथ लिहिला. चांगदेव ज्ञानेश्वराच्या भेटीस आले ते व्याघ्रावर आरूढ होऊन व हातांत चाबूक घेऊनच. पण त्यांना सामोरे येणाऱ्या ज्ञानदेवांनीं निर्जीव भिंतीला चालण्याची आज्ञा दिलेली पाहून चांगदेवांचा गर्व हरण झाला व ते ज्ञानदेवास शरण गेले. पुढें मुक्ताबाईनीं त्यांना उपदेश केला.

आळंदीस येण्यापूर्वी ज्ञानदेवांची कीर्ति अगोदर आळंदीस आली असल्यामुळें आतां शुद्धिपत्र दाखविण्याची गरज राहिली नव्हती. उलट ह्या संसारतापापासून आपणांस शुद्ध करावें म्हणून हजारों ग्रामस्थांच्या

झुंडीच्या झुंडी ज्ञानरायांच्या चरणधुळीची अपेक्षा करूं लागल्या. आळंदीस असतांना 'बांधिली सोडीत, बुडालीं काढीत, आर्तांची सांकडी फेडीत' 'जगाचें सुख उन्नतीस आणण्याचा प्रयत्न करीत' त्यांची कालक्रमणा चालली होती. पुढें आपला हा भागवतधर्म इतरांस सांगण्यासाठीं निवृत्ति, ज्ञानदेव, नामदेव गोरोबा वगैरे संतांसह तीर्थयात्रेस निघाले. यात्रेहून आल्यानंतर ज्ञानदेवांनीं आपलें अवतारकार्य संपल्यामुळें आपली समाधि घेण्याची इच्छा व्यक्त केली. तेव्हां नामदेवादि संतांना फार वाईट वाटलें.

इंद्रायणीकांठच्या श्रीसिद्धेश्वरासमोरील नंदी उचलून तेथून आंत जाऊन ज्ञानदेवांच्या समाधीची जागा तयार करण्यांत आली होती. सर्वांचे कंठ दुःखानें दाटून आले व डोळे आसवांनीं भरून आले. ज्ञानदेवांनीं भगवंतांची १०८ ओव्यांनीं स्तुति करून समाधिप्रवेश केला. ही पुण्यतिथि शके १२१५ कार्तिक वद्य १३ गुरुवार ही होय.

ज्ञानदेवांनीं समाधि घेतल्यानंतर आठ महिन्यांतच त्यांच्या भावंडांनींहि आपली इहलोकींची यात्रा संपविली. ज्ञानदेवानंतर सोपानदेवांनीं बरोबर एक महिन्यानें मार्गशीर्ष वद्य १३ स सासवड येथें जिवंत समाधि घेतली. निवृत्ति, मुक्ताबाई व इतर संतमंडळी तीर्थयात्रा करीत करीत आपेगांवाहून तापीतीरीं मेहूण ह्या गांवीं आली. ह्या गांवीं वैशाख वद्य १२ स वीज कडाडली व तींत मुक्ताबाई विलीन झाली. शक्तींत शक्ति मिळून गेली. महानुभाव ग्रंथकर्त्री महदंबा सोडल्यास मुक्ताबाई ही मराठींतील पहिली श्रेष्ठ कवयित्री ठरते. तिनें चांगदेवाचा उद्धार केला, ह्यावरून तिचा अधिकार केवढा मोठा होता हें दिसून येतें. मुक्ताबाईचे 'ताटीचे अभंग' मोठे रसाळ म्हणून प्रसिद्ध आहेत, ज्ञानदेव रुसून खोपटांत जाऊन बसले व त्यांनीं ताटी ( दार ) लावून घेतली, तेव्हां त्यांना उद्देशून 'आपण उद्धरूनी जगा उद्धरा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा' अशा उल्लेखाचे अभंग मुक्ताबाईनें रचिले. अशी ही महाराष्ट्र कवयित्री शके १२१५ त वैशाख वद्य १२ स विजेंत विलीन झाली. आधींच निवृत्त असलेले निवृत्तिनाथ भावं-

डांच्या वियोगानें पूर्णच निवृत्त झाले. त्यांनीं ज्येष्ठ वद्य १२ स त्र्यंबकेश्वरीं ब्रह्मगिरीच्या पायथ्याजवळ जिवंत समाधि घेतली. ज्या डोंगराजवळ त्यांनीं जगदुद्धाराचें व्रत स्वीकारलें त्या डोंगराच्या पायथ्याशीं त्यांनीं आपल्या अवताराची समाप्ती केली.

कै. भारदे ह्या नांवाच्या एका चिकित्सक पंडितांनीं 'सुधारक' पत्रांतून सन १८९८ मध्यें अभंगकर्ता ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरीकर्ते ज्ञानदेव हे दोन होत असा प्रश्न उपस्थित केला होता. ज्ञानेश्वरीची प्रौढ भाषा व अभंगांची सोपी भाषा, आपेगांव व आळंदी येथील दोन समाध्या आणि ज्ञानेश्वरींत नसणारा विठ्ठलाचा उल्लेख ह्या मुद्दयावर कै.भारदे ह्यांनीं आपली तर्काची इमारत रचली होती. परंतु कै. पांगारकर, प्रा. रा. द. रानडे, कै. भिंगारकर वगैरे विद्वानांनीं त्यांचीं विधानें खोडून ह्या प्रश्नाचा आतां निकाल लावला आहे व ज्ञानेश्वरीचा कर्ता ज्ञानेश्वर व अभंगांचा कर्ता ज्ञानेश्वर एकच हें आतां निश्चित केलें आहे.

महाराष्ट्र वाङ्मयांत मानाचें स्थान पटकावून बसणारा ज्ञानेश्वरी हा ग्रंथ ज्ञानेश्वरांनीं शके १२१२ त लिहिला. ह्याविषयीं प्रत्यक्ष उल्लेखच आहे. 'शके बाराशतें बारोत्तरें । तैं ज्ञानदेवें टीका केली । सच्चिदानंदबाबा आदरें लेखकु जाहला ॥' असा ज्ञानेश्वरीचा रचनाकाल ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायांत दिला आहे. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ ( ओव्या ९०३२ ) अत्यंत सरस उतरला, पण तो ग्रंथ भगवद्गीतेच्या आधारें रचलेला होता. तेव्हां स्वतंत्र कांहीं सांगावें असें निवृत्तिनाथांनीं आज्ञापिल्यामुळें ज्ञानेश्वरांनीं अमृतानुभव किंवा अनुभवामृत नांवाचा ८०६ ओव्यांचा व ५ श्लोकांचा ग्रंथ लिहिला. हे पांच श्लोक संस्कृतमध्यें आहेत म्हणून हा ग्रंथ ज्ञानेश्वरीच्या आधींचा असावा असें कांहीं पंडितांचें म्हणणें आहे. पण तें म्हणणें सर्वमान्य झालेलें नाहीं. चांगदेवपासष्टी, नमनाच्या १०८ ओव्या, हरिपाठाचे २७ अभंग, योगवासिष्ठ असे इतर ज्ञानेश्वरांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

ज्ञानेश्वरी ग्रंथांत ज्ञानेश्वरांची काव्यसरिता दुथडी वाहतांना आपणांस दिसते. दृष्टान्त, रूपकें इत्यादि अलंकारांचा सुंदर उपयोग त्यांच्या ग्रंथांत ठायीं ठायीं वोसंडतांना दिसतो. ज्ञानदेव हे जसे सर्वश्रेष्ठ संत आहेत तसेच ते सर्वश्रेष्ठ कवीहि आहेत. ज्ञानदेवांचे सर्वच ग्रंथ काव्ययुक्त असले तरी ज्ञानेश्वरीचें काव्यसौंदर्य कांहीं निराळेंच आहे. त्यांच्या प्रतिभेचें सामर्थ्य अति अवर्णनीय आहे. तत्त्वचर्चा आणि काव्य ह्यांची एकमेकांस शोभून दिसणारी सांगड ज्ञानेश्वरांचीच प्रतिभा घालूं जाणें. अमूर्त तत्त्वज्ञान शब्दांनीं मूर्त करून दाखविण्याची त्यांची हातोटी कांहीं विलक्षण आहे. त्यांच्या भाषेची मुरड इतकी नाजूक आहे कीं अतींद्रिय वस्तूंच्या वर्णनांतहि श्रोत्याला व्यक्त सौंदर्य पाहतां यावें. म्हणूनच आत्मविश्वासानें ते म्हणतात कीं, ' शब्दांच्या रसाळपणाच्या लोभानें श्रवणेंद्रियासहि जिभा फुटतील. ' ' ऐका रसाळपणाचिया लोभा । कीं श्रवणींचि होती जिभा ॥ ' शांतरस हा ज्ञानेश्वरांच्या काव्याचा रसराज आहे. पण अकराव्या अध्यायांत शांत आणि अद्‌भुत यांची सोज्ज्वळ मिळणी झालेली असून इतर रसांसहि तेथें आमंत्रण केलेलें आहे. ज्ञानेश्वरीपेक्षांहि अभंगांचा प्रेमळपणा, भक्तिरस अधिक रसाळ आहे. ज्ञानेश्वरींत गुरुभक्ति, श्रोतृसमूहाबद्दल आदर, मराठी भाषेचा अभिमान ह्या गोष्टी वारंवार दिसून येतात. काव्याच्या बाह्यांगाकडेहि ज्ञानेश्वरांनीं विशेष लक्ष दिलें आहे. रेखीव शब्दांची योजना, नादमाधुर्य इत्यादि गोष्टींकडे त्यांनीं चांगलें लक्ष पुरविलें आहे. आपण मराठींत अशी सुंदर शब्दरचना करूं कीं तिच्या कोमलतेनें लोकांनीं मोहून जावें. ते म्हणतात ' जियें कोवळिकेचेनि पाडे । दिसती नादींचे रंग थोडे । वेधें परिमळाचें वीक मोडे । जयाचेनि ॥ ' आणि ही शब्दांची सजावट पाहून साहजिकच श्रोते म्हणतात—' तंव श्रोते म्हणती दैव । कशी बोलाची हवाव । काय नादातें हन बरव । जिणोनि आली ॥ हां हो नवल नोहे देशी । मऱ्हाटी बोलीजे तरी ऐशी । वाणें उमटताहे आकाशीं । साहित्य रंगाचे ॥ ' ज्ञानदेवांच्या दृष्टान्ताचा विशेष असा आहे कीं वर्ण्य विषय तर

त्यांच्या साह्यानें स्पष्ट केला जातोच, पण कधीं कधीं एकाच विधानासाठीं ते लागोपाठ सात आठ दृष्टान्त देतात. त्यांच्या नावीन्यपूर्ण दृष्टान्ताचें इतर संतांनींहि अनुकरण केलेलें दिसतें. शब्दाची व्याप्ति सांगतांना ते म्हणतात–‘ जैसें बिंब तरी बचकेएवढें । परि प्रकाशा त्रैलोक्य थोकडें । शब्दाची व्याप्ति तेणें पाडें । अनुभवावी ॥ ’ गुणातीताचें वर्णन करतांना ‘ कां तारांगणीं लोपावें । सूर्यकांती उद्दीपावें । कमळीं विकासावें । जावें तयें॥ ये कोणाचीं कार्जी कहीं । सविता जैसा नाहीं ॥ ’ असा सूर्याचा दृष्टान्त त्यांनीं दिला आहे. दृष्टान्ताप्रमाणेंच रूपकाचाहि त्यांनीं वारंवार उपयोग केला आहे. सोळाव्या अध्यायाच्या आरंभाचे चित्सूर्यावरचें ‘ अद्वय आब्जिनी विकाशु ’ हें रूपक ह्या दृष्टीनें उल्लेखनीय आहे. ज्ञानदेवांच्या काव्यांतील आणखी एक विशेष म्हणजे स्वसामर्थ्याविषयीं त्यांचा आत्मप्रत्यय व त्यांची स्वतंत्र लेखन–पद्धति हा होय. ‘माझा मऱ्हाठाचि बोलु कौतुकें । परि अमृतातेंही पैजा जिंकें ॥ ’ ‘ देशियेचेनी नागरपणें । शांतु शृंगारातें जिणें । तरी ओंविया होती लेणें । साहित्यासी ॥ ’ अशा ओव्यांतून हा स्वाभिमान चांगला दिसून येतो.

ज्ञानेश्वरांची काव्यसंपदा अत्यंत श्रेष्ठ दर्जाची असली तरी त्यांचें काव्य म्हणजे त्यांचें इतिकर्तव्य नव्हतें. ते महान् आत्मानुभवी संत होते. तत्त्वज्ञान व अध्यात्म हा त्यांच्या ग्रंथांचा आत्माच होय. त्यांनीं काव्यांत आपलें असावें म्हणून तत्त्वज्ञान सांगितलें नाहीं, तर तत्त्वज्ञान कथनासाठीं त्यांनीं काव्य राबवलें असें म्हणणें अधिक बरोबर होईल. ज्ञानेश्वर पूर्ण अद्वैत मताचे पुरस्कर्ते होते. एक आत्माच सर्व रूपांनीं नटलेला आहे, अवघा एक आत्माच आहे, असें ज्ञानदेवांच्या पूर्णाद्वैताचें थोडक्यांत स्वरूप सांगतां येईल. सर्व विश्व हा आत्माच आहे असा त्यांचा सिद्धांत असल्यामुळें ते त्या विश्वांत मिळून जातात, जडवादी संन्याशाप्रमाणें विश्वापासून फटकून राहात नाहींत. त्यांचें नीतिशास्त्रहि अध्यात्माच्या पायावर रचिलेलें आहे. इंद्रियांचा निग्रह करावा अशी शिकवण ते देतात. इंद्रियें मारावींत अशी संन्यासी मनोवृत्तीची शिकवण ते कधीं देत नाहींत.

' कार्याकार्य विवेकीं । शास्त्रेंचि करावीं पारखीं ॥ '

अशी प्रापंचिकांना योग्य अशी शिकवण ते वारंवार देतात. उत्तम निष्कामकर्माचरणानें अंतःकरणांतील रजतमांचा नाश करून अंतःशुद्धि करणें हीच मोक्षाची पहिली पायरी होय असें ते म्हणतात. ज्ञानदेव हे ज्ञानी असूनहि भक्त होते. त्यांच्या ग्रंथांचा महाराष्ट्रीय वाङ्मयावर न पुसटणारा असा संस्कार झाला आहे. महाराष्ट्रीय संतांनीं ज्ञानेश्वरी तर अगदीं आत्मसात् केली आहेच. पण वाङ्मयाप्रमाणें महाराष्ट्रीय तत्त्वज्ञानावरहि ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानाची छाप पडलेली आहे. गेलीं सहाशें वर्षें ज्ञानेश्वरी हा ग्रंथ म्हणजे महाराष्ट्रियांना अध्यात्मज्ञानाची उतारपेठ होऊन राहिला आहे. मराठी भाषेची सेवा ज्ञानेश्वरांनीं फार केली. सामान्यांच्या भाषेचा अंगीकार करून सामान्य लोकांच्या घरोघर श्रेष्ठ प्रतीचें तत्त्वज्ञान ज्ञानदेवांनीं पोंचविलें आहे. बहुजनसमाजाचें विस्कळित जीवन सुसंघटित करण्यासाठींच त्यांनीं भागवतमंदिराची रचाई केली. उच्च वर्णियांची अरेरावी, मुसलमानी आक्रमण, शैव वैष्णव पंथांच्या लढालढी ह्यांतूनहि हिंदुधर्माची ध्वजा फडकती ठेवण्याचें कार्य ह्या भागवत–मंदिरानेंच केलें. ह्या मंदिराचा पाया ज्ञानेश्वरांनीं घातला हें सुप्रसिद्धच आहे. जनतेंत मराठी भाषेविषयीं नितांत प्रेम उत्पन्न करण्याची ज्ञानदेवांची कामगिरी सर्वांत अधिक संस्मरणीय आहे. आणि म्हणूनच कोणाहि महाराष्ट्र–शारदेच्या सेवकाला ह्या महाराष्ट्र वाग्वीराला मानाचा पहिलाच मुजरा करावयास हवा.

• • •

# नामदेव

:: ४ ::

पंढरीच्या राउळीं पांडुरंगापुढें एक बालक प्रेमळ आर्त नजरेनें पाहात बसला होता. विठ्ठलाच्या मूर्तीला त्याचें नेत्रजल न्हाऊ घालीत होतें. त्या बालकाच्या थरथरत्या हातांत एक दुधाची वाटी होती. देवाला एकदां निर्वाणीचा बोल देऊन त्या बालकानें आपल्या हातांतील ती गोरसाची वाटी विठ्ठलाच्या मुखीं लावली. भावाच्या भुकेल्या देवानें नामदेवाची ती दुधाची वाटी रिकामी केली. अशा त्या बालभक्त नामदेवाच्या प्रेमपाशांत परमेश्वर पूर्णपणें गोवला गेला होता. म्हणूनच संत वर्णन करितात—

‘ नामदेव कीर्तन करी । पुढें वा नाचे पांडुरंग । ’

ह्या भक्तशिरोमणि नामदेवाचें घराणें मूळचें परभणी प्रांतांतील नरसी–ब्रामणी ह्या गांवचें. नामदेवाचे वडील दामाशेटी शिंपी व आई गोणाई हे नरसी–ब्रामणी सोडून पंढरपुरास आले आणि पंढरपुरासच ह्या घराण्याचा कुलदीप जो नामदेव तो शके ११९२ मध्यें जन्मास आला. नामदेवास विठ्ठलभक्तीचें बाळकडू आईबापापासूनच मिळालें. पंढरीनाथाची भक्ति ही ह्या घराण्यांत पूर्वीपासून चालत आलेली होती. नामदेवाचें विठ्ठलप्रेम लहानपणापासूनच दुथडी वाहूं लागलें होतें. नामदेवाच्या पूर्वचारित्राला थोडासा कलंक लागेल असा मुद्दा म. भा. भू. आजगांवकरांनीं मांडला होता. नामदेव हा तरुणपणीं दरोडेखोर होता. पुढें आंवढ्या नागनाथाच्या देवळांत त्याला उपरति झाली आणि मग तो हरिभक्त झाला. असें सप्रमाण मांडण्याचा आजगांवकरांनीं प्रयत्न केला आहे. पण त्यांचें हें विधान श्री. पाटसकर ह्यांनीं खोडलें असून कै. पांगारकर व डॉ. तुळपुळे ह्यांनींहि त्यांचें मत उचलून धरलें आहे. त्यामुळें नामदेवांच्या पूर्व–चारित्राचा कलंक आतां पार धुवून गेला आहे. हा बालभागवत नामदेव लहानपणापासूनच संसारपाशापासून मुक्त होता. अक-

राव्या वर्षीच नामदेवाचें गोविंदशेट सदावर्ते यांची मुलगी राजाई हिच्याशीं लग्न झालें.परंतु परमेश्वरचरणीं गुंतलेलें नामदेवाचें मन कांहीं ह्या लग्नबंधनानें माघारलें नाहीं. आपल्या नामदेवानें व्यापार करावा, चारचौघांप्रमाणें संसार करावा असें गोणाई राजाई यांना वाटे—

गोणाई म्हणे नाम्या सोडी देवपिसें । बुडाविसी कैसें घर बळें ।
तर नामाकेशवाचा म्हणे । माझें हृदयीं नारायण ।

चौदा पंधरा माणसांचें कुटुंब घरांत नांदत होतें. घरांतला कर्ता सवरता तर नामदेव. पण त्याचें लक्ष तर प्रपंचांतून केव्हांच उडून गेलें होतें. सारा भार राजाईवर पडल्यानें राजाई संतापून म्हणते–'लावोनि लंगोटी जालेती गोसावी । आमुची ठेवाठेवी कोण करी' ॥ पण नामदेवाच्या मनावर ह्या त्राग्याचा कांहीं परिणाम झाला नाहीं. संतांच्या संगतींत नामामृत सेवन करण्यांत काळ कंठावा असें नामदेवाचें जीवन येथून पुढें सुरू झालें. 'पंढरीनाथापुढें कीर्तन करावें,नामसुख घ्यावें व लोकां द्यावें' हा नामदेवाचा व्यवसाय होऊन बसला होता. त्याच्या भक्तीचा महिमा पसरूं लागला होता. त्याच्या निर्मल भक्तीच्या प्रभावानें परिसा भागवतासारखा अभिमानी वैष्णवहि त्याच्या चरणीं लीन झाला. नामयाची दासी जनी तर त्याच्या जीवनांतच पूर्ण मिसळून गेली होती. नामदेवाची श्रेष्ठता त्याच्या घरांतल्या लोकांनाहि पटून तेहि नामदेवचरणीं लीन झाले. हें सर्वच घराणें विठ्ठलभक्तींत रंगून गेलें. सर्वांनीं थोडी अभंगरचना केली. त्यांत नामदेव-पुत्र विठा आणि नारा यांचे अभंग उल्लेखनीय आहेत.

मराठी वाङ्मयाच्या इतिहासाच्या दृष्टीनें आणि नामदेवाच्या चरित्राच्या दृष्टीनें महत्त्वाचा प्रसंग म्हणजे ज्ञानेश्वर, नामदेव इत्यादि संतांच्या तीर्थयात्रेचा प्रसंग होय. ज्ञानेश्वरासारख्या महान् योगीराजानें सुद्धां नामदेवासारख्या भगवद्भक्ताच्या गोड सहवासाचें सुख लाभावें म्हणून तीर्थयात्रेचा योग जुळवून आणला. नामदेवानें या तीर्थयात्रेच्या सोहळ्याचें वर्णन

आपल्या तीर्थावळीच्या अभंगांत फार सुरस रीतीनें केलें आहे. 'तुझिये संगतीचें नित्यसुख घ्यावें' म्हणून मी तीर्थयात्रेचा बेत ठरविला असें ज्ञानेश्वर नामदेवास म्हणाले, तेव्हां नामदेवांनीं विठ्ठलाची अनुज्ञा घेण्यास ज्ञानेश्वरास सांगितलें ज्ञानेश्वरांनीं विचारणा करितांच 'प्रत्यक्ष परब्रह्ममूर्ति ज्ञानेश्वर करितसे आदर संगतीचा' असें नामदेवास म्हणून देवानें आपल्या कृपेचें पोसणें' असा जो नामदेव तो ज्ञानेश्वरहातीं सोपविला. नामदेवाचा वियोग देवाला असह्य होता आणि देवाचे चरण दुरावल्यानें नामदेवासहि पुढें पाऊल टाकवेना. पंढरपूर सोडून यात्रेच्या रोखानें संतमेळा निघाला, परंतु नामयाचें चित्त पंढरीच्या राउळींच घोटाळत होतें.

'प्रेमाचा जिव्हाळा तुझ्या हृदयीं आला।
तूं कां वेळोवेळां खंती करिसी ॥'

असें म्हणून ज्ञानेश्वर वारंवार त्याची समजाविशी करीत होते. अशा थाटानें पश्चिम प्रभास, द्वारका इत्यादि क्षेत्रें व मोक्षपुऱ्या सर्व पाहात हे जीवन्मुक्त दोन्ही भक्त आणि ज्ञानी परत फिरले. तीर्थयात्रेची ज्ञानेश्वरांची आवड ही वरपांगी होती. त्यांना भक्तशिरोमणि नामदेवाच्या सहवासाचें सुख लुटायचें होतें. यात्रेहून परततांना दोघेहि संतश्रेष्ठ तृषाक्रांत झाले होते. ग्रीष्माचा दाह सृष्टीला जाळीत होता. पाण्याचें टिपूस कुठें दृष्टीच्या टापूंत येत नव्हतें. थोडी वाटचाल झाल्यावर एक जुनाट कूप त्यांना दिसला. जवळ जाऊन पाहतात तों ती विहीर कोरडी ठणठणीत पडली होती. योगिराज ज्ञानेश्वरांनीं आपल्या योगसामर्थ्याच्या साह्यानें त्या कूपांतून जल मिळवून आपली तहान भागविली. देवाचा भोळा भक्त नामदेव ही योगक्रिया कोठून आणणार ? त्यानें 'कायावाचामनें विनटलों चरणांसी । तो मी शरण आणिकासी जाऊं कोणा ॥' अशी आर्तवाणीनें देवाची आळवणी सुरू केली. तोंच ती कोरडी विहीर पाण्यानें भरून गेली. 'तंव कडकडीत कूप उदकें वोसंडला।' नामदेवाच्या भक्तीचा हा महिमा पाहून ज्ञानीयांच्या राजाला डोळयाचें पारणें

फिटल्यासारखें वाटलें. दोघे भक्त पंढरपुरीं दाखल झाले. ज्ञानेश्वरांनीं विठ्ठलाच्या स्वाधीन नामयास केलें. पंढरपुरास मांडें मोठ्या थाटानें करण्यांत आलें. गोरा कुंभार, सावता माळी, मुक्ताबाई, सोपान, निवृत्तिराज असा सारा संतमेळा पंढरपुरीं जमला. ह्या मेळ्याचें वर्णन परिसा भागवतांनीं ' हरिदासांचे भार मिरवती गरूडटके गोमटे । धन्य तटीतीर बरवे वाळुवंटी । ' असें केलें आहे. ह्या भक्तमंडळांत एका नामदेवाशिवाय सर्वांनीं गुरूपदेश घेतला होता. साक्षात् विठ्ठलानें आपणांस भक्तिसुख दिलें असतां गुरूपदेशाची आपणांस काय जरूरी आहे अशी थोडी ' ग ' ची बाधा नामदेवांना झाली होती. सर्व संतांची करवली मुक्ताबाई. तिला नामदेवासारख्या चंदनाभोंवतीं अहंता सर्पाचा पडलेला हा वेढा पाहवला नाहीं. तिनें सर्वांत वयानें वडील व विरक्त अशा गोरोबाकाकांना सर्व संतांची परीक्षा घेण्यास सांगितलें. गोरोबांनीं आपलें अनुभवाचें थापटणें सगळ्यांच्या मस्तकीं हाणून पाहिलें. सर्व त्या परीक्षेंतून उत्तीर्ण झाले. पण नामदेव मात्र कच्चा घट ठरला.

नामदेव हा भक्तश्रेष्ठ होता. त्याचें विठोबावरील प्रेम अवर्णनीय होतें. पण त्याच्या भक्तीला ज्ञानाची जोड अजून मिळालेली नव्हती. पंढरपूरच्या विठ्ठलाच्या मूर्तींत त्याला परमेश्वराचा साक्षात्कार होत होता. अजून सर्वभूतीं परमेश्वर त्याला दिसला नव्हता. म्हणूनच तो गोरोबाकाकाकडून कच्चा घट ठरला. ज्ञानेश्वरांनीं त्याला गुरूपदेश घेण्यास सांगितलें. त्यांनीं आंवढ्या नागनाथाच्या देवळांतील विसोबा खेचरास शरण जाण्यास नामदेवास सांगितलें. नामदेव नागनाथाच्या देवळांत गेला तों विसोबा खेचर एका महादेवाच्या पिंडीवर पाय ठेवून बसले होते. भक्तराज नामदेवाला हें पाहवेना. त्यानें विसोबास पाऊल काढण्यास सांगितलें. तेव्हां ' जेथें नाहीं देव । तेथें ठेवी पाव । ' असें विसोबानेंच त्याला सांगितलें. नामदेवानें त्याच्या सांगण्याप्रमाणें केलें. परंतु जिथें पाय ठेवावा तिथें महादेवाची पिंडी दिसावी असा प्रकार होऊं लागला. तेव्हां ' देवावीण

ठाव । हें बोलणेंचि वाव ॥ ' हें नामदेवाच्या ध्यानीं आलें आणि त्यानें विसोबाचे चरण गुरूपदेशासाठीं घट्ट धरिले. तेव्हां ' खेचर म्हणे नामयातें । अवघाचि देव ॥ ' ' नाम आणि रूप । दोनी जया नाहीं । तोचि देव पाहीं । येर मिथ्या ॥ " असा उपदेश विसोबा खेचरांनीं नामदेवास केला. ह्या गुरूपदेशानें नामदेवाच्या भक्तीस ज्ञानाचा उजळा मिळाला. त्याच्या ज्ञानरूप भक्तीच्या तेजानें अनेकांच्या जीवनाला उजळा मिळाला.

नामदेवाची भक्ति सगुणाकडून निर्गुणाकडे वळली. त्याला परमेश्वराचा साक्षात्कार अखिल विश्वमात्रांत होऊं लागला. द्वैताची ओळख बुजून अद्वैताची साक्ष पटली. ही साक्ष पटविणाऱ्या ज्ञानेश्वरादिकांच्या समागमाचें सुख नामदेवांना सरासरीं सहा वर्षें मिळालें. सहा वर्षांत ह्या सर्व संतांनीं नामसंकीर्तन भक्तीनें महाराष्ट्राला खरोखरच भूवैकुंठ बनविलें. पंढरपूर, नेवासें, आळंदी, पैठण, सासवड, मंगळवेढें, अरण, तापीतीर हा महाराष्ट्राचा सारा भाग ह्या संतांनीं कीर्तनसुखामृतानें भिजवून टाकला होता. नंतर ज्ञानेश्वर माउलीनें आळंदीस समाधि घेतल्यानंतर तोच महाराष्ट्र दुःखाश्रूंनीं भिजून गेला. ज्ञानेश्वरांच्या वियोगानें शिणलेल्या मनाला विसांवा देण्यासाठीं नामदेव पुन्हा तीर्थयात्रेस गेले.

वारकऱ्यांचा मेळावा बरोबर घेऊन मथुरा वृंदावन करीत नामदेव पंजाबमध्यें गेला. भागवत-धर्माची ध्वजा त्यानें पंजाबांत फडकाविली. ही त्याची कामगिरी फार महत्त्वाची आहे. तिथें १८ वर्षें वास्तव्य करून नामदेवानें आपल्या भागवत धर्माची शिकवण तिथल्या लोकांना दिली. ह्या त्याच्या प्रशंसनीय कामगिरीमुळें तर भागवत मंदिराची रचाई त्यानें केली असें म्हटलें जातें. इतिहासाच्या दृष्टीनें महाराष्ट्राचें पंजाबवरील हें आक्रमण फार महत्त्वाचें आहे. नामदेवानें स्वतः हिंदींत कांहीं अभंग केले. ते अद्यापहि उपलब्ध आहेत. शिखांच्या ' ग्रंथसाहेब ' ह्या धर्मग्रंथांत नामदेवाचे कांहीं अभंग ग्रथित करण्यांत आलेले आहेत. घोमान नांवाच्या

एका खेडेगांवांतील मंदिरांत ' नामदेवकी मुखबानी ' नांवाचें हस्तलिखित कवितेचें बाड संग्रह केलेलें आहे. शिवाय ' नामदेवकी जन्मसाखी' नांवाचें नामदेवाचें चरित्रहि तेथें असून त्यावर आषाढ महिन्यांत प्रवचनें होतात. नामदेवाच्या अनुयायांना बाबा नामदेवयानी असें म्हणतात.

' घट घट अंतर सरब निरंतर । केवल एक मुरारी । '
' हरि हरि करत मिटे सभि भर्मा । हरिको नाम लेक धर्मा ॥ '

असें नामदेवाचे अनेक हिंदी अभंग मिळतात.

नामदेवाच्या अभंगांच्या दोन तीन गाथा उपलब्ध आहेत. आवटे यांच्या गाथेंत नामदेवाचे म्हणून २५०० अभंग छापलेले आहेत. परंतु त्यांतील चार पांचशेंच अभंग नामदेवाचे आहेत. इतर नामदेव नांवधारी अशा कांहीं दुसऱ्या संतांचे अभंग त्यांत घुसडले गेले असावेत. त्यांतल्या त्यांत विष्णुदास नामा नांवाच्या नामदेवाच्या एका ब्राह्मण शिष्यानें लिहिलेले बरेच अभंग त्यांत मिसळले आहेत. म्हणजे शतकोटी अभंगरचना करण्याची इच्छा व्यक्त करणाऱ्या नामदेवाचे फक्त चार–पांचशेंच अभंग उपलब्ध आहेत. तरी ह्या उपलब्ध अभंगावरून नामदेवाची श्रेष्ठता आपणांस सहज समजून येते. नामदेवाच्या अभंगांपेक्षांहि तुकारामाचे अभंग लोकांच्या तोंडीं जास्त आहेत. पण तुकाराम आणि नामदेव यांचे अभंग ताडून पाहिल्यास कित्येक तुकारामाचे अभंग नामदेवाच्या अभंगांतून उचलून घेतल्यासारखे वाटतात. ह्यावरून नामदेवाच्या अभंगांची योग्यता आपल्या लक्षांत येते. नामदेवाचे तीर्थावळीचे अभंग प्रसिद्ध आहेत. आद्य चरित्रकार ह्या दृष्टीनें नामदेवाचें स्थान मानाचें आहे. ज्ञानेश्वरांच्या चरित्राबद्दल जर विश्वसनीय माहिती आपणांस कोठें मिळत असेल तर ती नामदेवाच्या अभंगांतच. ज्ञानेश्वरांचें चरित्र नामदेवानें फार सुरस रीतीनें लिहिलें आहे. समाधि प्रकरण तर करुणरसानें ओथंबल्यासारखें आहे. चरित्रकार नामदेव श्रेष्ठ दर्जाचा आत्मचरित्रकारही आहे. त्याच्या जीवनाच्या विकासाचा प्रतिध्वनि त्याच्या अभंगांत पूर्णपणें उमटला आहे.

घरच्या अज्ञ माणसांचा जाच, विठोबाच्या मूर्तीची भक्ति, विठोबाचें प्रेम आपणांसच मिळालें आहे असा अभिमान, विसोबानें ज्ञानमार्ग दाखविला, निर्गुणाची उपासना नामदेवानें केली हे सारे नामदेवाच्या जीवनांतले टप्पे त्याच्या अभंगांत आपणांस पहावयास सांपडतात. नामदेवाचें साधें भोळें कवित्व आपल्या हृदयाचा ठाव घेतें. त्याचे कृष्णलीला वर्णनाचे अभंग फार गोड आहेत. आपली देहरूपी गाय कृष्णाला सांभाळण्यास सांगणारा त्याचा 'बोबडा' आपल्या मनाचा बोबडेपणा चालवितो. 'कुत्ना थमाल ले थमाल अपुल्या गाई' हे त्याचे शब्द सहज आपल्या जिभेवर खेळतात. देवाचें स्वरूप वर्णन करितांना 'निर्गुण गुणासी । परब्रह्म ठसावलें । भक्त पुंडलिका लाधले । गौप्य केलें प्रगट ॥' अशी निर्गुण-सगुणाची तो सांगड घालतो. परमेश्वर सर्वव्यापी आहे असें म्हणतांना 'बीजाचिया पोटीं वटाचा विस्तार । सर्व तो आकार तुझाची आहे ।' असा दृष्टान्त तो देतो. 'शंखचक्र हातीं गळा वैजयंती । कुंडलें तळपती श्रवणामाजीं ॥' असें ज्या परमेश्वराचें तो वर्णन करितो तो देव 'धर्माचिये घरीं उच्छिष्टें काढी । जाहला बराडी देवराव ॥' 'भक्तांची आवडी मोठी त्या देवासी ।' म्हणून तो देव 'सद्भक्तिप्रेमासी लांचावला आहे' असें नामदेव म्हणतो. देवाचें वर्णन करणारा नामदेव 'संतचरणींचें रज । हेंचि सर्व तीर्थ मज ।' असा संतांचा महिमा गातो. नामदेवाचे अभंग भक्तिसरितेवरील तरंग आहेत. त्याच्या भक्तींतील लाडिकपणा मोठा कौतुक करण्यासारखा आहे. भक्तांनींच परमेश्वराला परमेश्वरपद प्राप्त करून दिलें. असें म्हणतांना तो म्हणतो 'आम्ही शरणागती केलासें सरता, एऱ्हवीं अनंता कोण पुसे ।' 'घेसी तेव्हां देसी ऐसा अससी उदार ।' असें म्हणून त्यानें देवाचा कमीपणाहि काढण्यास कमी केलें नाहीं. 'किती तुला देवा येऊं काकुळती ।' म्हणून तो एकदां विनवणी करतो, तर 'सर सर परता अगुणा गोपाळा ।' असा त्रागाहि तो करतो. त्याच्या भक्तीचें स्वरूप 'सर्वांभूतीं समदृष्टि हेचि भक्ति गोड मोठी' असें आहे आणि ह्या भक्तीला 'नामापरता मंत्र

नाहीं ' असा त्याचा विश्वास आहे. विठ्ठलाचा धावा करितांना ' तूं माझी पक्षिणी मी तुझें अंडज । चारा घाली मज पांडुरंगे । ' ' अग्निमाजीं पडे बाळू । माता धावे कनवाळू ।। ' असे अनेक दृष्टान्त त्यानें दिले आहेत. त्याचा भक्तिनिर्धार मोठा कडक आहे. ' देह जावो अथवा राहो । माझा पांडुरंगी दृढ भावो ।। ' असें तो म्हणतो. भक्तिमार्गापुढें इतर मार्गांची त्याला किंमत वाटत नाहीं. ' नामेविण कांहीं आम्हांपाशीं नाहीं। विचारोनी पाही पांडुरंगा । ' असा त्याचा रोकडा जबाब आहे. योगमार्गहि तो तुच्छ लेखतो. कारण ' योगियांच्या ध्यानीं क्षण एक न रिगे । तो सुखी गोष्टी सांगे नामयासी ।। ' अशी त्याची श्रद्धा आहे. नाम हेंच त्याचें सर्वश्रेष्ठ तत्त्व आहे. ' तहान नेणें भूक नेणें । अखंड पारणें नामीं तुझ्या । ' हा त्याचा जीवनधर्मच ठरून गेला होता. म्हणूनच ' करूं हरिनाम कीर्तन । तोडूं देहाचें बंधन । ' अशी आस तो बाळगतो. नाम-संकीर्तनापुढें इतर सर्व सुखें त्याला तुच्छ वाटतात. ' भोगावरी आम्ही घातला पाषाण । मरणामरण आणियेलें ।। ' अशी त्याची निर्वाणीची भाषा आहे. नामदेवानें अद्वैताचा स्वीकार करूनच द्वैताचे गोडवे गायिले आहेत. निर्गुणाला महत्त्व देऊन नामदेवानें सगुणोपासना केली आहे. ' आकारलें तितुकें नाशवंत आहे । देव आणि भक्त कैचे तेथें ।। ' असें त्याचें तत्त्वज्ञान आहे. भक्तीच्या बैठकीवर त्यानें आपला हा वेदान्त प्रतिपादन केला आहे. संसार हा सत्य नसून तो एक माया आहे वासना, मोह, लोभ हीं दुःखाचीं कारणें आहेत. संसार हा मृगजळासारखा आहे. म्हणून देवाला शरण जाण्यास ते आपणांस सांगतात. म्हणजे ' तो देव अवघ्या संसाराचें वेसणें मोडील । अवघेंचि तोडील मायाजाळ । ' पण तो परमेश्वर जाणण्यास जाणिवेचा उपयोग नाहीं. तेथें भावचि प्रमाण. 'नामा म्हणे देवा न ये अनुमाना। वर्णिता पुराणां टक पडे । ' नामदेवाच्या वाणींत अंतःकरणाचे कढ आहेत, द्राक्षांचे घड आहेत, भक्ताची आर्तता आहे, भक्तीची पूर्तता आहे. नामदेवाची भाषा सोपी, साधी आणि रसाळ अशी आहे, खर्च, जमा, रोजनामा, तुर्क असे कांहीं फारसी शब्द त्याच्या अभंगांत आढळतात.

अशा ह्या आपल्या लाडक्या भक्ताला विठ्ठलानें शके १२७२ मध्यें आपल्या चरणीं कायमचा आसरा दिला.

● ● ●

महाराष्ट्राचे आदिकवि म्हणून जसें मुकुंदराजांचें नांव घेतलें जातें त्याप्रमाणें महाराष्ट्राची आदि कवयित्री म्हणून महानुभावपंथीय श्रेष्ठ कवयित्री महदाइसा ऊर्फ महदंबा हिचेंच नांव घ्यावें लागतें. महानुभाव ग्रंथकारांत महदंबेचें स्थान अजूनहि विशिष्ट महत्त्वाचें मानलें जातें.

महाराष्ट्राची गंगा म्हणून समजली जाणारी जी गोदावरी नदी तिच्या काठीं ' पुरी ' नामक एक नगरी होती. अकराव्या शतकांत तिथें एक वामनाचार्य नांवाचा विद्वान् ब्राह्मण रहात होता. ह्याची महदाइसा नांवाची पत्नी मोठी व्युत्पन्न होती. चतुरस्र बुद्धि लाभल्यामुळें वेदशास्त्रांचें तिनें उत्तम अध्ययन केलें होतें. प्रत्यक्ष म्हाळसादेवी तिला प्रसन्न झालेली होती. ती तिच्याशीं बोलत असे, असें म्हणतात. महाराष्ट्रांतील पंडितांचा पराभव करणाऱ्या उत्तरेकडील पंडितांना तिनें एकदां वादांत हरविलें. तिच्या ह्या अतुल पराक्रमानें संतुष्ट झालेल्या देवगिरीच्या महादेवरायानें ह्या विद्वान् दंपतीला पांच गांवें इनाम दिलीं. ह्या विद्वान् दंपतीचा मुलगा महेश्वर पंडित. ह्या महेश्वरपंडितास माधवपंडित व वायेनायेक असे दोन मुलगे झाले, माधवभटाला चार अपत्यें झालीं. माधवभटाचा दुसरा मुलगा नागदेव. हाच महानुभावपंथांतील नागदेवाचार्य नांवाचा पंथगुरु म्हणून पुढें प्रसिद्धीस आला. महेश्वरपंडिताचा दुसरा मुलगा वायेनायेक याच्या पत्नीचें नांव कामाइसा असें होतें. वायेनायेक व कामाइसा ह्यांना नऊ मुलें झालीं. त्यांची थोरली मुलगी हीच महदाइसा ऊर्फ महदंबा नांवाची महानुभावपंथाची श्रेष्ठ कवयित्री होय. ह्याच घराण्यांतील आरंभींची वामनाचार्यांची पत्नी महदाइसा हिचेंच नांव ह्या मुलीला ठेवण्यांत कांहीं योजना असावी. आणि योगायोग असा कीं मानाचीं ५ गांवें मिळविणाऱ्या त्या महदाइसेप्रमाणें ह्या महदाइसेनेंहि महाराष्ट्र कविपरंपरेंत मानाचें स्थान मिळविलें.

माधवपंडिताचा मृत्यु लौकर झाल्यामुळें त्यांच्या मुलांचें संगोपन बायेनायेकानेंच केलें. हें सर्व कुटुंब रायसगांवीं रहात होतें. मुलांचे व्रतबंध बायेनायेकानें लौकरच केले. महदाइसा व उमाइसा ह्या मुलींचीं लग्नें अल्पवयींच झालीं; परंतु दुर्दैवानें त्यांच्यावर वैधव्याची कुन्हाड कोसळली. माधवपंडिताचा मुलगा नागदेव हा उनाडक्या करीत हिंडत असे. अशांतच ह्या कुटुंबाला अनाथ करून बायेनायेकहि स्वर्गवासी झाला. ह्या दुःखानें गांजलेली आणि नागदेवाच्या उनाड वागणुकीनें वैतागलेली माधवपंडिताची बायको, नागदेवाची आई आबाइसा, महदाइसा, आणि उमाइसा ह्या दोन विधवा मुलींना घेऊन रायसगांवीं एका गुंफेंत राहूं लागली. महदाइसा ही बायेनायेकाची मुलगी म्हणजे आबाइसाची पुतणी. नागदेव आणि उमाइसा हीं दोन्हीं आबाइसाचीं मुलें. नागदेव म्हणजे उत्तराश्रमींचा महानुभावपंथाचा आचार्य. नागदेवाचार्य हा महदाइसेचा चुलत भाऊ होय.

अजूनपर्यंत महदाइसा आणि नागदेव यांचा महानुभावपंथाच्या तत्त्वज्ञानाशीं संबंध झालेला नव्हता. पण रायसगांवच्या गुंफेंत हें तत्त्वज्ञान त्यांच्या जीवनांत गुंफलें गेलें. हें गरीब कुटुंब रायसगांवीं त्या गुंफेंत रहात असतांना, महानुभावपंथाचे प्रस्थापक श्रीचक्रधर ह्यांचा शिष्य दादोस त्यांना ज्ञानदान करीत असे. त्याच्या उपदेशामुळें नागदेवाचें मन ठिकाणीं आलें. त्याच्या तोंडून श्रीचक्रधरांच्या सामर्थ्याच्या गोष्टी ऐकून ह्या मंडळींना चक्रधरांचें दर्शन घेण्याची तीव्र इच्छा झाली.ही इच्छा लौकरच तृप्त झाली. श्रीचक्रधर पाटवध गांवीं आले तेव्हां नागदेव व महदाइसा यांनीं त्यांचें दर्शन घेतलें. त्यांच्या तेजानें दोघे बहीण भाऊ भारले गेले. दोघांनीं त्यांच्या पंथाचा स्वीकार केला. पुढें श्रीचक्रधरानें बदरिकाश्रमाकडे प्रयाण केल्यावर महदाइसा श्रीचक्रधरांचे गुरु श्रीगोविंदप्रभु यांच्या सहवासांत ऋद्धिपूर येथें राहूं लागले. पुढें श्रीगोविंदप्रभूच्या आज्ञेवरून तिनें नागदेवासहि आपल्या सन्निध ऋद्धिपुरीं आणलें.

महदाइसा ऊर्फ महदंबा ही अत्यंत कुशाग्रबुद्धीची होती. चक्रधराच्या सहवासांत असतांना ती श्रीचक्रधरांना नेहमीं गहन विषयावर प्रश्न विचारीत असे. ह्या तिच्या चौकसपणामुळेंच ' लीळाचरित्र ' ह्या श्रीचक्रधरांच्या आत्मचरित्रपर ग्रंथाचा बराचसा भाग श्रीचक्रधरांच्या तोंडून बाहेर पडला. तिच्याबरोबरच महानुभावपंथाची दीक्षा घेणारा नागदेव हाच चक्रधरानंतर पंथाचा प्रमुख आचार्य झाला. त्याच्यामुळेंच महानुभावपंथाचा बराच प्रसार झाला. त्याच्यावर महदंबेच्या व्यक्तित्वाची मोठी छाप होती. श्रीगोविंदप्रभु शके १२०८ मध्यें समाधिस्थ झाल्यानंतर महदंबा नागदेवाचार्यांजवळच रहात असे. नागदेवाचार्यांच्या सन्निध रहात असतां ती पंथाच्या नियमाविरुद्ध वागणाऱ्यांची कान उघाडणी करीत असे. तिच्याबद्दल नागदेवाचार्य नेहमीं म्हणत असे 'माझ्या पंथाचें रक्षण हीच म्हातारी करील.' तिच्यावर त्याचें इतकें प्राणापलीकडे प्रेम होतें कीं शपथ घेण्याचा प्रसंग आला तर तो स्वतःच्या प्राणांची शपथ घेण्याऐवजीं महदंबेची शपथ घेत असे. तिच्या काव्याबद्दल त्याला मोटा आदर वाटे. तिच्या काव्यवाणीला नागदेवाचार्य ' सिद्धवाणी ' असें म्हणत असे. महदंबेनेंहि नागदेवाच्या आठवणी म्हणून सांगितलेल्या कांहीं गोष्टी ' नागदेवस्मृति ' म्हणून प्रसिद्ध आहेत.

महदंबेच्या कालनिर्णयाबद्दल निश्चित कांहीं सांगतां येत नाहीं. ' ही म्हातारी माझा पंथ रक्षील ' ह्या नागदेवाचार्यांच्या उद्गारावरून महदंबा निदान पन्नाशीच्या पुढें तरी मरण पावली असावी. शके ११९३ च्या सुमारास मरण पावलेल्या पहिल्या महदाइसेचें नांव ज्या अर्थी हिला ठेवलें होतें त्या अर्थी तिच्या मृत्यूनंतर महदंबेचा जन्म झाला असावा. म्हणजे शके ११९३ च्या सुमारास महदंबेचा जन्म झाला असावा असें मानल्यास तिचा मृत्युकाल निदान शके १२४३ च्या पुढें ढकलावा लागतो. पण एकंदरींत हा प्रश्न अद्यापि वादस्थळ आहे.

' लीळाचरित्र ' ह्या श्रीचक्रधरांच्या आत्मचरित्रपर ग्रंथात श्रीचक्रधरांचें जें तत्त्वज्ञान व्यक्त झालें आहे, त्याला बऱ्याच अंशानें महदंबेची

क्रमांक ... दि. ...

कुशाग्रबुद्धि कारण झाली. तिच्या विवेचक प्रश्नांनीं श्रीचक्रधरांचें अंतःकरण त्या ग्रंथांत उघडलें गेलें आहे. ह्याशिवाय 'नागदेवस्मृति' नांवाच्या ग्रंथांत महदंबेनें सांगितलेल्या नागदेवाचार्यांच्या स्मृति ग्रथित केल्या आहेत, म्हणजे महानुभावपंथाच्या पहिल्या दोन महान् आचार्यांच्या चारित्र्यावर महदंबेच्या व्यक्तिमत्त्वानें मोठी शोध–ज्योत टाकली आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. एका दृष्टीनें हें एक महदंबेचें अप्रत्यक्ष असें वाङ्मय–कार्यच ठरतें.

ज्या वाङ्मयकृतीबद्दल महदंबेचें नांव मराठी वाङ्मयाच्या इतिहासांत दाखल झालें आहे ती वाङ्मय–कृति 'महदंबेचे धवळे' म्हणून प्रसिद्ध आहे. 'धवळे' म्हणजे लग्नसमारंभांत म्हणावयाचीं गाणीं असा कांहींजण अर्थ देतात, तर कांहींनीं ह्यांनीं 'धवळे' म्हणजे धवल यशाचे पवाडे असा अर्थ दिला आहे. हे धवळे कृष्णचरित्रांतील 'रुक्मिणी-स्वयंवराख्यानावर' रचिलेले आहेत. महदंबा गोविंदप्रभूच्या सान्निध्यांत ऋद्धिपुरीं रहात असतांना आश्रमांत एक विवाहाचा समारंभ करण्यांत आला होता. त्या वेळेस महदंबेनें करवली ह्या नात्यानें हे धवळे म्हटले. ऋद्धि-पुरांत कुणातरी ग्रामस्थाचा विवाहसमारंभ मोठ्या थाटानें करण्यांत आला होता. तो समारंभ पाहून ह्या वृद्ध आचार्यांना विवाह करण्याची इच्छा झाली. पण ह्या वृद्ध नवरदेवाला कोण मुलगी देणार ? शेवटीं परमेश्वरनायक नांवाचा एक ग्रामस्थ गोविंदप्रभूला आपली कन्या अर्पण करण्यास सिद्ध झाला. गोविंदप्रभु हे महानुभावांतील पंचकृष्णांपैकीं एक समजले जातात. तेव्हां त्यांचा विवाह म्हणजेच कृष्णविवाह असेंहि कदाचित् समजलें जात असावें. कांहीं असलें तरी विवाहसमारंभाच्या वेळीं महदंबेनें हे धवळे म्हटले हें खरें. हें काव्य सहज–स्फूर्त असें आहे. 'तूं कांहीं तरी म्हण' अशी गोविंदप्रभूनें महदंबेला आज्ञा केली. 'काय गाऊं ?' असा प्रश्न महदंबेनें करतांच 'चक्रधराचे शिरीं धरूनिया चरण' अशी सुरवात करून 'कृष्ण रुक्मिणी गजरथतुरे' असें कांहीं तरी गाणें म्हण असें प्रभूंनीं सांगितलें. हा प्रभूचा आशीर्वाद मानून महदंबेनें धवळे म्हटले. गोविंद-

प्रभूच्या कृपेनें तिला स्फूर्ति झाली. त्यामुळें रचनेची सहजता ह्या धवळयांत उत्तम साधली आहे. ह्या धवळयाचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग आहेत. पूर्वार्ध तेवढा महदंबेनें रचिला असून उत्तरार्ध तिच्या नांवावर म्हाइमभट किंवा दुसऱ्या कोणीतरी लिहिला असावा असें वाटतें. पूर्वार्धाचीं कडवीं ८६ असून उत्तरार्धाचीं ६५ आहेत. हे धवळे नाथवाङ्मयाच्या पूर्वी ४०० वर्षें रचिलें गेलें. हे महदंबेचे धवळे श्रीकृष्णभक्तिरसानें रसरसलेले आहेत. चरणांतील अक्षरसंख्येचेंहि बंधन ह्यांत पाळलेलें नाहीं. जवळजवळ गद्य-वजा असें हें पद्य आहे. तरी स्त्रीसुलभवृत्तीनें तें लिहिलेलें असल्यामुळें त्यांतील गोडवा विलोभनीय आहे. ' जयजय श्री प्रभु गोविंदा । सच्चिदानंद आनंदकंदा ॥ ' अशी ह्या धवळयांची सुरवात आहे. महदंबेनें स्त्रीस्वभावा-नुसार स्त्रियांना महत्त्वाचे वाटणारे प्रसंग चांगले वर्णिले आहेत. श्रीकृष्ण-रूपाचें वर्णन स्त्रीच्या नजरेंतून किती मोहक रीतीनें तिनें केलें आहे.

सुंदरू श्रीकृष्णु झळकीतां देखीन्निला ' तेव्हां

'आठै सात्विकु प्रगटले चित्ता संभ्रमु जालाः ' अशी रुक्मिणीची स्थिति झाली. कारण—

' सकळांचा त्यागु केला दृढ धरियले प्रभो तुमचे श्रीचरण ' असें रुक्मिणीच्या कृष्णभक्तीचें महदंबेनें वर्णन केलें आहे. राजवाड्याच्या मंड-पांत कृष्णानें प्रवेश केल्यावर त्याला पाहण्यासाठीं बायकांची कशी तारां-बळ झाली ह्याचें मोठें गोड वर्णन महदंबेनें केलें आहे.

' वऱ्हाडियांसहितु वरू पातैला मंडपाचिया द्वारां

वरमाया वधुमाया वरू वोवाळिला देखौनि श्रीकृष्णराॐ ॥ '

अशा वर्णनामुळें तत्कालीन विवाहविधीबद्दल बरीच माहिती मिळते.

' कुंकुमाचे सडे मौक्तिकाचे चौकु परिकरें:

द्वारके ब्रह्मविद्यातेजें लोपिन्नले चराचर। '

असे समारंभाचें वर्णन केलें आहे.

साडेसहाशें वर्षांपूर्वी महदंबेनें रुक्मिणीस्वयंवरावर पौराणिक कथेचे

आधार घेऊन पण स्वतंत्र असे हें मनोहर काव्य रचिलें आहे. महाराष्ट्रीय समाजांत तेव्हां चालू असलेल्या व निदान तेव्हांपासून आजतागायत अविच्छिन्न परंपरेनें रूढ झालेल्या विवाहपद्धतीचें हें यथातथ्य चित्र आहे. असें श्रीकृष्णाला रुखवत देऊन विद्याधरी परत आल्यावर त्यांना रुक्मिणीनें श्रीकृष्णा-विषयीं विचारल्यावर त्यांनीं जें श्रीकृष्णाचें वर्णन केलें तें मोठें मोहक आहे.

'तीया म्हणती देवी सांडा हे मातु :
लागलें प्रेमपिसें जेव्हळि देखिलें श्रीजगन्नाथु :
रुक्मिणी पुढां बाळा सांगती वृत्तांतु :
सर्वांगीं न देखों तुमचा वो कांतु:
देखियले जें आंग तेथौनि व ढळतीचि लोचन :
जाणती भक्तजन रूपें अगाधु गोविंदराणा :
काई रूपें वानूं नंदाचा कुमरू :
तुझा पती आम्हीं पिता दुजा नाठवे विचार :'

ह्यांतील संयम आणि सूचकता स्त्रीलाच साधावयाची. ह्या धवळ्यांच्या पूर्वार्धाच्या शेवटीं—

'महदाइसीं गोविंदरावो धवळीं आइकवीले'.

असा उल्लेख आहे. इथपर्यंतचा भाग महदंबेनें लिहिला असें दिसतें.

ह्याच कथेवर महदंबेनें 'मातृकी रुक्मिणी–स्वयंवर' हें अभंगबद्ध काव्य लिहिलें आहे. साधारणपणें ह्या काव्याचीं ११० कडवीं आहेत. ह्याची रचना अधिक सफाईची आहे.

'कांसे पीतांबरु कंठीं कुंदमाळा : कांतु शोभे सावळा : रुक्मिणीचा खांदावरी कावडी पाडिभरें चालतु : तो खेळे वनांतु : दत्तु सए: '

अशीं सुरस स्थळें ह्या काव्यांत बरींच आहेत.

ह्याशिवाय 'गर्भकांड ओव्या' म्हणून एक महदंबेचें काव्य प्रसिद्ध आहे.

महदंबेच्या कालाबद्दल निश्चित माहिती नाहीं. ती गोरा कुंभार, चांगदेव, ज्ञानदेव, सांवता माळी, नामदेव इत्यादि महाराष्ट्रीय संतांची समकालीन होती असें म्हणतां येईल.

• • •

# संत जनाबाई



वारकऱ्यांच्या मेळाव्यांत ' तुका म्हणे ' नामा म्हणे ' एकाजनार्दनी ' हे शब्द जितके परिचित आहेत तितकेच किंबहुना त्याहिपेक्षां काकणभर अधिक ' म्हणे नामयाची जनी ' हे शब्द परिचित आहेत. कारण ते एका प्रेमळ स्त्रीच्या हृदयींचे निनाद आहेत. संतकवींत ' तुकयाची अभंग-वाणी ' जशी अभंग ठरली तशी संतकवयित्रींत जनाबाईची अभंगवाणी श्रेष्ठ ठरली आहे. विठ्ठलभक्तांत जनाबाईची योग्यता फार मोठी आहे.

दमा व कुरूंड ह्या शूद्र पतिपत्नींची जनाबाई ही मुलगी. गोदातीरीं गंगाखेड नांवाचें एक गांव होतें. तेथें हा शूद्रयाती दमा रहात होता. तो पंढरीचा वारकरी होता. आषाढी कार्तिकीला दिंड्या—पताकांच्या गज-रांत तो पंढरीस विठ्ठलाच्या दर्शनास जात असे. त्याला मूलबाळ नसल्यानें तो नेहमीं चित्तीं उदास असे. पांडुरंगाच्या चरणीं माथा ठेवून दोघां पति-पत्नींनीं देवाला पुत्ररत्नाची मागणी केली, पंढरीच्या पांडुरंगानें स्वप्नांत दमाला दर्शन दिलें आणि सांगितलें, तुला मुलगी होईल. ती भगवद्भक्त होईल. तिला दामाशेटीच्या हातीं सोंपीव. त्याप्रमाणें लौकरच जनाबाईचा जन्म झाला. विठ्ठलाच्या आज्ञेप्रमाणें दमानें नरसीब्रामणीच्या दामाशेटीच्या घरीं जाऊन त्यांच्या चरणीं जनाबाईस वाहिलें. अशा रीतीनें जनाबाई पूर्वपुण्याईनें नामदेवाच्या घरीं आली. जनाबाईचे आईबाप दमा आणि कुरूंड हे अकालीं मरण पावल्यामुळें पोरकी झालेली ही पोर भूतदयेनें प्रेरित होऊन दामाशेटीनें सांभाळली असावी अशी हकीकत कांहींजण सांगतात. कांहीं असलें तरी जनाबाईचे आईबाप तिच्या लहानपणींच वारले होते व दामाशेटीच्या घरीं ती लहानाची मोठी झाली ह्या हकीकतीला बाध येत नाहीं. जनाबाईचें आत्मनिवेदनहि असेंच आहे. ती म्हणते—

' माय मेली बाप मेला । आतां सांभाळीं विठ्ठला ॥ '

नामदेवाला जनाबाईनें कडीखांदीं खेळविलें ह्यावरून तिचा जन्म

नामदेवाच्या जन्माअगोदर म्हणजे शके ११९२ च्या अगोदर पांच सहा वर्षें तरी झाला असावा असा तर्क बांधतां येतो. त्या तर्कापलीकडे जायला मात्र कांहीं साधन नाहीं. तिचा मृत्युकालहि कोणी चरित्रकार सांगत नाहींत.

दामाशेटीचें घराणें मूळचेच विठ्ठलभक्त होतें. त्यांच्या या भक्तीचा कळस नामदेवानें चढविला. अशा ह्या भाविक घराण्यांत जनाबाई लहानाची मोठी झाल्यामुळें परमेश्वराची एकनिष्ठ भक्त झाली. नामदेवाच्या कीर्तनरंगांत नेहमीं दंग झाल्यानें 'कीर्तनीं जन्मला। हरिभक्तीनें शिंपीला ॥', असा तिचा देह झाला होता. म्हणून ' नाम गाय वेळोवेळां । असा दासी जनीला नित्य चाळा ॥ ' देह सार्थकीं लागायला दुसऱ्या कशाचीहि जरूरी नाहीं. ' पांडुरंग नाम जप । हेंचि माझें महा तप ॥ ' असा तिचा विश्वास होता. ज्ञानेश्वर आणि नामदेव ह्या दोन महान् भगवद्भक्तांच्या सहवासानें आणि उपदेशामृतानें जनाबाईला ज्ञान आणि भक्ति ह्या दोहोंचा लाभ झाला. ' विवेक सागर । सखा माझा ज्ञानेश्वर' ॥ असें ती ज्ञानराजाबद्दल उद्गार काढते, तर ' नामयाचें ठेवणें जनीस सांपडलें ' असें नामदेवाच्या उपकाराचा ती कृतज्ञतेनें उल्लेख करते. नामदेवामुळें आपणांस पांडुरंगाचा लाभ झाला अशी तिची दृढ समजूत आहे. ' येग येग विठाबाई । माझे पंढरीचे आई'॥ असा ती विठ्ठलाचा धावा करते. 'देह जावो अथवा राहो। माझा पांडुरंगीं दृढ भावो ॥ असा नामदेवाप्रमाणें तिचाहि दृढ निर्धार आहे. इतका करुणार्द्रवाणीनें धांवा करूनहि पांडुरंग दर्शन देत नाहीं असें पाहून 'मी तुझें गा लेकरूं । नको आतां दुरी करूं ॥ ' असें काकुळतीनें ती म्हणते. इतकी आर्त वाणी ऐकून देव राउळांत तरी कसा स्वस्थ राहील ? तो जनीच्या भेटीसाठीं नामयाच्या घरीं आला. परमेश्वरप्राप्तीनें जनी हर्षभरित झाली. ती देवाशीं एकरूप झाली. म्हणूनच तिला जळीं स्थळीं काष्ठीं विठ्ठल माउली दिसूं लागली. ह्या स्थितींतील आपला अनुभव जनीनें फार उत्तम रीतीनें वर्णिला आहे. ती म्हणतें राना 'गेले शेणीसाठीं । वेचूं लागे माझ्या पाठीं ॥' जनीसाठीं देव ' दळण कांडण धुणें धुवोनी

पाटी डोईवरी । गवऱ्या वेचुन आणी घरीं ॥' ह्या सगुण भक्तीच्या पुढची पायरी जी निर्गुणभक्ति किंवा अद्वैतभक्ति तिच्यावरहि जनाबाई लौकरच चढली. 'जोडी जोडीली शिवाची । भ्रांति फिटली मनाची ॥'' असा ह्या वेळचा अनुभव ती निवेदित करते. अशा रीतीनें शास्त्राचें अध्ययन न करतां किंवा तपश्चर्येचें साधनहि न करतां निर्मल भक्तीच्या साह्यानें जनाबाई निर्गुण ब्रह्मांत विलीन झाली.

पंढरीच्या विठ्ठलमंदिरांत जनाबाई नेहमीं विठ्ठलदर्शनास जात असे. एकदां पांडुरंगाच्या गळ्यांतील सुवर्णपदक चोरीस गेलें. जनी नेहमीं देवळांत येत असल्यानें तिनेंच पदकाची चोरी केली असा लोकांनीं तिच्यावर आळ घेतला. तिच्या दंडाला काढण्या लावून चंद्रभागेच्या तीरावर सुळावर चढविण्यासाठीं तिला नेण्यांत आलें. तेव्हां 'विठो धावरे धांवण्या' असा धांवा करण्याशिवाय जनाबाईला कांहीं मार्ग राहिला नव्हता. तेव्हां ' ऐसा येळकोट केला । जनी म्हणे विठो मेला ॥ तंव सुळाचें झालें पाणी । धन्य म्हणे दासी जनी ॥' ह्या प्रसंगानें जनाबाईची विठ्ठलभक्ति अधिकच वाढली.

जनाबाईचे उपलब्ध अभंग एकूण ३४८ आहेत. त्यांतहि कांहीं अभंग प्रक्षिप्त असावेत असें कांहीं विद्वानांचें मत आहे. तिच्या अभंगांत प्रेमळपणा ओतप्रोत भरलेला आहे ज्ञानेश्वरकालीन वाङ्मयांत किंबहुना संपूर्ण मराठी वाङ्मयांत जनाबाईचें स्थान विशेष महत्त्वाचें आहे. तिच्या अभंगांवर ज्ञानदेव व नामदेव या दोघांच्या वाणीची छाप पडली आहे. तरी सुद्धां जनाबाईचें खास वैशिष्ट्य त्यामध्यें भरपूर उतरलें आहे. तिच्या अभंगांत नामदेवाची सगुण प्रीति आहे व ज्ञानेश्वरांची योगानुभूति आहे. तिच्या अभंगांत भक्तीची माधुरी व योगाची खोली आहे. तिचे सारे अभंग प्रेमानें ओथंबलेले, सरळ, सोपे व अत्यंत प्रासादिक आहेत. तिच्या अभंगांतील तेजस्वीपणाहि वाखाणण्यासारखा आहे. विषयाच्या संगानें मनुष्य अधोगतीस जातो असें सांगतांना ती म्हणते—

पतंग सुखावतां भारी । उडी घाली दीपावरी ।
परि तो देहांतीं मुक्तता । दोन्ही पदार्थां नाशीला ॥
विषयाचे संगतीं । बहु गेले अधोगती ।
ऐसे विषयानें भुलविलें । जनी म्हणे वाया गेले ॥

अहंकाराच्या नाशाशिवाय देवाची प्राप्ति होत नाहीं असें ती सांगते. अनन्यभावानें शरण गेलें असतां परमेश्वर अव्हेर करणार नाहीं असें ती सांगते—

' गंगा गेली सिंधूपाशीं । त्यानें अव्हेरिलें तिशीं ।
तरि तें सांगावें कवणाला । ऐसें बोले बा विठ्ठला ॥
जल काय जलचरा । माता अव्हेरी लेकुरा ।
जनी म्हणे शरण आले । अव्हेरिले ब्रीद गेले ॥

एकदां ह्या परमेश्वराची कृपादृष्टि वळली म्हणजे मग कांहीं कमी नाहीं.

ज्याचा सखा हरी । त्यावरी विश्व कृपा करी ।
उणें पडो नेदि त्याचें । वारे सोसी आघाताचे ॥

ज्ञानेश्वराची ज्ञानयुक्त भक्ति स्त्री असल्यामुळें जनाबाईच्या बाबतींत शक्य नव्हती. त्याचप्रमाणें जगांतील विविध अनुभव प्राप्त करून घेण्याचें सामर्थ्य तिच्या ठिकाणीं बेताचेंच होतें तरी सुद्धां स्त्रियांच्या ठिकाणीं स्वाभाविक असलेला प्रेमळपणा व कोणत्याहि गोष्टीशीं भावनात्मक तादात्म्य पावण्याची त्यांची शक्ति या दोन गोष्टींची देणगी तिला उपजत असल्यामुळें आपल्या मनांतील भावनांचा कोणताहि आडपडदा न ठेवतां तिनें अत्यंत मोकळेपणानें केलेला आहे. पुरुषांच्या भाषेमध्यें जो प्रसाद अथवा जो लाघवीपणा सामान्यतः अप्राप्य असतो, तो तिच्या अभंगांत पूर्ण भरलेला आहे. परमेश्वराची भक्ति स्त्री-शूद्रांना सुद्धां सुलभ करून देणें हें वारकरी संप्रदायाचें जें महत्कार्य त्याचा मोठा पुरावा म्हणजेच जनाबाईचे अभंग.

जनाबाईच्या अभंगांत शांत, वत्सल व अद्भुत ह्या रसांचा परिपोष उत्तम झालेला दिसतो. अजामीळ, द्रौपदी वगैरे पौराणिक भगवद्भक्तांचे दृष्टान्त तिनें वारंवार दिलेले आहेत.सहजता हा तिच्या भाषेचा अमोल गुण आहे, तर आर्तता हा तिच्या अभंगांचा स्वभावधर्म आहे. म्हणूनच तिचे अभंग वारकरी पंथाच्या जिभेवर नाचत असतात.

जनाबाईचे कांहीं उत्कृष्ट अभंग.

येग येग विठाबाई । माझे पंढरीचे आई ॥
भीमा आणि चंद्रभागा । तुझे चरणींच्या गंगा ॥
इतुक्यांसहित त्वां बा यावें । माझे रंगणीं नाचावें ॥
माझा रंग तुझिया गुणीं । म्हणे नामयाची जनी ॥१॥
देव भावांचा भुकेला । काय उतराई व्हावें त्याला॥
पोहे सुदामदेवाचे । फके मारी कोरडेच ॥
द्रौपदीचें भाजीपान । घेऊनि धालासे आपण ॥
विदुरा–घरींच्या कण्या खाय । ढेकर देऊनी तृप्त होय ॥
उच्छिष्ट फळें भिल्लीणीचीं । खातसे आदरें रूची ॥ २ ॥
पक्षी जाय दिगंतरां । बाळकासी आणी चारा ॥
घार हिंडते आकाशीं । झांप घाली पिल्लापाशीं ॥
माता गुंतली कामासी । चित्त तिचें बाळापाशीं ॥
वानर हिंडे झाडावरी । पिलीं बांधुनी उदरीं ॥
तैसी आम्हांसी विठ्ठल माये । जनी वेळोवेळां पाहे ॥ ३ ॥
आंधळ्याची काठी । अडकली कवणे बेटीं ॥
माझिये हरणी । गुंतलीस कोणे रानीं ॥
मुकें मी पाडस । चुकलें भोवें पाहें वास ॥
तुजविण काय करूं । प्राण किती कंठीं धरूं ॥
आतां जीव जाऊं पाहे । धाव घालीं माझे आये ॥
माझी भेटवा जननी । संतां विनवी दासी जनी ॥ ४ ॥

• • •

ऐन बारा एकचा सुमार. सूर्याच्या तिग्म तीक्ष्ण किरणांनीं गोदा-तीराच्या वाळवंटांतील वाळूच्या लाह्या फुटत होत्या. त्या फुटत्या लाह्यांकडे मानवी नजर नजर देऊं शकत नव्हती. अशा रखरखीत वाळवंटांत एक काळेंविद्रें पोर वर पाय उडवून तळतळून रडत होतें. तें पोर अशाच एका पटकुरांत गुंडाळलेलं होतं. त्या पोराचं तोंड रडून रडून कृष्णकमळा-सारखं सुकून गेलं होतं. डोक्यावर एक एरंडाचें पान थापटलेल्या एका वृद्ध ब्राह्मणानें दुरूनच एक तंगडी उंचावून त्या बालकाकडे पाहिलें आणि ' महारड्याचें पोर ' असें म्हणून भांड्यांत न राहिलेलें पाणी अंगाभोंवतीं शिंपडून ते ब्राह्मणश्रेष्ठ पुढें झाले. इतक्यांत तें बालक कुणीतरी आपल्या शालजोडींत गुंडाळून घेतल्याचें त्यांना दिसलें. मृत्युलोक ह्याणि पाताळ यांची उलटापालट झाल्यासारखें वाटून ते द्विजवर्य जवळ जवळ ओरडलेच- ' अहो नाथ, तें म्हारड्याचं पोरं आहे. '

' हो आपल्या गांवच्या हरिजनाचं बालक आहे हें...व्याकुळ झाला त्याचा नाजुक जीव ' नाथांची प्रेमळ वाणी बोलली. नाथांनीं पोटाशीं धरलेलें आपलें पोर पाहून, धावत आलेली त्याची आई आश्चर्यानें पहातच राहिली.

' पहातीस काय बाई...हें धर तुझें पाडस. असें कसें रविराजाच्या वटारलेल्या द्वादश डोळयांच्या वणव्यांत होरपळत टाकलंस ? ' नाथांनीं तें बालक त्याच्या मातेच्या स्याधीन केलें.

अशा किती तरी गोष्टी नाथांच्या जीवनांत आपणांस पहावयास मिळतात. दया, क्षमा, शांति, समता वगैरे गुणांना महत्त्व देणाऱ्या भागवतांचा भागवत धर्म जर कोणाचा जीवनधर्म झाला असेल तर तो नाथांचा. प्रपंचांत राहून परमार्थ साधण्याचा मुकुंदराजांनीं सांगितलेला राजयोग जर कुठें आपणांस मूर्तिमंत पहावयास मिळणार असेल तर तो

नाथांच्याच जीवनांत. समाजवृक्षाची कीड मारून टाकणारा जर कोणी संत भागवान झाला असेल तर ते धर्मात्मा एकनाथच.

पंढरपूरच्या विठोबाची मूर्ति कर्नाटकांतून परत आणणाऱ्या संत भानुदासांच्या घराण्यांत नाथांचा जन्म झाला. भानुदास–चक्रपाणि–सूर्यनारायण–एकनाथ अशी वंशपरंपरा आहे. परंपरेनेंच नाथांचा जन्म शके १४५५ मध्यें पैठणास झाला असें मानण्यांत येतें. नाथांच्या लहानपणींच त्यांचे आईवडील वारल्यामुळें नाथांचें संगोपन त्यांचे आजोबा चक्रपाणि यांनीं केलें. पैठण म्हणजे त्या वेळचें प्रतिष्ठान, हें संस्कृत विद्येचें दक्षिणेकडील मूळ पीठ होतें. त्यामुळें प्रखर बुद्धीच्या नाथांनीं संस्कृत विद्या अल्पावधींतच पूर्णपणें आत्मसात् केली. भगवद्भक्ति हें तर नाथांच्या घराण्याचें वैशिष्ट्यच होतें. नाथहि त्यास अपवाद नव्हते. ते वयाच्या बाराव्या वर्षींच आजोबांची अनुज्ञाहि न घेतां देवगडला जाऊन जनार्दनस्वामींच्या सेवेंत मग्न झाले. प्रपंच साधून परमार्थ करण्याची शिकवण नाथांना स्वामींपासूनच मिळाली. गुरुशिष्यांचें एकमेकांवर निरतिशय प्रेम होतें. दोघांचीं अंतःकरणें किती एकरूप होऊन गेलीं होतीं हें नाथांच्या अभंगाच्या शेवटचे ‘ एकाजनार्दनी ’ हे शब्द आपल्या मनास पटवितात. गुरुसन्निध असतांना नाथांनीं गुरुमुखानें ज्ञानेश्वरीचें श्रवण केलें. ज्ञानेश्वरांनीं सद्गुरुसेवेचें जें सुंदर चित्र आपल्या हळुवार लेखणीनें रेखाटलें आहे तें नाथांनीं प्रत्यक्षच आपल्या आचरणांत आणलें. गुरुसेवेचें हें कडक व्रत सहा वर्षें पाळल्यानंतर ‘ सुलभ ’ नांवाच्या पर्वतावर नाथांना साक्षात्कार झाला. त्यांच्या गुरूचें आराध्य दैवत जे श्री दत्तात्रेय ते त्यांना प्रसन्न झाले. अशा रीतीनें नाथांच्या भागवत संप्रदायाच्या मनोभूमिकेवर दत्तसंप्रदायाचें रोपटें लावलें गेलें. नंतर गुरुशिष्यांनीं मिळून कांहीं दिवस तीर्थयात्रा केली. प्रवासांत असतांनाच पंचवटीस नाथांनीं जनार्दनस्वामींच्या आज्ञेनुसार चतुःश्लोकी भागवतावर ओवीबद्ध टीका रचिली.

नाथांच्या काव्याची सुरवात अशा प्रकारें पंचवटीस झाली. पुढें कांहीं तीर्थयात्रा केल्यानंतर नाथ गुरूंची अनुज्ञा घेऊन पैठणास परत आले.

सद्गुरुसन्निध राहून, सेवेचें व्रत पत्करून ज्या जीवनाची तयारी नाथांनीं देवगडास केली होती तें त्यांचें समाजजीवन पैठणास सुरू झालें. ह्या वेळेस नाथांचें वय पंचवीस वर्षांचें होतें. विवाह करून त्यांनीं गृहस्थाश्रमांत पदार्पण केलें. त्यांच्या पत्नीचें नांव गिरिजाबाई असें होतें. समाजाचा प्रपंच सावरण्यासाठीं नाथांनीं आपल्या प्रपंचास परमार्थस्वरूप बनवून टाकले होतें. आणि ह्यांत त्यांना त्यांच्या पत्नीचें साहाय्यच मिळालें. अत्यंत यशस्वी रीतीनें प्रपंच करून परमार्थ साधतां येतो हें नाथांनीं आपल्या उदाहरणानें दाखवून दिलें. प्रपंच परमार्थाच्या आड येत नाहीं. किंवा परमार्थामुळें प्रपंचाची दैना होत नाहीं हें त्यांनीं समाजास शिकविलें. हेंच त्यांचें खरें विभूतिमत्त्व आहे. नाथांना एकूण चार अपत्यें झालीं. त्यांच्या थोरल्या मुलीचा मुलगा रसिक कवि मुक्तेश्वर होय. धाकट्या मुलीचा माधवस्वामी हा सुद्धां तामीळनाड प्रांतातील महाकवि समजला जातो. नाथांचा मुलगा हरिपंडित हा मोठा कर्मठ होता. नाथांची योग्यता आरंभी न समजल्यामुळें त्यानें नाथांना त्यांच्या आचरणाबद्दल प्रारंभीं विरोध केला. परंतु पुढें त्याचा कर्मठपणा नाथांच्या भागवततेजानें पार वितळून गेला.

पंचवटीस 'चतुःश्लोकी भागवत' टीका लिहून नाथांनीं आपला काव्यप्रवाह सुरू केला. त्याला पुढें अजीबात खंड पडला नाहीं. त्यांची काव्यरचना जितकी अफाट तितकीच विविध आहे. लोकांना सन्मार्ग दाखविण्याचें कार्य नाथांना करावयाचें असल्यामुळें त्यांनीं लोकभाषेंत लोकवाङ्मय रचिलें. नाथांनीं भागवत धर्म लोकांना सांगण्यासाठीं मराठींत भागवत ग्रंथ लिहिण्यास सुरवात केली, गीर्वाण भाषेंतील भागवतासारखा ग्रंथ मराठी भाषेंत आणण्याचें नाथांचें हें कृत्य सनातनी पंडितांना अत्यंत धाडसाचें वाटलें. त्यांनीं नाथांच्या विरुद्ध काशीच्या पंडितांकडे तक्रार नेली. त्यांना प्रत्यक्षच उत्तर देण्यासाठीं नाथ देखील काशीस जाऊन

राहिले. काशीस त्यांचें वास्तव्य शके १४९२ ते १४९५ पर्यंत तीन वर्षें होते. नाथ काशीस गेले तेव्हां त्यांच्या भागवताचे फक्त पांचच अध्याय लिहून झाले होते. पुढें त्यांनीं काशींतच पंडितांच्या टीकेच्या झोडींतच आपला ग्रंथ लिहून पूर्ण केला. नंतर नाथांच्या रसाळ वाणीनें तो ग्रंथ ऐकल्यानंतर 'गिर्वाण भाषा देवें केले आणि प्राकृत चोरें निर्मिली नाहीं.' हें त्या पंडितांना पटलें. नाथांच्या ग्रंथाचें श्रेष्ठत्व त्यांना मनोमन पटलें. मराठींत ग्रंथरचना केल्याबद्दल नाथांना वाळींत टाकण्याची धमकी देणाऱ्या पंडितब्रुवांनीं नाथांच्या त्या मराठीच ग्रंथाची काशीक्षेत्रीं पालखींतून मिरवणूक काढली. ह्यानंतर मानाची शालजोडी घेऊन नाथ पैठणास शके १४९५ मध्यें परत आले.

मराठी वाङ्मयाच्या इतिहासांत नाथांचें स्थान अत्युच्च आहेच, पण शांति, क्षमा, औदार्य व भूतदया इत्यादि दैवी गुणांनीं त्यांचें चरित्र उज्ज्वल झाल्यामुळें त्यांना जनतेच्या हृदयांत प्रेमाची जागा मिळाली आहे. गृहस्थाश्रमाला नाथांनीं पूज्यता प्राप्त करून दिली आहे असें पांगारकर म्हणतात. मराठीचें विद्यापीठ म्हणून गाजलेल्या पैठणास त्यांनीं आपल्या आचरणानें धर्मपीठ बनविलें. एकशेंआठ वेळां अंगावर थुंकल्यामुळें तितकीं गंगेचीं स्नानें करणाऱ्या नाथांच्या अद्‌भुत शांतीनें वितळलेला यवन, गंगेच्या कावडींतल्या तीर्थोदकानें वांचविलेला गाढव; एक ना दोन कितीतरी नाथांच्या निर्मल जीवनाचीं चित्रें आपणांस तात्कालिक कां होईना मानसिक शांति प्राप्त करून देतात. गिरिजाबाईसारख्या सतीची संसारांत जोड लाभल्यामुळें नाशवंत संसारांत राहूनहि नाथांनीं अविनाशी पद जोडलें व त्याचें सुख जगाला वांटून दिलें. कीर्तन आणि प्रवचन ह्यांच्या साह्यानें लोकोद्धाराचें कार्य नाथांनीं सतत केलें. ज्ञानेश्वरी, भागवत, रामायण इत्यादि ग्रंथांवर ते पुराण सांगत. कीर्तन व नामस्मरण यावर त्यांचा विशेष भर असे. सज्जनाला निंदकाची वाण पडत नाहीं. नाथ तरी ह्या त्रिकालाबाधित सिद्धांतास अपवाद कसे ठरणार? नाथांच्या कीर्तनास जसजसा रंग चढे तसतशी भावि-

कांचीं अंतःकरणें प्रेमानें उचंबळून येत तर वैदिक,पंडित,संन्यासी, हरिदास, भिक्षुक इत्यादि निंदकांचीं मार्थी बिघडत. हा गीर्वाण भाषेचा अपमान करतो, भक्तिमार्गापुढें वेदान्त मार्गाला तुच्छ असे आरोप नाथांवर करून त्यांनीं नाथांचा विविध मार्गांनीं छळ केला. परंतु नाथांच्या अलौकिक शांतीनें टीकाकारांचें कंबरडें मोडलें.

ज्ञानेश्वरीविषयक नाथांची कामगिरी फार महत्त्वाची आहे. ज्ञानेश्वरी त्यांना प्रत्यक्ष गुरुमुखानेंच प्रथम ऐकावयास मिळाली होती. ज्ञानेश्वरी हा त्यांचा आवडता ग्रंथ होता. त्यावर ते नेहमीं प्रवचन करीत असत. एकदां एकनाथांचा घसा फार दुखत होता. तेव्हां ज्ञानेश्वरांनीं स्वप्नदृष्टान्त देऊन त्यास सांगितलें कीं, 'माझ्या मानेस अजानवृक्षाच्या मुळीचा गळफांस बसला आहे. येवढा तूं काढ म्हणजे तुझा घसा बरा होईल.' नाथांनीं आळंदीस जाऊन ज्ञानेश्वरांच्या समाधीचा उद्धार केला. तेव्हांपासून आळंदीचें महत्त्व वाढलें. प्रत्यक्ष ज्ञानेश्वरी ग्रंथांत बरेच चुकीचे पाठ घुसले होते. नाथांनीं जुन्या प्रती शोधून काढल्या व भाषाशास्त्राच्या साह्यानें ज्ञानेश्वरीची प्रत शुद्ध करून भाविकांच्या हातांत दिली. हीच ज्ञानेश्वरीची प्रत सध्यां प्रमाण मानण्यांत येते. ज्ञानेश्वरीचें संशोधन हें नाथांचें महान् कार्य आहे. 'अजान वृक्षाचें निमित्त करून ज्ञानेश्वरांनीं आपणांस दर्शन दिलें' असें नाथांनीं वर्णन केलें आहे. परंतु एकनाथ हे एकनिष्ठ ज्ञानेश्वर-भक्त होते, त्यांनीं आळंदीच्या ज्ञानेश्वरसमाधीचा जीर्णोद्धार केला व ज्ञानेश्वरीची प्रत संशोधित केली असे तर्ककर्कश टीकाकार वरील आख्यायिकेचा अर्थ मानतात.

एकनाथांची ग्रंथरचना जितकी प्रचंड तितकीच विविध आहे. मराठी वाङ्मयाची गंगा बहुजनसमाजापर्यंत आणण्याची कामगिरी सर्व भागवतांत नाथांची अपूर्व आहे. प्रभावी ठरेल त्या त्या मार्गानें त्यांनीं वाङ्मयाला लोकांच्या अंतःकरणांत स्थान मिळवून दिलें. लोकांची अध्यात्मिक, नैतिक,

सामाजिक उन्नति साधण्यासाठीं त्यांनीं वाङ्मय हत्याराचा मनसोक्त वापर केला. लोकांत रूढ असलेले गोंधळ, भारूड, पुराण वगैरे सर्व साधनांचा नाथांनीं उपयोग केला. त्यांच्या काव्यरचनेला चतुःश्लोकी भागवतापासून सुरवात झाली. जनार्दनस्वामींच्या सांगण्यावरून तीर्थयात्रेच्या प्रसंगीं त्यांनीं चतुःश्लोकी भागवतावर ही मराठी ओवीबद्ध टीका केली. त्यांनीं ह्यानंतर 'हस्तामलक', 'स्वात्मसुख' 'शुकाष्टक' 'आनंदलहरी' 'चिरंजीव पद', 'गीतासार', 'आनंदभुवन' इत्यादि ८।१० ग्रंथ अध्यात्मपर लिहिले. ह्या अध्यात्मपर ग्रंथांची ओवीसंख्या चार हजारांवर आहे. नाथांचा अध्यात्मविषयक किंवा भक्तिज्ञानपर सर्वश्रेष्ठ ग्रंथ म्हणजे नाथभागवत होय. हा ग्रंथ म्हणजे भागवतांतील एकादश स्कंदावरील विस्तृत टीका होय. याशिवाय पौराणिक आख्यानें व संतचरित्रें, अभंग, पदें व भारुडें अशी विविध काव्यरचना नाथांनीं केलेली आहे. त्यांच्या ओवीबद्ध काव्यांची ग्रंथसंख्या सुमारें ६०००० आहे. इतकी प्रचंड रचना नाथाशिवाय दुसऱ्या कोणीं केली नाहीं. हा ग्रंथरचना व्यवसाय त्यांनीं आपल्या जीवनग्रंथाच्या समाप्तीपर्यंत अव्याहत चालू ठेवला होता. त्यांचा शेवटचा ग्रंथ म्हणजे 'भावार्थरामायण' हा होय. हा ग्रंथ नाथांच्या हातून पूर्ण झाला नाहीं.

चंद्रावती नामक नगरीं नाथांचें वास्तव्य असतांना चंद्राभट नांवाच्या पंडितानें भागवतांतील चतुःश्लोकावर सांगितलेलें पुराण नाथांच्या समवेत असलेल्या जनार्दनस्वामींना अतिशय आवडलें व त्यांनीं नाथांना चतुःश्लोकावर ओवीबद्ध टीका करण्यास आज्ञा केली आणि म्हणूनच नाथांच्या 'चतुःश्लोकी भागवत' ह्या पहिल्या पहिल्या ग्रंथाची रचना झाली. ह्या ग्रंथरचनेविषयीं नाथ विनयानें स्पष्टच म्हणतात.

'श्री भागवत आणि भाषें मराठें। हें बोलणें नवल वाटे।
पूर्वी नाहीं ऐकिलें कोठें। अभिनव मोठें धिटावा केला ॥

माझें आरुषवाणें बोलणें । कलाकुसरी कौतुक नेणें ।
जें बोलविलें जनार्दनें । तेंचि ग्रंथकथनें कथिलें म्यां ॥ ’

अनुताप–विवेक–वैराग्य–आत्मज्ञान ही पारमार्थिक सांखळी या ग्रंथांत नाथांनीं मोठ्या कौशल्यानें गुंफिली आहे. ‘ हस्तामलक ’ हें अध्यात्मिक प्रकरण त्याच नांवाच्या श्रीशंकराचार्यांच्या चौदा श्लोकी स्तोत्रावरील ६७४ ओव्यांची टीका असून ती रसाळ आहे. ‘ शुकाष्टक ’ ह्या ४४७ ओव्यांच्या टीकेंत निःसंदेह झालेल्या शुकमुनींचें वर्णन आहे. ‘स्वात्मसुख’ या ५१० ओव्यांच्या टीकेंत अद्वैतभक्ति, गुरुस्तवन वगैरे विषय आलेले आहेत. चिद्वृत्तींचा निरास झाल्यानंतर आत्मसुखाच्या ज्या आनंदलहरी नाथांच्या अंतःकरणांत उचंबळून आल्या त्या ‘ आनंदलहरी ’ ह्या ग्रंथांत व्यक्त झाल्या आहेत. नाथ म्हणतात—

‘ श्रोतीं न मानावा खेद । म्यां आपुल्या मनासि केला बोध ॥ ’

देहसुखाविषयीं उदासीन राहून जो विवेकानें वैराग्य अंगीं बाणावि-ण्याचा प्रयत्न करतो तो चिरंजीवपद मिळवितो. हा आपला सिद्धान्त नाथांनीं ‘ चिरंजीवपद ’ ह्या आपल्या ४२ ओव्यांच्या छोट्या पण गुणांनीं मोठ्या अशा ग्रंथांत सांगितला आहे.

नाथांच्या पुढें बहुजनसमाज सतत असल्यानें नाथांनीं कथावाङ्-मयाकडे बरेंच लक्ष दिलें आहे. मनोरंजन आणि भक्तिबोध ह्या दोन्ही गोष्टी साधण्याची नाथांची हातोटी अपूर्व आहे. त्यांनीं पांच पंचवीस कथा वर्णिल्या आहेत. त्यांपैकीं तुलसीमाहात्म्य, रुक्मांगदकथा आणि सीतामंदोदरी हीं प्रकरणें सरस आहेत. संसाराच्या लहान सहान गोष्टींतून विनोदस्थळें नाथ फार कुशलतेनें वेचतात. ह्याचा प्रत्यय आपणांस त्यांच्या ‘ हळदुली, ’ ‘ कृष्णदान ’ ह्या छोटेखानी प्रकरणांत आपणांस येतो. नाथांनीं ध्रुव, प्रल्हाद, उपमन्यु आणि सुदामा या चार भक्तांच्या कथा एकूण ६१ अभंगांतून गायिल्या आहेत. ह्या भक्तांप्रमाणेंच नाथांनीं ज्ञानदेव, नामदेव इत्यादि संतांचीं चरित्रेंही वर्णिलीं आहेत.

शके १४९३ त ' रुक्मिणीस्वयंवर ' ह्या सुप्रसिद्ध ग्रंथाची रचना नाथांनीं केली. त्याची ओवी संख्या १७१२ आहे. ह्या ग्रंथाची कथा तर प्रसिद्ध आहेच. शिवाय नाथांच्या ह्या ग्रंथाचें वैशिष्ट्य असें आहे कीं श्रीकृष्ण रुक्मिणी ह्या विवाहप्रसंगाच्या निमित्तानें नाथांनीं सबंध जिवाशिवाच्या मीलनाचें रूपक साधलें आहे. रुक्मिणी म्हणजे जीव; श्रीकृष्ण म्हणजे परमात्मा; रुक्मी, शिशुपाल वगैरे रुक्मिणी-कृष्ण विवाहाचे विरोधक म्हणजे काम, क्रोध वगैरे षड्रिपु; भीमक, सुदाम वगैरे अनुकूल असलेले लोक म्हणजे सात्त्विक गुण ही रूपकाची कल्पना नाथांनीं शेवटपर्यंत कायम ठेवली आहे. नाथांचें हें रूपकचातुर्य विशेषत: युद्धवर्णनांत जास्त चांगल्या रीतीनें पहावयास मिळतें. विवाहसोहळ्याच्या वर्णनांत नाथांची सूक्ष्म निरीक्षणदृष्टि दिसून येते.

मुळींच नाहीं जन्मपत्र । कवण जाणें कुळगोत्र ।
कृष्ण नव्हेजी स्वतंत्र । भक्त परतंत्र सदांचा ॥

ह्या कृष्णवर्णनांत अध्यात्म कथाओघांत कसें सहज मिसळल्यासारखें दिसतें.

पद्यरचनाकार म्हणून नाथांची योग्यता मोठी. त्यांच्या कृष्णभक्तीमुळें त्यांनीं बालक्रीडेचे अभंग, गौळणी, रूपकें अशी पुष्कळ रचना केली आहे. उदा:–

' कृष्णा कैसी खेळूं लपंडाई । अनंत लोचन तुझे पाहीं
तेथें लपावें कवणे ठाईं । तुझें देखणें लागलें पाहीं ॥

नाथ अध्यात्माची शिकवण किती सहज रीतीनें देतात हें वरील ओवी स्पष्ट करते. ' असा कसा देवाचा देव बाई ठकडा ग । मन रामीं रंगलें अवघें मनचि राम झालें गे ' वगैरे त्यांचीं पदें कित्येक भगवद्भक्तांच्या जिभेवर अजूनहि खेळत असलेलीं दिसून येतात.

भारुडाचें नांव निघाल्यानंतर नाथांचें नांव निघावयाचेंच. बहुजनसमाजांत रूढ असलेला एक लोकप्रिय असलेला प्रकार नाथांनीं लोकशिक्षणाच्या कार्यासाठीं उपयोगांत आणला. नाथांच्या भारुडांची संख्या जवळ

जवळ तीनशें आहे. ‘ दार उघड बया, दार उघड ’ हें भवानीचें भारूड प्रसिद्ध आहे. त्यांचा ‘जोशी’ तर फार उत्कृष्ट आहे. ‘ मी आलों रायाचा जोशी । होरा ऐका दादांनो ॥ ’ असें म्हणून ‘भक्तीसुखें दोंद वाढेल’ असा आशेचा बोल तो भगवद्भक्तांना देतो.‘उठा कीं जी मायबाप,कशी लागली झोंप । हुजूर जाऊनिया येवढी चुकवा खेप ॥ ’ ही त्यांच्या ‘जागल्या’ची हांक ऐकतांच मोहनिद्रेंतून मानव खडबडून जागा होतो. नाथांचा ‘ गारूडी ’ तर हिंदी भाषेंतच ललकारी देतो , ‘ सुनो संत सज्जनभाई । हम तो निरकारके गारूडी आया है ॥ ’ नाथांची अर्जदास्त मोटी मजेदार आहे. ती गद्यांत असून संपूर्ण वाचल्यानेंच नाथांचें रूपकचातुर्य समजतें. ‘ समस्त राज्यकर्ते धुरंधर, परगणे शरिराबाद सुभा, ताकीदपत्र दिधलें कीं, कायापुरास जिवाजी नामें गृहस्थ ’ अशी त्याची सुरवात आहे. ‘ जोहार मायबाप जोहार । मी विटू पाटलाचा महार ’ अशी आरोळी देणारे जोहारहि नाथांनीं पांच पन्नास रचिले आहेत.

भागवताच्या एकादश स्कंधावरील ओवीबद्ध टीका हा नाथांचा मुख्य ग्रंथ होय. वारकरी पंथांत ह्या ग्रंथाला ज्ञानेश्वरीच्या बरोबरीचें स्थान दिलें जातें. नाथांनीं भागवत धर्माचें रहस्य ह्या ग्रंथांत सांगितलें आहे. ह्या ग्रंथाची ओवीसंख्या १८८०० आहे. मूळ ग्रंथच कथारूप असल्यानें नाथांच्या निरूपणाला विशेष बहर चढलेला आहे.

भक्ति म्हणजे सर्वांभूतीं । सप्रेम भजन युक्ति ।
प्राप्ति म्हणजे अपरोक्षस्थिति । भगवत्स्फूर्ति अनिवार ॥

असें भक्तीचें रहस्य नाथांनीं ह्या ग्रंथांत सांगितलें आहे. पारमार्थिक गंभीर विचार नाथ आपल्या वाणीनें अगदीं सोपे करून सांगतात. अशा वेळीं त्यांच्या वाणीचा ओघ दुथडी वहात असतो.

‘ भावार्थरामायण ’ हा नाथांचा शेवटचा ग्रंथ. ह्याची ओंवीसंख्या ४०००० असून त्यांतील २५००० ओव्या नाथांच्या असून उरलेल्या

ओव्या नाथांचा शिष्य गावबा ह्यानें नाथांच्या पश्चात् रचून ग्रंथ पूर्ण केला. गावबाची रचना सहींसहीं नाथांच्या रचनेसारखी असल्यानें ग्रंथ एकटाकी वाटतो. मात्र रामायणकालीन स्थलकाल वर्णनांत एकनाथकालीन वातावरण आपणांस पहावयास मिळतें.

एकनाथांच्या गुरुभक्तीची आणि पारमार्थिक सुखाची बहार त्यांच्या अभंगांतच आपणास लुटावयास मिळते.

नरदेहाचा लाभ हा फार मोठा लाभ असून ईश्वरप्राप्तीनें त्याचें सार्थक करावें असें नाथ सांगतात. त्यासाठीं साऱ्या जगालाच आपण गुरु करावें असें ते म्हणतात. परमार्थमार्ग म्हणून नाथ नामसंकीर्तन, संतसंग, गुरुभक्ति, आत्मसाक्षात्कार इत्यादि पायऱ्यांचें निरूपण करतात. पण प्रपंचत्याग त्यांनीं कटाक्षानें सांगितलेला नाहीं. ज्या भागवत–मंदिराचा पाया ज्ञानदेवांनीं रचला त्याचा विस्तार नाथांनीं केला. परमेश्वराला सर्वस्व अर्पण करितांना जी उल्हसते ती खरी भक्ति होय असें सांगून ती भक्ति ज्ञानविज्ञानयुक्त असावी असें नाथ सांगतात. जो सर्वाभूतीं भगवंत पाहतो, भगवंताचे ठायीं भूतांना पाहतो व हें सर्व जो आपणांमध्यें पाहतो तो श्रेष्ठ भक्त होय हें भागवतधर्माचें रहस्य नाथांनीं सांगितलें आहें.

‘ धर्मसंस्थापनेचा संदेश ज्ञानदेवाकडून घेऊन तो पुढें समर्थाप्रत पोंचता करणें हें एकनाथांचें मुख्य कार्य होय, व तें त्यांनीं सर्वार्पणबुद्धीनें केलें, ’ असें त्यांच्या कार्याबद्दल जें म्हटलें आहे तें सार्थ आहे.

आपल्या जीवनाचा प्रत्येक क्षण परोपकारार्थ वेचून शके १५२१ मध्यें फाल्गुन वद्य ६ स नाथांनीं आपली जीवनयात्रा संपविली.

• • •

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. ३३०९ नों दि ............
वि. ............ क्र. ............

# दासोपंत

मराठी वाङ्मयाच्या इतिहासांत दासोपंतांइतकी प्रचंड रचना कोणत्याहि कवीनें केलेली नाहीं. काव्याचा अर्णव निर्माण करणारा कवि म्हणून दासोपंत ओळखले जातात. जगांत इतकी ग्रंथसंपत्ति कुणीं निर्माण केली नसावी.

बेदरच्या बहामनी शाहींत नारायणपेठ नांवाचें एक गांव होतें. त्या गांवीं दिगंबरपंत देशपांडे नांवाचे एक प्रतिष्ठित गृहस्थ जोशी वृत्तीनें राहात असत. त्यांच्या पत्नीचें नांव पार्वतीबाई. ह्या दंपतीच्या पोटीं शके १४७३ च्या भाद्रपद वद्य अष्टमीस दासोपंतांचा जन्म झाला. दासोपंत हे नाथपंचकांतील एक कवि समजले जातात. हे नाथांपेक्षां वयानें लहान पण त्यांचे समकालीनच होत. ते पुढें जोगाईच्या अंब्यास राहूं लागले. हे दत्ताचे एकनिष्ठ भक्त होते.

त्यांच्या चारित्रांतील साधारण विश्वसनीय वाटणारी एक आख्यायिका खालीलप्रमाणें दिली जाते.

दिगंबरपंत बेदरच्या बादशहाच्या पदरीं कारकून म्हणून राहिले होते. एकदां दुष्काळाचें साल आलें असतांना दिगंबरपंतांकडून बादशहाची रसद वेळेवर पोंचली गेली नाहीं, तेव्हां बादशहाची त्यांजवर नाराजी होऊन त्यांचा मुलगा दासोपंत यास धरून ओलीस म्हणून ठेविलें. एक महिन्यांत रसद न आली तर याला बाटवून मुसलमान करूं अशी धमकीही मिळाली. तेव्हां दासोपंतांचें वय १७-१८ वर्षांचें असेल. दासोपंतांना दत्तभक्तीचें वळण बापापासूनच लागलें होतें. त्यांनीं त्या संकटकाळीं दत्ताचें सतत ध्यानभजन केलें व दत्तानें रसदीची व्यवस्था लावून दासोपंतांची महासंकटांतून मुक्तता केली. त्या वेळेपासून दासोपंतांची दत्तावर दृढभक्ति बसली. त्यांच्या उपासनेंतील दत्तमूर्ति अजून अंबाजोगाईस आहे. कोणाचीहि ताबेदारी न करितां ते घरींच जन्मभर राहिले व त्यांनीं आयुष्यभर लेखनव्यवसाय केला.

दासोपंतांनीं ग्रंथलेखनाचा प्रपंच फार मोठ्या प्रमाणावर केला. रोज एका ढवूची शाई त्यांना लागत असे.त्यांची सारी कविता २–३ लाखांवर असेल. दासोपंतांचे कांहीं संस्कृत ग्रंथही उपलब्ध आहेत. एवढ्या मोठ्या पंडितानें मराठीच्या कैवारानें मराठी भाषेंत सुंदर आणि तीही अवाढव्य रचना केली हें मराठी भाषेचें मोटें भाग्य होय. गीतार्णव व ग्रंथराज हे त्यांचे प्रसिद्ध ग्रंथ आहेत. ह्याशिवाय वाक्यवृत्ति, पंचीकरण वगैरे ४६ उपलब्ध ग्रंथांची यादी प्रसिद्ध आहे. गीतार्णवबोध, प्रबोधोदय वगैरे एकांगी विषयांवरच त्यांच्या पांचसहा टीका आहेत. त्यांची पद्य-रचनाकार म्हणून मोठी ख्याति आहे. त्यांचीं १६०० पदें आहेत. त्यांनीं आपलें ग्रंथलेखन पासोडीवर केलेलें आहे.

गीतार्णव ह्या ग्रंथाच्या सव्वा लक्ष ओंव्या आहेत. त्यांतील १३००० ओंव्या मुद्रित आहेत. हा ग्रंथ म्हणजे गीतेवरील एक विस्तृत टीका आहे. आजपर्यंत गीतेवर झालेल्या सर्व मराठी टीकांमध्यें संख्येनें इतकी मोठी टीका दुसरी नाहीं. एका अठराव्या अध्यायाच्याच सोळा हजार ओंव्या आहेत. हा ग्रंथ लिहावयास दासोपंतांना वीस वर्षें लागलीं असें म्हणतात. या ग्रंथामध्यें ज्ञानेश्वरांचें लेखनकौशल्य मुळींच नाहीं. विवरणाची हातो-टीहि सामान्य आहे. पदोपदीं कंटाळवाणा पाल्हाळ आहे. विषयाची चर्चा करितांना दासोपंत अनेक वेळां पल्लेदार विषयांतरें करितात. आणि अशा वेळेला अनेक मनोरंजक कथा, चुटके, हरदासी नकला इत्यादी गोष्टींचा पाऊस पडतो.आपली ही टीका आचार्यांच्या भाष्याधारें लिहिलेली आहे असें दासोपंत आवर्जून सांगतात. ग्रंथ अफाट असला तरी अगदीं सुबोध, शुद्ध मराठींत लिहिलेला व चटकदार आहे. ग्रंथकार अत्यंत विद्वान् व वेदान्तवेत्ते होते यांत शंका नाहीं. पण त्यांनीं गीतेचा विषयहि शास्त्रीय परिपाठी बाजूला ठेवून निव्वळ मराठी माणसाला सहज समजावा इतका सुबोध केला आहे. नाथांच्या वेळचा कोणताच ग्रंथ इतका बालबोध नाहीं असें ह्या ग्रंथाबद्दल विद्वान् म्हणतात.

ग्रंथराज हा दासोपंतांचा दुसरा प्रसिद्ध ग्रंथ आहे. ह्याचीं प्रकरणें आठ असून ओवीसंख्या १२०० आहे. हा ग्रंथ म्हणजे दासबोधाचा पूर्वावतारच होय. राजकारण व सावधानपण हे दोन विषय सोडून दासबोधांतलेच विषय यामध्यें दासबोधाच्या पद्धतीनेंच प्रतिपादिले आहेत. रामदासांनीं हा ग्रंथ वाचला असावा असें वाटते. 'प्रतीति' व 'प्रबोध' हे रामदासांचे दोन अत्यंत आवडते शब्द प्रथम ह्या ग्रंथांत उपयोगांत आणले आहेत. दासबोधाच्या तिसऱ्या दशकांतल्या पहिल्या पांच प्रकरणांत रामदासांनीं जें चित्र रेखाटलें आहे तें दासोपंतांच्या ग्रंथराजाच्या तिसऱ्या प्रकरणावरून सुचलें असावें. दासबोध ही ग्रंथराजाची सुधारून वाढविलेली आवृत्ति आहे असें वाटण्याइतपत या दोन ग्रंथांत साम्य वाटतें.

पद्यकार म्हणून दासोपंत बरेच प्रसिद्ध आहेत. दासोपंतांच्या अफाट कवितासागरांतील रत्नें म्हणजे त्यांचीं अतीव मनोहर पदें होत. त्यांचें हृदय त्यांच्या पदांत व्यक्त झालें आहे.हीं सर्व पदें अत्यंत अकृत्रिम व भावगीतासारखीं मधुर आहेत. त्यांची भाषा खरोखरच अतिशय सोज्ज्वल आहे.

दासोपंतांचा गीतार्णव हा ग्रंथ म्हणजे एका अधिकारी विद्वान् व धार्मिक हरदासाचें मोठें थोरलें कीर्तन आहे असें वाटतें. दासोपंत गंमतीच्या गोष्टी, आख्यानें, उपाख्यानें, दृष्टान्त व दाखले वारंवार योजतात. त्यांच्या वर्णनशैलीची व भाषाप्रभुत्वाची अनेकांनीं स्तुति केली आहे. भाषा जास्त अर्वाचीन असून साधी व सोज्ज्वळ आहे. दासोपंतांनीं अत्यंत सुबोध, प्रासादिक आणि रसाळ शैली वापरलेली आहे. प्रसंग वर्णन करण्याचें कौशल्य त्यांच्या ठायीं भरपूर आहे. त्याचप्रमाणें अर्वाचीन भाषेत ज्याला शब्दचित्र म्हणतात अशा प्रकारचीं अनेक शब्दचित्रें दासोपंतांनीं काढलेलीं आहेत. अर्वाचीन परभाषेचा त्यांच्या भाषेवर संस्कार झालेला नाहीं. दासोपंतांची वर्णनशैली किती मोहक आहे पुढील स्त्रीसौंदर्याच्या मोहक वर्णनावरून लक्षांत येईल.

'मग रसविषयाचि पाटीं । आटवे चांपे गोरटी । षोडशवरूषी, मुष्टीमाजु सामावें ॥ सौभाग्यवती सुशीला । नेसली आथी सोनेसळा । ललाटीं मळिवटु शोभला । कुंकुमाचा ॥ दंतपंक्तीची झळाळ । कीर सुरंग रंगले तांबूल । चिरीव नयन विशाळ । काजळाची ॥ चंद्र लोपले वदनीं । तानवडे भंवारिया श्रवणीं । नासापुटीं सुपाणी । मोतीं झळके ॥ कदलीगर्भाची मृदुता । जानुद्वयांतें सुकुमारता । चंपकपुष्पाची बरळता ॥ काय तेथें ॥'

'चिंता पुरुषांतें बंधन । चिंता जीतचि मरण । चिंता सुखाचें छेदन । दुःखदाती ॥' 'धर्मु लक्ष्मीचें कारण । धर्मु लक्ष्मीचें रक्षण । धर्महीनाचें धन । व्यर्थ होये ॥' अशीं अनेक सुभाषितें दासोपंतांच्या गीतार्णवांत इतस्ततः विखुरलीं आहेत. त्याचप्रमाणें दासोपंतांच्या 'ग्रंथराजांत' हि असे सुविचार मौक्तिकमणि विपुल आहेत. उदा० 'ग्रंथावरूनी ज्ञान होय । तरी कां सेवावे गुरूचे पाय ॥' 'शरीर आपुलें मानावें । तरी तें सर्वथा नव्हे । बहुतांचें हें स्वभावें । होय म्हणौनि ॥' 'आपण आपणां जाणावें । गुणांचा कर्मी न लिंपावें । आपण आघवें होआवें । इतुलेंचि ज्ञान ॥' दासोपंतांच्या पदांत भावनेचें माधुर्य आपणांस पाहावयास मिळते. 'वाट पाहतां वेळु जाहाला वो बाइये । श्रीदत्तु गुंतला कोठें ? अजुनि कां न ये ॥'' ह्या पदांतील परमेश्वरदर्शनाची तळमळ संत–कवींच्या परंपेरस शोभण्यासारखीच आहे. 'दिगंबरेसीं येकत्व जालें । विश्वाचें दूरित पळालें ॥' असा त्यांचा अखेरीचा उपदेश आहे.

दासोपंतांचा मराठी भाषाभिमानहि विशेष आहे. एकनाथाप्रमाणेंच त्यांनीं अनेक वेळां मराठीची थोरवी वर्णिली आहे. संस्कृत भाषाभिमानी आणि मराठी भाषाभिमानी या दोघांतील मजेदार संवाद गीतार्णवांत सांपडतो. भाषेचा व्याप वाढत गेल्यानंतर नव्या कल्पना, नवे विचार येतात. जुन्या भाषेला ह्या नव्या कल्पना, हे नवे विचार पेलवत नाहींत. म्हणून मराठी भाषा श्रेष्ठ असें दासोपंत म्हणतात. संस्कृतपेक्षां मराठींत शब्दवैपुल्य आहे असें सांगतांनी ते म्हणतात—

' संस्कृतें घटु म्हणती । आतां तयाचे भेद किती । कवणा घटाची प्राप्ति । मानावी तेणें ।। ' ह्याच संस्कृत घटाला मराठींत गाडगें, मडकें, डेरा, रांजण असे किती तरी शब्द भेददर्शक असे आहेत.

इतकी प्रचंड आणि प्रासादिक रचना करणारे दासोपंत तितकेसे लोकप्रिय कवि नाहींत, ह्याचें एक कारण त्यांच्या ग्रंथांतील पाल्हाळ हें एक असावें आणि दुसरें कारण ह्या कवीची बेपर्वाईची वृत्ति होय. श्रोते अगर वाचक आपल्या ग्रंथाविषयीं काय अभिप्राय देतील याची मुळीच पर्वा न करितां अगदीं मोकळेपणानें दासोपंतांनीं आपली ग्रंथरचना केली आहे. 'न पाहे श्रोतयांचें वदन । न करी भाष्याधारें विवरण । स्वस्वानुभवें हें मनन । म्हणोनि संपादी ।।' ऐकेल तेणें ऐकावें । मानील तेणें घ्यावें । नावडे तेणें नेघावे । दोही श्रवणीं ।। असें ते म्हणतात. श्रोते अगर वाचक ह्याविषयीं इतकी अनास्थेची वृत्ति प्रस्तुत कालांत कोणी प्रगट केली नाहीं.

दासोपंतांनीं माघ वद्य ६ शके १५३७ ह्या दिवशीं समाधि घेतली. जोगाईच्या अंब्यास नृसिंहतीर्थाजवळ त्यांची समाधि आहे.

• • •

अनुक्रमांक 25680
वा.वा
2090
नों. दि. 3-7-69

महाराष्ट्र-शारदेच्या मंदिरांत काव्यवीणेचा झंकार घुमविण्याचा पहिला मान कविवर्य मुक्तेश्वर यांचा आहे. मराठी कवितेची मूळ बैठक अध्यात्माची, भक्तीची आहे. भावनेपेक्षांहि बुद्धीची चौकट मराठी कवितेला अधिक चपखल बसते. भागवत-धर्ममंदिराचा पाया घालणाऱ्या ज्ञानेशापासून ते त्या मंदिराचा कळस चढविणाऱ्या तुकारामापर्यंत सर्व महाराष्ट्रीय कवींनीं अध्यात्मविषयाचेंच निरूपण केलें. आत्मोद्धार, समाजोद्धार ह्या हेतूंनीं प्रेरित होऊन अशा ह्या श्रेष्ठ कवींनीं कविता लिहिली. त्यांनीं काव्य हें साधन म्हणून पत्करलें. समर्थांनीं सुद्धां अन्यविषयाच्या निरूपणास ' धीटपाठ ' असें म्हटलें आहे. हें मराठी कवितेचें धीर गंभीर स्वरूप बदलून तिच्यावर काव्यालंकाराचा साज मुक्तेश्वरांनीं प्रथम चढविला. अर्थात् त्यांनीं मराठी कवितेचा आत्मा जो ' भक्तिरस ' तो सोडला नाहीं. भक्तीच्या बैठकीवरच त्यांनीं इतर रसांचीहि मांडणी केली. ज्ञानेश्वर, एकनाथ, ह्या मुक्तेश्वरांच्या आधींच्या कवींनीं भागवत, भगवद्गीता अशा अध्यात्मपर संस्कृत ग्रंथाचें मराठींत निरूपण केलें. तर मुक्तेश्वरांनीं ह्या बाबतींतहि आपला नवा सुभा निर्माण केला. त्यांनीं महाभारतासारखा चित्तथरारक प्रसंगांनीं खचून भरलेला महाग्रंथ आपल्या काव्यनिरूपणासाठीं निवडला आणि मग उत्कृष्ट वर्णनशैली, नादमधुर भाषाशैली, शृंगार, वीर, करुण इत्यादि रसांचा मनोज्ञ परिपोष, शब्दरंगांनीं इंद्रधनुष्याची शोभा दाखविणारीं सृष्टिसौंदर्याचीं शब्दचित्रें, मनोवेधक व्यक्तिरेखा ह्यांनीं नटलेलें आपलें काव्य महाराष्ट्र-शारदेच्या चरणीं सादर केलें.

परंतु अशा ह्या रसिकश्रेष्ठ कवींच्या कालनिर्णयाविषयीं मात्र निश्चित माहिती नाहीं. महाराष्ट्र सारस्वतकार कै. भावे व काव्यसंग्रह संपादक रा. ओक ह्यांनीं कोंडीतकर, अत्रे ह्यांच्या टिपणवहीवरून, सरंजामे ह्यांच्या जंत्रीवरून व गोविंद बल्लाळ स्वामींच्या तंजावर येथील मठांतील एका वही-

वरून मुक्तेश्वरांचा जन्मशक १५३१ ( इ. स. १६०९ ) हा सांगितला आहे. पण हें मत प्रा. पंगु ह्यांना मान्य नाहीं. त्यांनीं भावे व ओक ह्यांचे पुरावे खोडून मुक्तेश्वरांचा जन्मशक १४९६ ( इ. स. १५७४ ) हा निश्चित केला आहे. त्यांनीं हा शक नाथांच्या प्रयाणकालावरून निश्चित केला आहे. नाथांचा समाधिकाल शके १५२१ ( इ. स. १५९९ ) हा निश्चित आहे. कारण ' शालीवाहन पंधरा शत शकीं एकागळें विंशाति ' असा नाथचरित्रकार केशवबोवांनींच निर्वाळा दिला आहे. कै. पांगारकर व कै. भारताचार्य वैद्य ह्यांनीं मुक्तेश्वर नाथांच्या प्रयाणकालीं पंचवीस वर्षांचे होते असें जें विधान केलें आहे तें गृहीत धरल्यास नाथांच्या प्रयाणकालां-तून पंचवीस वर्षे वजा केल्यास ( शक १५२१–२५), मुक्तेश्वरांचा जन्म-शक १४९६ ( इ. स. १५७४ ) हा सिद्ध होतो. शिवाय मुक्तेश्वरा-पासून त्यांच्या वंशांतील चवथे पुरुष मुक्तेश्वर गवईबुवा ह्यांना छत्रपतींनीं तेरवाडच्या इनामीची जी सनद दिली आहे तिचा शक १६४९ ( इ. स. १७२७ ) आहे. त्यावरूनहि प्रा. पंगूंनीं दिलेल्या शकास पुष्टि मिळते. त्यांच्या वाङ्मयांत ज्ञानेश्वर, एकनाथ, जनार्दनस्वामी ह्यांच्या विषयीं उल्लेख, त्यांच्या भाषेचा ठसा जसा आढळतो तसा तुकाराम, रामदास ह्यां-विषयीं कांहीं धागादोरा सांपडत नाहीं. ह्यावरून मुक्तेश्वर इ. स. १५७४ मध्यें जन्मले असावे व ते इ. स, १६४५–४६ च्या सुमारास स्वर्गवासी झाले असावे.

मुक्तेश्वर हे एकनाथांचे नातू होत. नाथांची गोदावरी नांवाची मुलगी पैठण येथील मुद्गल घराण्यांतील चिंतामणि नांवाच्या मुलास दिली होती. नाथ आपल्या मुलीला मोठ्या प्रेमानें लीला आणि जामाताला कौतुकानें विश्वंभर असें म्हणत. ' लीला कोणाची विश्वंभरांची ' असें नाथ विनोदानें म्हणत असत. आणि ह्या लीला–विश्वंभरांचे मुक्तेश्वर हे चिरंजीव होत. मुक्तेश्वरांनीं आपल्या मातापित्यांना गुरुस्थानीं मानलें आहे.

' चिन्मूर्ती लीलाविश्वंभरू। दत्तात्रेय जगद्गुरू । '

शिवाय सभापर्वाच्या उपसंहारांत मुक्तेश्वर म्हणतात—

'गोदावरी तट निवासी । अत्रिगोत्री पवित्र वंशीं ।
चिंतामणी गुणैकराची—। पासाव जन्म जयाचा ॥
तो मुद्‌गुल चिंतामणीसुत । लीला विश्वंभर जगविख्यात ।
व्यास भारतीचा अर्थ । महाराष्ट्र बोलिला ॥'

मुक्तेश्वरांचें शिक्षण नाथांच्याच देखरेखीखालीं झालें. मुक्तेश्वरांची बुद्धि सूक्ष्म, प्रतिभा उज्ज्वल व रसिकता ईश्वरदत्त असल्यामुळें आणि त्यांतच काव्यादि ललितवाङ्मयाच्या व वेदान्तादि गहन वाङ्मयाच्या अध्ययनाची व त्या काळीं सार्वत्रिक असलेल्या प्रवासप्राप्त व्यवहारज्ञानाची भर पडल्यामुळें त्यांच्या उपजत कवित्वशक्तींत महाकाव्योचित गुणांचा पूर्ण विकास झाला व त्याचें सुंदर फळ महाराष्ट्र—वाङ्मयास मिळालें.

मुक्तेश्वरी वाङ्मय संख्येपेक्षां गुणांनीं अधिक श्रेष्ठ आहे. संक्षेपरामायण हा मुक्तेश्वरांचा पहिला ग्रंथ असावा. ह्यांत पहिल्या पहिल्यांदा वाटणारी वृत्तवैचित्र्याची आवड दिसून येते. मुक्तेश्वरी महाभारत सर्व मराठी भारतांत अग्रगण्य ठरतें. कांहीं उल्लेखांवरून मुक्तेश्वरांनीं समग्र महाभारत अनुवादिलें असावें असें वाटतें. परंतु ह्या महाभारताचीं आदिपर्व, सभापर्व, वनपर्व, विराटपर्व व सौप्तिकपर्व अशीं फक्त पांचच पर्वें उपलब्ध आहेत. हें मुक्तेश्वरी भारत ओवीबद्ध आहे. एकूण उपलब्ध ओवीसंख्या १४०७९ आहे. ह्या भारताच्या नष्ट भागाविषयीं दोन आख्यायिकांचा उल्लेख केला जातो. कोणीतरी दुष्टांनीं मुक्तेश्वरी भारताचीं पर्वें जाळून टाकलीं अशी एक आख्यायिका सांगितली जाते. दुसरी आख्यायिका अशी आहे—मुक्तेश्वरांनीं आपला हा ग्रंथ नाथांना दाखविला. त्यांना तो मूळ व्यासभारतापेक्षांहि सरस वाटला.ह्या ग्रंथाच्या श्रेष्ठतेमुळें मूळ भारताला लोक अवमानतील असें वाटून नाथांनीं मुक्तेश्वरांना हा ग्रंथ बुडविण्यास सांगितला. मुक्तेश्वरांनीं तसें केल्यामुळें आज ग्रंथ उपलब्ध नाहीं. ही आख्यायिका

शक्य वाटत नाहीं. कालगणनेप्रमाणें मुक्तेश्वरांनीं आपलें महाभारत नाथांना दाखविलें असावें हें शक्य वाटत नाहीं. कारण त्यांच्या महाभारताचा रचनाकाल इ. स. १६४० च्या सुमाराचा दिसतो आणि नाथांचा समाधिकाल इ. स. १६२१ आहे. महाभारत हा मुक्तेश्वरांचा मोठा आणि सर्वश्रेष्ठ ग्रंथ होय. ह्याशिवाय ह्या ग्रंथानंतर इतर स्फुट प्रकरणें मुक्तेश्वरांनीं रचिलीं. हरिश्चंद्राख्यान, शतमुखरावणवधाख्यान, मूर्खांचीं लक्षणें, भगवद्गीता, शुकरंभा संवाद, श्री एकनाथ चरित्र, पदें व आरत्या व इतर किरकोळ चार पांच प्रकरणें मिळून ( भारतासह ) एकूण १७१५० एवढी मुक्तेश्वरी कविता आज उपलब्ध आहे.

मुक्तेश्वर हें महाराष्ट्रातील जसे पहिले रसिक कवि आहेत तसेच ते पहिले राष्ट्रीय कवि आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं. मुक्तेश्वरांनीं प्रवास बराच केला असल्यामुळें त्यांचा तत्कालीन जीवनाशीं चांगलाच परिचय झाला होता. आणि ह्या कवीचें वैशिष्ट्य असें कीं त्यानें अनुभविलेल्या जीवनाचा प्रतिध्वनि त्याच्या काव्यांत उमटलेला दिसतो. मुक्तेश्वरांनीं जे समारंभ पाहिले, जे भोजनप्रकार पाहिले, इंग्रज वगैरे परकीयांच्या हालचाली पाहिल्या त्या सर्वांचा समावेश आपल्या काव्यांत केला.

‘ तैलंग त्रिगुण मल्याळीचीं। सिंहल कोशल वैदर्भीचीं।
गौड गुर्जर बंगालीचीं। बहुवर्णांची साबुली ( लुगडीं ) ॥ ’

असें वस्त्रांचें वर्णन त्यांनीं दिलें आहे. तर

‘ आम्ररसेंसीं साखरमांडे। दधिसायेसीं कुरवडे।
दुग्धसायेसीं वांकुडे। कानवले स्वादिष्ट ॥ ’

असें भोजन प्रकारांचें वर्णन देऊन ‘ ब्राह्मणो भोजनप्रियः ’ ह्या सुभाषिताची सत्यता पटविण्यासाठीं

‘ अमर्यादेनें फुगली पोटें। धोत्रें ढिलावती थोटें।
रिता ठाव न दिसे कोठें। उदक तेंही घ्यावया ॥ ’

असें विनोदी वर्णन केलें आहे. पण ह्यामुळें मुक्तेश्वरांच्या काव्यांत कालविपर्यासाचा दोष निर्माण झाला आहे. त्यांनीं जें जें ऐकिलें अथवा पाहिलें, तें तें त्यांनीं कालौचित्याकडे विशेष लक्ष न देतां आपल्या ग्रंथांत कोठेंतरी गोवून टाकलें आहे. दुष्यंतानें जिंकलेल्या राजांत फिरंगी, इंग्रज, रूमशाम इत्यादींचा त्यांनीं समावेश केला आहे. ऋतुपर्ण राजा आपणांस लीलावती ग्रंथज्ञ म्हणवितो. भास्कराचार्यांचा लीलावती हा ग्रंथ ऋतुपर्ण राजानंतर कितीतरी वर्षांनीं झालेला. पण मुक्तेश्वरांच्या कालीं हा ग्रंथ श्रेष्ठ मानला जात होता. म्हणून लगेच कालौचित्याकडे लक्ष न देतां मुक्तेश्वरांनीं ऋतुपर्ण राजाला लीलावतीग्रंथज्ञ करून टाकला. दमयंतीचें आख्यान धर्माला सांगणाऱ्या वसिष्ठ ऋषींच्या तोंडीं

'अहल्या द्रौपदी सीता तारा। पांचवी मंदोदरी चतुरा।
त्यांचे महिमेचा दांडोरा। भुवनत्रयीं न समाये ॥'

अशी ओवी घालून द्रौपदीचा त्यांत उल्लेख केला आहे. लढायांचीं वर्णनें करतांनाहि अफगाण, तुर्क, उझबेग वगैरे सर्व मुक्तेश्वरकालीन ज्ञान पौराणिक कालांत घुसडलें गेलें आहे.

मुक्तेश्वरांची भाषा प्रसादपूर्ण आहे. पाण्याप्रमाणें त्यांच्या भाषेचा ओघ स्वच्छ असून अर्थप्रतीति सहज होते. संस्कृत शब्दांच्या अवास्तव भरण्यानें भाषा ओबडधोबड झालेली नाहीं. विशेषतः करुण प्रसंगांच्या वर्णनांत त्यांच्या भाषेचा ओघ प्रकर्षानें पहावयास सांपडतो. दमयंती–विलाप, सावित्रीचें वर्णन अशा ठिकाणीं मुक्तेश्वरांची काव्यसरिता दुथडी वाहतांना दिसते. मुक्तेश्वरांचें महाभारत हा त्यांच्या परिणत प्रज्ञेचा विलास होय. ह्या ग्रंथांत मुक्तेश्वराच्या अंगच्या मूळच्या रसिकतेस व स्वतंत्र प्रतिभेस विहार करण्यास पूर्ण मुभा मिळाली आहे, व त्यांची वाणी प्रसन्न, सहज व ओजवती बनली आहे. त्यांची भाषा सालंकृत असली तरी त्या अलंकाराचें बोजड ओझें दिसत नाहीं तर ते शोभूनच दिसतात. मुक्तेश्वरांच्या कल्पना-

शक्तीची झेंप त्यांनीं केलेल्या पूर्ण रूपकांत किंवा परंपरित रूपकांत दिसून येते. नलाचें वर्णन करितांना त्यांनीं

' धरा मंडळी प्रतापतरणी। प्रसन्नवदना प्रजानलिनी । धर्मसंपदा ही दोन्हीं। चक्रवाकें एकत्र ।। दारिद्र्य दोषाची हो राती। नाहींच केली सर्व जगती। दुर्जन तारकाची वस्ती । पहातां कोठेंही दिसेना ।। ' असें रूपक त्यांनीं योजिलें आहे. उपमा, रूपक, उत्प्रेक्षा, दृष्टान्त अशा इतरही अलंकारांचा मुक्तेश्वरांनीं सुंदर उपयोग केला आहे. प्रभातकाळचें वर्णन करितांना त्यांनी आदिपर्वांत ' गगन समुद्रीं मुक्ताफळें । अरुण चंचुनें कनकमराळें। वेचूनि घेतां कलाकुशळें । नाहींच केलीं नक्षत्रें ।। ' अशी उत्कृष्ट रूपकातिशयोक्ति योजिली आहे.

मुक्तेश्वरांचें वर्णनकौशल्य वाखाणण्यासारखें आहे. त्यांच्या काव्यांत उत्कृष्ट वर्णनें इतस्ततः विखुरलेलीं दिसतात. आदिपर्वांतील कण्व ऋषींच्या आश्रमाचें मांगल्यपूर्ण वर्णन, वनपर्वांतील रंगभूमीचें रंगमय वर्णन, राजवैभवाचीं वैभवशाली वर्णनें अशीं विविध चित्रें मुक्तेश्वरकाव्यमंदिरांत लटकतांना दिसतात.

' भीमसेन पाहे दृष्टी । तंव अंधकारें कोंदली सृष्टी<br>
गुल्मलता वृक्षदाटी । तृणें मार्ग लक्षेना ।।<br>
निशाचरीं श्वापद पक्षी । थोर गर्जना करिती कक्षी<br>
वोळकंबली महावृक्षीं । आस्वलें आणि वाघुळें ।।<br>
वनदेवता यक्षिणी पाळें । धुमस घालिती गदारोळें ।<br>
दीपिका लावुनी भंवाळें । गुप्त होती एकसरा ।। '

हें आदिपर्वांतील रात्रीचें वर्णन सृष्टिसौंदर्याच्या वर्णनाचा एक उत्कृष्ट नमुना आहे.

मुक्तेश्वरांचीं व्यक्तिचित्रेंहि तशींच आकर्षक आहेत. ' मी पतिव्रता जिणें नाहीं नसतां भर्ता । आजी अथवा वर्षशता । मरणदिवस सारिखा ।। ' असा निर्धार व्यक्त करणारी सावित्री, ' रति माधवी सुलोचना । उखा

कामशास्त्रीं निपुणा ' अशी निर्दोष सर्वगुणी धन्या । वैदर्भी दमयंती, ' सुरमंडळी सहस्रनयन । ग्रहमंडळी सहस्राकिरण । पाताळ भुवनीं सहस्र-वदन ' आणि ' चतुर्दश विद्या चौसष्ट कला विश्रामल्या ज्या देही ' असा नल, आरक्तता लेवूनी नयनें । अंजन क्षाळिलें अश्रुजीवनें । अधर स्फुरती जेविं पवनें । पद्मपत्रें थरकतीं ॥' अशी दुष्यंताच्या उपेक्षेमुळें जिची स्थिति झाली ती शकुंतला, ' शब्दविषय सांडील गगन । रूप, तेज, स्पर्श पवन । रसविषय सांडील जीवन। सत्य माझें चळेना ॥ ' असा भीष्मप्रतिज्ञ भीष्म अशीं विविध स्वभावचित्रें मुक्तेश्वरांच्या महाभारतांत आपणांस पहावयास सांपडतात.

संक्षेप आणि पाल्हाळ हे दोन्हीहि मुक्तेश्वरांच्या भारताचे विशेष आहेत. वनपर्वासारखें मोठें पर्व अवघ्या २७६५ ओवींत त्यांनीं आटोपतें घेतलें आणि ज्याविषयीं त्यांचें मन रंगतें त्या ठिकाणीं त्यांनीं मुळापेक्षां किती तरी विस्तृत वर्णन केलें आहे.

कविसंकेत, रूढवर्णनें ह्यांचाहि उपयोग मुक्तेश्वरांनीं पुष्कळ केला आहे.

' चंडांशु तैसे चंद्रकिरण । वज्रधारा मलयपवन ।
सूचिका अग्रें तैसे तीक्ष्ण । चंपकजाती बकुळादि ॥ '

असें विरहाचें वर्णन, चक्रवाकांचा विरह, वगैरे गोष्टी ठराविक पद्धतीनें मुक्तेश्वरी काव्यांत हजर आहेत. ' खांदीं वाहूनिया जननी । कडिये माद्रिकुमर दोनी । धर्मार्जुना बाहुस्थानीं । पाणितळें कवळिलें ॥ ' अशीं अतिशयोक्त वर्णनेंहि त्यांनीं केलीं आहेत,

असा हा श्रेष्ठ महाराष्ट्र रसिक कवि इ. स. १६४५–४६ च्या सुमरास कोल्हापूर संस्थानांत तेरवाड ह्या गांवीं स्वर्गवासी झाला. त्या ठिकाणीं मुक्तेश्वरांचें वृंदावन आहे.

● ● ●

'तुम्हापासीं आम्हां येऊनिया काय । वृथा सीण आहे चालण्याचा ॥ ' असा मूर्तिमंत निरिच्छतेचा निरोप ज्या थोर संतानें शिवाजी महाराजांस पाठविला, ' भिक्षापात्र अवलंबिणें । जळो जिणें लाजिरवाणें ॥ ' असा जीवनाचा जिवंत संदेश ज्यानें महाराष्ट्रास दिला अशा संतश्रेष्ठ तुकारामाचा जन्म पुण्यापासून जवळच असलेल्या देहू क्षेत्रीं झाला.

ह्या संतराजाच्या मृत्यूच्या सालाबद्दल वाद नसला तरी जन्मसालाबद्दल मात्र वाद आहे. कै. राजवाडे तुकारामाचा जन्मशक १४९० ( इ. स. १५६८ ) मानतात. कै. भावे ह्यांचे मतें शक १४९९ ( इ. स. १५७७ ) हा तुकारामाचा जन्मशक आहे. कै. पांगारकरांच्या मतें तुकारामाचा जन्म शके १५३० ( इ. स. १६०८ ) मध्यें झाला असावा तर श्री. रा. द. रानडे 'जरा कर्णमुळीं गोष्टी सांगो आली' ह्या ओळीच्या आधारें तुकारामाचा जन्मशक १५२० ( इ. स. १५९८ ) पर्यंत मागें नेतात. सर्वांच्या मतें तुकारामाचा वैकुंठकाळ इ. स. १६४९–५० हा निश्चित आहे. तुकाराम स्वर्गस्थ झाले तेव्हां तुकारामाची बायको गरोदर होती. तेव्हां तुकारामाचें प्रयाणकालीं वय ८२ किंवा ७३ असणें असंभवनीय वाटतें. तेव्हां कै. राजवाडे कै. भावे ह्यांनीं दिलेले जन्मशक बरोबर वाटत नाहींत. पांगारकरांनीं दिलेल्या पुराव्यावरून मृत्युप्रसंगीं तुकारामाचें वय ४२ असावें असें वाटतें. तेव्हां तुकारामाचा जन्मशक १५३० ( इ. स. १६०८ ) मानावयास हरकत नाहीं.

तुकारामाच्या घराण्यांत विठोबा हें दैवत फार पूर्वींपासून चालत आलेलें होतें. तरी तुकारामापासून त्याचा आठवा पूर्वज विश्वंभर ह्याच्यापासून ह्या मोऱ्यांच्या घराण्यांत विठोबाची अधिक भक्ति वाढली. देहूस असलेलें विठोबाचें देऊळ ह्याच्या वेळेसच झालें. पंढरपूरची आषाढीची वारीहि ह्या घराण्यांत पूर्वींपासून चालत आली होती. एकदां पंढरपुरास जाण्याच्या आधीं

आषाढ शुद्ध अष्टमीस विश्वंभरबाबास 'आपण देहूस आलों आहें' असें देवानें स्वप्नांत येऊन सांगितलें. आणि खरोखर इंद्रायणीच्या वाळवंटांत पांडुरंगाची मूर्ति सांपडली असें म्हणतात. ह्या विश्वंभराचा मुलगा हरी, हरीचा मुलगा विठोबा,- विठोबाचा मुलगा पदाजी, पदाजीचा शंकर, शंकराचा कान्होबा, कान्होबाचा बोल्होबा व बोल्होबाचा मुलगा तुकाराम अशी ही परंपरा लागते.

बोल्होबाला तिघे मुलगे होते. थोरला सावजी हा लहानपणापासूनच विरक्त होता. मधला तुकाराम, धाकटा कान्होबा. तुकारामावर मात्र सारा संसाराचा भार पडला. अल्पवयी असून सुद्धां तुकारामानें संसाराची जबाबदारी चांगल्या प्रकारें सांभाळली होती. परंतु परिस्थितीच्या एकावर एक होणाऱ्या हल्ल्यांनीं तो बेजार झाला. तुकाराम जातीनें शूद्र असून वाण्याचा धंदा करीत होता. 'याति शूद्रवंश केला वेवसाव' असें तुकारामच म्हणतो. वडील वारले. थोरला भाऊ घर सोडून गेला. ह्यांतच दुष्काळाची भर पडली. ह्या दुष्काळानें शके १५५१–५२ ह्या वर्षांत मोठें तीव्र स्वरूप धारण केलें. धंद्याचें दिवाळें निघालें. पहिली बायको दुष्काळांत अन्नान्न करून मेली. संतु ( शिवा ) नांवाचा तुकारामाचा वडील मुलगा होता. तोहि ह्या वर्षीं मरण पावला. या सर्व गोष्टींमुळें अंतःकरणांत विरक्ति बाणून तुकाराम ईश्वरभजनास लागला.

'दुष्काळें आटिलें द्रव्यें नेला मान। स्त्री एकी अन्न अन्न करितां मेली ॥'

अशा ह्या आपत्तीमुळें तुकाराम परमार्थाच्या पायरीवर चढला. तो म्हणतो,

'आरंभीं कीर्तन करी एकादशी। नव्हते अभ्यासीं चित्त आधीं ॥
कांहीं पाठ केलीं संतांचीं उत्तरें। विश्वासें आदरें करूनिया ॥'

ह्या वेळचें वर्णन करितांना तुकारामाचे आद्य चरित्रकार महिपतीबोवा ताहराबादकर म्हणतात–' एकविसाव्यांत विपरीत काळ। तुकयासी पातला तात्काळ। पूर्वार्ध संपले ऐशारीती। दुःखें दोखिली नानारीती ॥' ह्यावरून वयाच्या एकविसाव्या वर्षींच तुकारामास विरक्ती आली.

ह्यांतच तुकारामाची जी दुसरी बायको होती ती अति खाष्ट होती. तुकारामाची दुसरी बायको म्हणजे पुण्यांतील एक सावकार अप्पाजी गुळवे ह्यांची मुलगी अवलाई ऊर्फ जिजाबाई ही होय. माहेर श्रीमंत असल्यामुळे तिनें आपल्या नवऱ्याचा संसार सावरण्याचा पुष्कळ वेळां प्रयत्न केला. संसाराकडे पाठ केलेल्या तुकारामानें कधींहि संसारांत पूर्ण लक्ष घातलें नाहीं. ह्या खाष्ट जिजाबाईबद्दल तुकाराम म्हणतो—

'बरें झालें देवा बाईल कर्कशा। बरी हे दुर्दशा जनांमध्यें।
अनुतापें तुझें राहिलें चिंतन। जाला हा वमन संवसार॥'

ह्यावरून तुकारामाच्या मनांत निर्माण झालेलें वैराग्य म्हणजे एक क्षणिक लहर होती असें नसून तें ज्ञानपूर्वक दृढतर असें होतें असें दिसून येतें.

ह्यानंतर आपलीं खतपत्रें काढून तुकारामानें आपल्या कान्होबा नांवाच्या धाकट्या भावास त्याचा निम्मा वांटा दिला व आपल्या वांट्याचीं खतपत्रें इंद्रायणींत बुडविलीं. ह्यानंतर त्यानें संसारावर अगदीं उघडपणें तुळशीपत्र ठेवलें. रोज भांडारी नांवाच्या डोंगरावर ध्यानस्थ बसावें व रात्रीचा वेळ देवळांत भजनांत घालवावा असा त्याचा नित्यक्रम ठरलेला असे. पण ह्यावरून आपल्या संसाराचें सांकडें दुसऱ्यावर घालावें किंवा भिक्षेवर जगावें अशा निरभिमानी वृत्तीचा तुकाराम होता असें म्हणतां येणार नाहीं.

'भिक्षापात्र अवलंबिणें। जळो जिणें लाजिरवाणें।
ऐसियासि नारायणें। उपेक्षीजे सर्वथा॥
जगा घालावें सांकडें। दीन होऊनि बापुडे।
हेंचि अभाग्य रोकडें। मूळ आणि विश्वास॥'

असा रोकडा सवाल सत्याच्या निर्धारावर तुकारामानें दिला होता.

'काय न करी विश्वंभर। सत्य करितां निर्धार॥'

असा त्याचा दृढ विश्वास होता.

शेताची राखण करण्यासारखीं कामें तुकाराम मधून मधून करीत असावा असें कांहीं प्रचलित आख्यायिकांवरून वाटतें.

हळुहळू तुकारामानें कीर्तन करण्यास सुरवात केली. दुसऱ्यांच्या कथेंत ध्रुपद म्हणतांना व दुसऱ्यांच्या कथा ऐकितांना जें जें कानीं पडे त्याचें तो मनन करीत असे. त्यानें नामदेवाचे पुष्कळ अभंग आणि कबिराची कविता ही पाठ केली होती. त्यानें ज्ञानेश्वरी, एकनाथीभागवत, भावार्थरामायण, योगवासिष्ठ, अमृतानुभव इत्यादि अध्यात्मिक ग्रंथ वाचून त्यांचें चांगलें अध्ययन केलें होतें. ह्याशिवाय श्रीमद्भागवत, स्फुट आख्यानें, पुराणें हींहि त्यास माहीत होतीं. ह्या अध्ययनासाठीं तो भंडाऱ्याच्या डोंगरावर जाऊन बसत असे. ह्याच वेळेस त्याला बाबा चैतन्य नांवाच्या ब्राह्मणानें 'राम-कृष्ण' नामाचा मंत्र दिला. आपल्या गुरूपदेशाविषयीं तुकारामानें खालील उल्लेख केला आहे.

'राघव चैतन्य केशव चैतन्य । सांगितली खूण माळिकेची ।
बाबाजी आपलें सांगितलें नाम । मंत्र दिला रामकृष्ण हरि ।
माघ शुद्ध दशमी पाहुनि गुरुवार । केला अंगीकार तुका म्हणे ।'

तुकाराम स्थितप्रज्ञ झाले. इंद्रियें व मन हीं त्यांनीं आपल्या ताब्यांत घेतलीं. सर्व जगाला मोहांत पाडायला सिद्ध असणाऱ्या दोन वस्तु कनक आणि कांता यांचा मोह त्यांनीं जिंकला. त्यांच्या संसाराविषयींच्या उदासीनतेविषयीं जिजाबाई काय म्हणत असे हें तुकारामानेंच सांगितलें आहे.

'जीवंतचि मेले । लाजा वाटूनिया प्याले ॥'

याप्रमाणें स्वतःच्या संसाराकडे आणि स्वस्त्रीकडे लक्ष द्यायला ज्या तुकोबारायाला पळाची फुरसत नव्हती ते परस्त्रीकडे पाहणें शक्यच नव्हतें. कांहीं कुटाळांच्या कारवाईला बळी पडून एक लावण्यवती स्त्री तुकारामाकडे पापबुद्धीनें आली असतां तुकारामानें 'मातोश्री' म्हणून तिला साष्टांग नमस्कार घातला आणि.

'परावीया नारी रखुमाईसमान'

असें तिला बजाविल्यावर ती स्त्री त्याला शरण गेली. शिवाजी महाराजांना धाडलेल्या पत्रावरून तुकारामानें संपत्तीवर कशी लाथ मारली होती हें सिद्ध होतें.

‘ सोनें आणि माती । आम्हां समान हें चित्तीं ॥ ’

‘ परद्रव्य परनारी । जालीं विषाचिये परी । ’

‘ मान दंभ चेष्टा । हे तों शूकराची विष्टा ’

‘ मुंगी आणि राव । आम्हां सारिखाचि जीव ॥ ’

अशीं एक एक विचाररत्नें पाहिलीं म्हणजे ‘ अभंगवाणी तशाचि तुकयाची ’ असें कां म्हटलें जातें तें समजतें.

तुकारामाच्या अद्‌भुत सामर्थ्याच्या अनेक आख्यायिका महिपतीबोवांनीं सांगितल्या आहेत. चिंचवडच्या देवांच्या सांगण्यावरून पांडुरंग आणि गणपति यांना पंक्तीस बोलावणें, लोहगांवास शिवाजीवर आलेलें परचक्र टाळणें, सर्व शेत पक्ष्यांनीं खाल्लें असतांनाहि नेहमींच्या दसपट धान्य तयार होणें, अंगावर पांखरें गोळा करणें अशा विविध कथा महिपतीबोवांनीं सांगितल्या आहेत. त्यांतला अद्‌भुत भाग जरी गाळला तरी तुकारामाचें साधुत्व त्यांतून प्रतीत झाल्याशिवाय रहात नाहीं.

देहू व लोहगांव ह्या ठिकाणीं तुकारामाची लोकप्रियता फार वाढली. ठिकठिकाणीं त्याचीं कीर्तनें नेहमीं होत असत. तुकारामाचा धाकटा भाऊ कान्होबा, गंगाधर कडुसकर, संतोबा तेली जगनाडे, कोंडभट पुराणिक, नावजी माळी, बहिणाबाई वगैरे शिष्य नेहमीं त्याच्याबरोबर असत. देहू येथें एक मंबाजी नांवाचा महंत होता. तो तुकारामाचा द्वेष करी. क्षुल्लक कारणावरून यानें एकदां तुकारामास मारलें. पण तुकारामाच्या विलक्षण शांत वृत्तीमुळें तो अखेर तुकारामाचा शिष्य झाला. पुण्यापासून नऊ मैलांवर वाघोली नांवाचें गांव आहे. तेथें रामेश्वरभट वाघोलीकर नांवाचा विद्वान् ब्राह्मण रहात होता. तुकाराम शूद्र असून वेदांचा अर्थ सांगतो हें त्याला आवडलें नाहीं. त्यानें तुकारामास त्याचे अभंग बुडविण्यास सांगि-

तलें, तुकारामानें आपले सर्व अभंग इंद्रायणींत बुडविले. त्यानंतर आपला संसारहि बुडाला आणि परमार्थहि बुडाला असें वाटून त्यानें अन्नोदकहि घेण्याचें सोडलें. सात दिवसांच्या त्याच्या ह्या तपश्चर्येनंतर लोकगंगेनें त्याचे अभंग त्यास परत आणून दिले. हा त्यांचा अद्भुत पराक्रम पाहून रामेश्वरभटहि त्याचा परमशिष्य झाला.

अशा रीतीनें ईश्वरभजनांत सर्व जीवन व्यतीत करून शके १५७१ विरोधीनाम संवत्सराच्या फाल्गुन वद्य द्वितीयेस सोमवारीं सकाळीं—

'ऐका ऐका भाविक जन। कोण कोण व्हाल ते॥ तार्किकांचा टाका संग। पांडुरंग स्मरा हो॥ नका शोधूं मतांतरें। नुमगे खरे बुडाल॥ कलीमध्यें दास तुका। जातो लोका सांगत॥' असा अखेरचा उपदेश करून तुकाराम वैकुंठास गेला.

तुकाराम सदेह वैकुंठास गेला ह्या प्रकाराचें भाविक वर्णन रामेश्वरभट वाघोलीकर ह्यांनीं खालीलप्रमाणें केलें आहे:—

'भक्तिज्ञानें आणि वैराग्यें आगळा। ऐसा नाहीं डोळां देखियेला॥ जपतप यज्ञ लाजविलीं दानें। हरिनामकीर्तनें करोनिया॥ म्हणे रामेश्वर सकळां पुसोनी। गेला तो विमानीं बैसोनिया॥'

भाविक लोक तुकाराम हा नामदेवाचा अवतार मानतात. नामदेवानें शतकोटि अभंग करावयाची प्रतिज्ञा केली होती. परंतु तो चौऱ्याण्णव कोटि एकुण पन्नास लक्ष अभंग करून निवर्तला व पांच कोटि एकावन्न लक्ष अभंग करण्यासाठीं पुन्हां त्यानें तुकारामाच्या रूपानें अवतार घेतला असें भाविक लोक मानतात; परंतु असें असलें तरी तुकारामाच्या उपलब्ध अभंगांची संख्या मात्र ४६०० वर जात नाहीं. हे अभंग मात्र महाराष्ट्र-वेदाचा मोठा अमोल ठेवा आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. तुकारामानें देवाला आळवण्यासाठीं भक्तिभावानें कथाकीर्तनें केलीं व लोकांना जिव्हाळ्याचा उपदेश करून परमेश्वरस्वरूपाकडे वळविण्यासाठीं कवित्व

केलें. त्याच्या कवितेंत पराकाष्ठेची कळकळ आहे. प्राणिमात्रांच्या कळकळी-मुळें त्यांनीं धूर्त, पाखांडी, नास्तिक, तर्कटी, दांभिक, धर्मलंड; आचार-भ्रष्ट, शाक्त इत्यादिकांवर अत्यंत तीव्र कोरडे ओढले आहेत. 'आम्हां हें उचित जगा द्यावी नीत । करावें फजीत चुकती ते ॥ ' असें त्यानें म्हटलें आहेच.

संतांनीं महाराष्ट्रास निष्क्रिय केलें हा जो एक सर्वसाधारण आक्षेप आहे तो निदान तुकारामास तरी पूर्णपणें लावतां येत नाहीं असें वाटतें. तुकारामानें विरक्त होऊन संसारत्याग केला हें खरें आहे. पण त्यानें इत-रांना कर्तव्यविन्मुख होण्यास शिकविलें नाहीं फार झालें तर असें म्हणतां येईल कीं तुकारामासारख्या संतांनीं स्वतःचा संसार जगाचा संसार सावर-ण्यासाठीं सोडला; कारण 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह झिज-विती परोपकारें ॥ ' निव्वळ संन्यस्त वृत्ति पत्करून तुकाराम समाजाशीं फटकून वागत होता असें दिसत नाहीं. बाणेदारपणा, सत्य निर्धार, शांत वृत्ति, कनक आणि कांता ह्यांचा तिरस्कार, निस्पृहता असे केवळ समाज-जीवनाला अत्यंत आवश्यक असेच धडे त्यानें समाजाला दिले. एवढेंच नव्हे तर ते आचरणांत आणले. त्यानें दिलेलें ' निश्चयाचें बळ तुका म्हणे तेंचि फळ ' ' तुका म्हणे क्षमा सर्वांचें स्वहित । धरा अखंडित सुखरूप । असे समाजजीवनाचे धडे कोणत्या काळांत उपयोगी पडणार नाहींत ? ' परीक्षावे कोण राज्याचे रक्षक । विवेकाविवेक पाहोनिया । ' असा त्यानें शिवाजी महाराजांना उपदेश केला, एवढेंच नव्हे तर ज्याचा स्वधर्म तोच त्यानें आचरला पाहिजे, त्यावांचून त्यास दुसरा तरणोपाय नाहीं ' असें सांगून शिवाजी महाराजांचें मन त्यानें परत प्रजापालनकार्याकडे वळविलें. प्रत्येक गोष्ट त्या त्या अधिकारी व्यक्तीनेंच करावयास हवी असें सांगतांना तुकाराम म्हणतो, ' येथें पाहिजे जातीचें । येरां गबाळाचें काम नोहे ॥ ' दांभिकावर कोरडे ओढतांना 'तुका म्हणे ऐशा नरा । मोजोनि मारा पैजारा' असा कडक इशारा त्यानें दिला आहे. ' मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास

परि कठीण वज्रातें भेदूं ऐसे ॥ ' असें आपलें स्वरूपहि त्यानें विशद केलें आहे. ह्या आणि इतर अनेक ठिकाणीं तुकारामाचा व्यवहारवादच अधिक उत्कटपणें दिसून येतो.

' तुकारामाला कवि म्हणणें म्हणजे त्याला कमीपणा देण्यासारखें आहे ' असें डॉ. केतकरांनीं म्हटलें आहे. ह्याचा अर्थच असा कीं तुकारामानें काव्यासाठीं काव्य केलें नाहीं तर लोकांना शिकविण्यासाठीं काव्य केलें. त्याला कांहींतरी लोकांना सांगावयाचें होतें, लोकांना रिझवावयाचें नव्हतें. म्हणून त्यानें काव्यरचनेच्या इतर बाह्य लक्षणाकडे विशेषसें लक्ष दिलेलें नाहीं. त्यानें आपल्या निवेदनासाठीं अभंगासारख्या सोप्या छंदाची निवड केली आणि आबालवृद्धांना आपलें तत्त्वज्ञान सांगितलें. म्हणूनच त्याच्या भाषेंत सोपेपणा, खणखणीतपणा हे विशेष गुण आढळतात. वेदान्तासारखें गूढ तत्त्वज्ञानहि सोप्या शब्दांत सांगण्याचें तुकारामाचें निवेदनकौशल्य अवर्णनीय आहे. ' तुझी भेट घेणें काय हें मागणें आशेचें हें शून्य केलें आम्ही । 'निराशेचा गांव दिधला आम्हांशीं प्रवृत्तिभागाशीं सांडियेलें ॥ ' असें तुकारामानें शिवाजीस लिहिलेल्या पत्रांत म्हटलें आहे. तुकारामानें केलेल्या विराण्याच्या अभंगांतहि गूढगुंजन दिसून येतें. तुकारामाचा आत्मविश्वासहि वाखाणण्याजोगा आहे. ' वेदाचा तो अर्थ आम्हांसी टाऊका ' असें तो आपल्या अभंगवाणीबद्दल म्हणतो. आपल्या तत्त्वांच्या स्पष्टीकरणार्थ त्यानें 'तृण नाहीं तेथें पडिला दावाग्नि । जाय तो विझोनी आपसया ' 'नाहीं काष्ठाचा गुमान । गोवी भ्रमरा सुमन ।'असे दृष्टान्तहि ठिकठिकाणीं योजिले आहेत. त्यावरून त्याची व्युत्पन्नता दिसून येते.

भक्तिमार्ग हा भगवत्प्राप्तीचा एकमेव मार्ग आहे व नामसंकीर्तन हें त्याचें साधन अशी शिकवण इतर संतांप्रमाणें तुकारामानेंहि दिली. ' समचरण दृष्टी विटेवरी साजिरी. ' 'सुंदर तें ध्यान उभा विटेवरी, ' ' राजस सुकुमार मदनाचा पुतळा " 'सदा माझे डोळा जडो तुझे मूर्ती,' 'करकटावरी तुळशीच्या माळा ' हे तुकारामाचे ध्यानाचे पांच अभंग अत्यंत लोक-

प्रिय व अतिमनोहर आहेत. आम्ही आपल्या भक्तिबळानें निराकाराला आकार घ्यायला लावतों व भक्ताच्या प्रेमानें देवही तो घेतो. 'नाहीं काष्ठाचा गुमान। गोवी भ्रमरा सुमन।' असें तुकाराम म्हणतो.'हरिभक्त माझे जिवलग सोयरे।' असें वारकऱ्यांबद्दल त्यानें म्हटलें आहे. 'हाचि माझा नेम, हाचि माझा धर्म। नित्य वाचे नाम विठोबाचें।' असा नामसंकीर्तनाचा निर्धार त्यानें वारंवार व्यक्त केला आहे.

'तरीच जन्मा यावें। दास विठ्ठलाचे व्हावें॥' 'शुद्ध बीजापोटीं। फळें रसाळ गोमटीं।' 'नाहीं निर्मळ जीवन। काय करील साबण।' 'लहानपण दे गा देवा। मुंगी साखरेचा रवा।' 'ज्याचे अंगीं मोठेंपण। तया यातना कठीण।' 'मोलें घातलें रडाया। नाहीं असूं आणि माया।' 'चाकरीवांचून। खाणें अनुचित वेतन।' अशा अगणित सुभाषितरत्नांची थाटलेली पेठ तुकारामाच्या अभंगांत पाहिली म्हणजे तुकाराम हा संतश्रेष्ठ आहे असें म्हणावेंसें वाटतें.

• • •

'वन्ही तो चेतवावा । चेतवितांच चेततो ॥' असा ज्वलत् संदेश देऊन महाराष्ट्राला खडबडून जागें करण्याचें श्रेय बहुतांशीं राष्ट्रगुरु श्रीसमर्थ रामदास स्वामी यांनाच आहे.

रामदासांचे पूर्वज मूळचे बेदर प्रांतीचे राहणारे. त्यांचें उपनांव ठोसर आणि गोत्र जामदग्न्य. नवव्या शतकांत बेदरांत बेबंदशाही झाल्यामुळें कृष्णाजीपंत ठोसर नांवाचे समर्थांचे पूर्वज गोदातीरीं बीड प्रांतांत येऊन स्थाईक झाले. कृष्णाजीपंतांचे चिरंजीव दशरथपंत यांनीं कसबे जांबगांव वसविला व ठोसरांचें घराणें कुलकर्णी वतन करून जांब, आसनगांव वगैरे गांवीं राहूं लागले. ह्या घराण्यात रामाची उपासना प्रथमपासूनच होती. ह्या घराण्यांतील दशरथपंतांपासून विसावे पुरुष सूर्याजीपंत यांचा जन्म शके १४९० मध्यें जांब गांवींच झाला. सूर्याजीपंत परम तपस्वी, भागवत-धर्मी व षट्कर्मी निरंतर तत्पर होते. त्यांची सूर्योपासना व रामोपासना अत्यंत उज्ज्वल होती. 'तुला मारुतीच्या कृपेनें पुत्र होईल, तो ब्रह्मचर्याचा अवलंब करून जगदुद्धार करील' असा दृष्टान्त सूर्याजीपंतांना झाला होता. त्यांच्या पत्नीचें नांव राणूबाई. सूर्याजीपंतांना झालेला दृष्टान्त लौकरच खरा ठरला. शके १५३० च्या चैत्र शुद्ध नवमीस मध्यान्हीं रामजन्मसमयीं रामदासांचा जन्म झाला. त्यांचें नांव नारायण असें ठेवण्यांत आलें होतें. सूर्याजीपंत व राणूबाई यांचा नारायण हा धाकटा मुलगा. थोरला मुलगा गंगाधर याचा जन्म शके १५२७ मध्यें झाला. हेच पुढें श्रेष्ठी ह्या नांवानें श्रेष्ठ पदवीस चढले. समर्थांचें बालपण खेळण्याबागडण्यांत गेलें. 'वृक्ष सरोवरीं उड्या घेती । रानीं वनीं सदा असती ।' असें त्यांच्या बाललीलांचें वर्णन 'श्रीसमर्थप्रताप' कार गिरिधरस्वामी ह्यांनीं केले आहे. समर्थांची बुद्धि तीव्र असल्यानें रूपावळी, समासचक्र, पूजा, वैश्वदेव, ब्रह्मयज्ञ वगैरे त्या काळीं प्रचलित असलेला अभ्यासक्रम त्यांनीं लौकरच संपविला. पण ह्या

बालवयांतच समर्थांवर दुर्धर प्रसंग ओढवला. त्यांच्या वयाच्या सातव्या वर्षीच त्यांचे वडील सूर्याजीपंत निजधामास गेले. श्रेष्ठांना वडिलांनीं रामोपदेश दिला होता. वडील वारल्यानंतर आपणांस रामोपदेश देण्याबद्दल समर्थांनीं वडीलबंधूजवळ हट्ट घेतला, परंतु बंधूंनीं नकार दिल्यावरून रुसून समर्थ मारुतीच्या देवळांत गेले. तेथें त्यांना श्रीरामानें अनुग्रह दिला असें चारित्रकार सांगतात. ह्या वेळेस समर्थांचें वय अवघें आठ वर्षांचें होतें. नेहमीं समर्थ बहुतेक वेळ सवंगड्याबरोबर रानींवनीं बागडण्यांत घालवीत. तेव्हां त्यांची आई त्यांना एकदां दटावून म्हणाली, ' नारायणा, पुरुषाच्या जातीनें कांहीं घरादाराची काळजी करावयास हवी. सारा वेळ काय उनाडकींत घालवावा ?' ह्यावर विचारी नारायणानें जी दडी मारली ती एका अंधारकोठडींत. घरांतल्या माणसांनीं सगळीकडे शोधाशोध करून पाहिलें, पण नारायणाचा कुठें पत्ता नाहीं. शेवटीं नारायणाची माता सहज कोठडींत जाऊन पाहते तों नारायणाची स्वारी आपली कोपऱ्यांत बसलेली. आईनें विचारलें, 'काय करतोस रे नारायणा ! ' नारायणानें ताडकन उत्तर दिलें ' चिंता करितों विश्वाची। ' केवढे आत्मविश्वासाचे बोल हे ! हे नारायणाचें लक्षण श्रेष्ठांना कांहीं वेगळेंच दिसलें. विश्वाची चिंता वाहणाऱ्या ह्या समर्थांचे पाळण्यांतले पाय श्रेष्ठांच्या लक्षांत यायला वेळ लागला नाहीं. त्यांनीं तसें राणूबाईला सांगितलेंहि. तेव्हां नारायणाच्या पायांत लग्नाची बेडी अडकाविण्याचें राणूबाई व श्रेष्ठ यांनीं ठरविलें. आसनगांवीं राणूबाईंचे बंधु भानजीपंत यांची कन्या वधू म्हणून पसंत करण्यांत आली. ' अंतरपाट धरीपर्यंत तूं कांहीं बोलूं नकोस ' ह्या राणूबाईच्या आज्ञेला समर्थांनीं कबुली दिली असल्यामुळें तोंपर्यंतचे सर्व विधी होईपर्यंत समर्थ कांहीं बोलले नाहींत. फाल्गुन शुद्ध अष्टमीचा ११ घटकेचा मुहूर्त साधावयाचा होता. वेदोनारायणांनीं अंतरपाट धरिला आणि मंगलाष्टकें म्हणण्यास सुरवात केली. ' शुभमुहूर्त सावधान ' हे शब्द कानीं आले मात्र, महाराष्ट्राला

सावधानतेचा इशारा देणारा नारायण एकदम सावध झाला. ब्राह्मणांनीं सावधान म्हणतांच समर्थ तोच उपदेश समजून घराबाहेर पडले.

लग्नमंडप सोडून बाहेर पडलेले तेरा वर्षांचे समर्थ गोदातीरीं पंचवटीस येऊन राहिले. तेथें त्यांनीं १२ वर्षें पुरश्चरण केलें. नंदिनी व गोदावरी या दोन नद्यांच्या संगमावर टाकळी नांवाचें गांव आहे. ती जागा समर्थांनीं आपल्या तपश्चर्येसाठीं शोधून काढली. संगमावर पहाटे स्नान करावें, संध्यावंदनादि करून सूर्योदयापासून मध्यान्हकालापर्यंत नदींत एका पायावर उभे राहून गायत्री-पुरश्चरण करावें, मध्यान्हीं भिक्षा मागावी, रामरायास नैवेद्य समर्पण करून भोजन करावें, शास्त्रीपंडितांच्या सन्निध राहून दुपारीं शास्त्राध्ययन करावें व संध्याकाळीं कीर्तनश्रवण करून टाकळीस यावें, असा समर्थांचा कार्यक्रम आंखलेला होता. सतत १२ वर्षें ही तपःसिद्धि चालली होती. ' गोडी लागली रामीं । न गुंतत कामीं हो ।' अशी त्यांची या वेळेस स्थिति झालेली होती. रामप्राप्तीची त्यांची उत्कंठा किती तीव्र होती हें पुढील ओळींवरून लक्षांत येईल—

' शब्द न फुटे तरी चिंतीन अंतरीं ।
भक्तिप्रेम परी न संडी सत्य ॥ '
' आतांचि हा देहो राहो अथवा जावो ।
भक्तिप्रेम भावो न संडीं सत्य ॥
म्हणे रामीरामदास वरी पडो आकाश ।
राघवाची कास न संडीं सत्य ॥ '

समर्थांचें हें तपसाधन व्यवहारी जगाला पटत नव्हतें. लोक त्यांना पाहून म्हणत ' यासी काय झालें धडचि कां बिघडलें । वयेंवीण लागलें देवपिसें ॥ ' परंतु समर्थांची होत असलेली ही टीका पुढें कांहीं चमत्कारानें बंद पडली. समर्थ पंधरा वर्षांचे होते तेव्हां एका स्त्रीनें त्यांना नमस्कार केला. समर्थांनीं तावडतोब " अष्टपुत्रा सौभाग्यवती भव " असा नेहमींप्रमाणें आशीर्वाद दिला. तेव्हां त्या स्त्रीनें ' आपला पति मृत

पावला असून आपण सती जात आहोंत ' असें वृत्त सांगितलें. परंतु समर्थांचा आशीर्वाद खोटा कसा ठरणार ? त्यांनीं त्या स्त्रीच्या नवऱ्याचें प्रेत आणविलें व त्यावर गंगोदकाचें सिंचन केलें. ताबडतोब त्या स्त्रीचा नवरा झोपेंतून जागा झाल्याप्रमाणें उठून बसला. ' तुम्हांला दहा पुत्र होतील. त्यांतील पहिला मुलगा व्रतबंधसंस्कारानंतर माझ्या कार्यासाठीं द्या ' असा समर्थांनीं त्या दंपतीला आशीर्वाद दिला. समर्थांचा आशीर्वाद पूर्णत्वानें सत्यस्थितींत उतरला. वरील दंपतीचे वंशज आज दशपुत्रे ह्या नांवानें नाशिक भागांत नांदत आहेत असें कै. ह. भ. प. पांगारकर सांगतात. समर्थांचें हें सामर्थ्य पाहून नाशिककर मंडळी त्यांच्या भजनीं लागली. बारा वर्षांनीं समर्थांची तपश्चर्या पूर्ण झाली. उपरोक्त दंपतीनें आपला उद्धव नांवाचा पहिला मुलगा समर्थांच्या स्वाधीन केला. हाच प्रसिद्ध समर्थशिष्य उद्धव होय. समर्थांनीं टाकळीस आपल्या पहिल्या मारुतीची स्थापना केली व उद्धवाची तेथें नेमणूक केली. समर्थांनीं शके १५४२ च्या माघापासून १५५४ च्या फाल्गुनापर्यंत टाकळीस पुरश्चरण केलें. नंतर ते तीर्थयात्रेस निघाले.

श्रीरामाची आज्ञा घेऊन समर्थ तीर्थयात्रा करण्यास पंचवटीहून निघाले. समर्थांनीं तीर्थयात्रा करण्याच्या हेतूनें सर्व भरतखंड पालथा घातला. सर्व हिंदुस्थान त्यांना नजरेखालीं घालावयाचा होता. त्यांनीं हिंदुस्थानांतील एकहि तीर्थ किंवा पवित्र क्षेत्र पहावयाचें ठेवलें नाहीं. हिंदुधर्माचें प्रमुख धर्मपीठ जें काशीक्षेत्र त्या ठिकाणीं समर्थ प्रथम गेले. प्रयाग, गया, काशी ही त्रिस्थळी प्रथम करून समर्थांनीं कांहीं दिवस काशीक्षेत्रीं वास केला. गंगास्नान व काशीविश्वेश्वराची पूजाअर्चा ह्यांत त्यांनीं कांहीं महिने घालवून आपल्या मनाला अध्यात्माचें सामर्थ्य मिळवून दिलें. काशीला हनुमंत घाटावर मारुतीची स्थापना करून समर्थ श्री रामप्रभूच्या अयोध्या नगरीस गेले. अयोध्येस समर्थ वर्षभर होते. त्यानंतर गोकुळ, मथुरा, वृंदावन, मातृगया, द्वारका ह्या कृष्णचरित्रानें पावन झालेल्या क्षेत्रांना त्यांनीं भेट दिली. ह्या तीर्थक्षेत्रीं समर्थांचा अधि-

वास असतांना त्यांच्याकडून उपदेशाचे चार अमृतशब्द ऐकण्यास मिळा-वेत म्हणून भक्तगण त्यांच्या भोंवतीं जमत.अशांना ते रामभजनीं लावीत व मारुतीची स्थापना करीत समर्थ पुढें जात. रामायणकालीं उत्तरेकडच्या आर्यांनीं दाक्षिणेकडे आक्रमण केलें. आणि आतां समर्थकालीं मारुतीचें आक्रमण उत्तरेकडे झालें. पुढील कालीं मराठ्यांच्या भीमपराक्रमानें उत्तर-हिंदुस्थानांत आक्रमण केलें. त्याची मुहूर्तमेढ समर्थांनीं ह्या पराक्रमदेव-तेच्या स्थापनेनें रोवली. समर्थांनीं श्रीनगरापर्यंत प्रवास केला. तेथें गुरु नानकांच्या शिष्यांची व समर्थांची भेट झाली. नंतर बद्रीनारायण, केदारे-श्वर, गंगोत्री, जम्नोत्री, लक्ष्मणझूला, हरिद्वार करून समर्थ परतले. जगन्नाथपुरीहून रामेश्वरला येऊन ते कर्नाटकांत शिरले. गोकर्ण, किष्किंधा वगैरे कर्नाटकभाग पाहून त्यांनीं करवीर, महाबळेश्वर, पंढरपूर, वाई वगैरे महाराष्ट्रांतील क्षेत्रांत संचार व वास्तव्य केलें. समर्थांनीं या तीर्थक्षेत्रांचा उच्चार आपल्या कवनांत केला आहे. ‘ केला काशीविश्वेश्वर। श्वेतबंध रामेश्वर ॥ बारा लिंगें यावेगळीं । तीर्थें केलीं भूमंडळीं ॥ ’ असे कित्ती-तरी उल्लेख सांपडतात. ज्या हेतूनें समर्थांनीं ही तीर्थयात्रा केली तो त्यांचा हेतु पूर्ण झाला. यवनांच्या सत्तेनें सबंध भरतखंडाची कशी हीन स्थिति झाली होती हें त्यांना प्रत्यक्ष पहावयास मिळालें. ते म्हणतात—

देवस्थानें उदंड होतीं । आतां जाले म्लेंच्छ नृपती ।
ठाई ठाई उरूस भरती । कीर्ती उदंड सांगती रे ॥
‘ तीर्थक्षेत्रें मोडलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं ।
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥ ’

बारा वर्षे तीर्थयात्रेंत घालवून समर्थ परत आले.बारा वर्षे तपश्चर्या व बारा वर्षे तीर्थयात्रा अशीं चोवीस वर्षे घराबाहेर काढल्यानंतर समर्थ आपल्या जन्मगांवीं, जांबेस परतले. मातेचें दर्शन घेण्याची त्यांना मोठी उत्कंठा लागली होती. चोवीस वर्षांपूर्वी ‘ सावधान ’ शब्द ऐकतांच ज्या घराचा उंबरठा ओलांडून तेरा वर्षांचा नारायण बाहेर पडला होता, त्याच घराचा

अनुक्रम 28676 वा.आ. 2090 नों. दि. 3-7-61

उंबरठा ओलांडून ' जय जय रघुवीर समर्थ ' अशी ललकारी देत समर्थ रामदास गृहप्रवेश करते झाले. कोणी बैरागी आला आहे असें पाहून श्रेष्ठांच्या पत्नीनें त्यांना भिक्षा घातली. पण भिक्षा झोळींत पडतांच हा बैरागी जागचा हालेनाहि. समर्थांच्या भावजयीला आश्चर्य वाटलें. ' अग बाई हा बैरागी इथंच ठाण देऊन बसला ' असें ती साध्वी म्हणतांच ' हा बैरागी इथलाच आहे मुळीं ' असें समर्थ म्हणाले. समर्थांचा आवाज वृद्ध मातेनें ओळखला. वृद्धावस्थेमुळें व नारायणवियोगामुळें ती अगदीं क्षीण झाली होती. ती तशीच सरपटत बाहेर येऊं लागली. समर्थांनीं धांवतच जाऊन आपल्या मातेचे चरण अश्रुजलानें धुवून काढले. कांहीं दिवस समर्थ मातेच्या सन्निध राहिले. ह्या गृहवासांत त्यांनीं आईच्या सांगण्यावरून भागवतावर पुराण सांगितलें. नंतर त्यांनीं मातेची अनुज्ञा घेऊन आपलें राष्ट्रोद्धाराचें कार्य करण्यास सुरवात करण्याचें ठरविलें. कृष्णातीरचा चाफळ परळी हा भाग आपलें कार्यक्षेत्र ठरवून समर्थ जांबेहून निघाले. कृष्णा-तटाक हीच आपली कर्मभूमि निवडण्यांत समर्थांचा कांहीं विशेष हेतु असावा. शहाजीराजांच्या रोहिड–खोऱ्यांतील राजकारणाला शके १५६५ च्या सुमारास सुरवात झालेली होती. तेव्हां शहाजीराजांच्या ह्या राज-कारणाला अध्यात्माची बैठक देण्याचा समर्थांचा हेतु असावा म्हणूनच त्यांनीं ही जागा आपल्या आश्रमासाठीं पसंत केली असावी. शके१४६७त मसूर येथें समर्थांनीं पहिला रामजन्मोत्सव केला व १५७० मध्यें चाफ-ळचा रामजन्मोत्सव झाला. अशा रीतीनें समर्थांनीं आपल्या दाससांप्र-दायाची स्थापना केली.

समर्थ आणि शिवछत्रपति यांच्या भेटीचा प्रसंग समर्थांच्या चरित्रां-तील तसाच महाराष्ट्राच्या राजकारणांतील एक महत्त्वाचा प्रसंग आहे. शके १५५३ मध्यें समर्थांचें नाशिक येथें पुरश्चरण चालू असतां शहाजीराजांनीं शिवाजी महाराजांसह समर्थांचें दर्शन घेतलें असावें असें कांहीं चरित्रकार म्हणतात. ह्या वेळेस शिवाजी महाराज एक वर्षाचे होते. ह्यानंतर तीर्थयात्रा

करून समर्थ परत आले तोंपर्यंत शिवाजी महाराजांचें आरंभींचें राजकारण सुरू झालें होतें. ह्या वेळेस शिवाजी महाराज व समर्थ ह्यांच्या गांठी भेटी झाल्या असणें शक्य आहे. पण सबळ पुरावा नाहीं. शके १५७० मध्यें विजापूर प्रांतींचें शिवाजी महाराजांचें राजकारण रंगांत आलें होतें. शिवाजीला नरम आणण्यासाठीं विजापूरकरांनीं शहाजीराजांना कैदेंत टाकलें होतें. ह्या वेळेस शिवाजी महाराजांची वृत्ति क्षणभर गोंधळल्यासारखी झाली होती. त्यांनीं समर्थांची भेट घेण्याचें ठरविलें. याच वेळेस—

‘ तुमचे देशीं वास्तव्य केलें। परंतु वर्तमान नाहीं घेतलें।
ऋणानुबंधें विस्मरण जालें। या काय नेणुं॥
उदंड राजकारण तटलें। तेथें चित्त विभागलें।
प्रसंग नसतां लिहिलें। क्षमा केली पाहिजे॥ ’

असें समर्थांचें ओवीबद्ध पत्र शिवाजी महाराजांच्या हातीं पडलें. तात्रडतोब शिवाजी महाराजांनीं सिंगणवाडीच्या बागेंत शके १५७१ च्या वैशाख शु. ९ गुरुवार रोजीं समर्थांचें दर्शन व अनुग्रह घेतला. शिवसमर्थांच्या भेटीसंबंधींच्या ह्या काळाविषयीं मतैक्य नाहीं. राजवाडे देव यांच्या मतें वरील काळ बरोबर आहे, तर डॉ. बाळकृष्ण, सरकार वगैरेंच्या मतें शिवसमर्थ–भेट ह्या वेळेस झाली नसून ती पुढें शके १५९४ मध्यें झाली असें आहे. एकाच विचारानें भारलेल्या, एकाच प्रान्तांतील ह्या दोन महान् विभूतींची भेट इतक्या उशीरां झाली असावी असें मानणें बरोबर वाटत नाहीं. शिवाजी महाराजांनीं आपला राज्यकारभाराचा व्यवसाय स्वतंत्रपणें केला. त्याला समर्थांच्या अधिष्ठानाची जरूरी नव्हती असें सिद्ध करण्याच्या हव्यासानें हा वाद निर्माण झाला आहे. पण समर्थांचा अनुग्रह शिवछत्रपतींनीं घेतला होता, ह्या म्हणण्यांत छत्रपतींना कोणताहि कमीपणा येत नाहीं. शिवाजी महाराजांचें राजकारण समर्थ पहात होते. ते त्यांत समरस झाले होते हें आपणांस समर्थांच्या ‘ रामवरदायिनी ’ व ‘ आनंदवनभुवन ’ ह्या प्रकरणांवरून लक्षांत येतें. ह्यानंतर समर्थांनीं

शिवाजी महाराजांच्या राजकारणाचा सतत पाटपुरावा केला. शके १५८३ मध्यें महाराजांनीं समर्थहस्तें प्रतापगडावर तुळजा भवानीची स्थापना केली. शके १६०० मध्यें 'चाफळीं श्रीची पूजा मोहोछाव ब्राह्मणभोजन अतिथि इमारत सर्व यथासांग घडावें' म्हणून शिवाजी महाराजांनीं समर्थांना सनद करून दिली. शके १५७१ च्या आषाढांत समर्थ पंढरीस गेले असतां समर्थ व संतश्रेष्ठ तुकाराम यांची भेट झाली. ह्या वेळेस समर्थांनीं रचलेलें 'येथें कां हो उभा रामा । मनमोहन मेघश्यामा।' हें पद प्रसिद्ध आहे. शिवथरच्या घळींत सुंदर मठाची स्थापना करून तेथें एकांतवासांत ग्रंथ-रचना करण्यांत कांहीं काळ समर्थांनीं घालविला. त्या-नंतर ते परळीला सज्जनगडावर आले. सज्जनगडावर असतांना शके १५७७ मध्यें शिवाजी महाराजांनीं उदासवृत्तीनें स्वराज्याची भिक्षा समर्थांच्या झोळींत टाकली. या प्रसंगीं 'सावधान प्रकरण' रचून शिवाजी महाराजांस कर्मयोगाचा उपदेश केला. शके १५७७ त समर्थांनीं शहाजीराजांची तंजावरास भेट घेतली. नंतर शके १५८१ मध्यें अफझलखानाचा कांटा शिवाजी महाराजांनीं मोठ्या युक्तीनें दूर केला. या प्रसंगाचा उल्लेख 'समर्थें आकारपूर्वक यवनासी मारविलें' । असा गिरिधर स्वामींनीं केला आहे. शिवाय समर्थांचें 'खान वाईस निघाला आहे' अशा आशयांचें सांकेतिक पत्र उपलब्ध आहेच. अशा रीतीनें महाराष्ट्राच्या स्वरा-ज्याच्या उद्योगांत शिवसमर्थ ह्या विभूती एकदिल झाल्या होत्या असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं. शके १६०२ च्या चैत्र शु. १५ स शिव-छत्रपतींचा काळ झाला. समर्थांना महाराष्ट्राचा प्राणच गेला असें वाटलें. संभाजी महाराजांनीं 'रायगडीं राज्याभिषेकास यावें' असें समर्थांस बोला-वणें धाडलें. पण उदास झालेल्या समर्थांनीं 'आपण येत नाहीं' असें कळवून कांहीं उपदेश केला. तो उपलब्ध आहे. संभाजीच्या बोलावण्या-पेक्षां स्वर्गस्थ शिवाजी महाराजांचें बोलावणें त्यांना अगत्याचें वाटलें असावें. अखेर 'माझी काया गेली खरें। परि मी आहे जगदाकारें।

असें शिष्यांना सांगून शके १६०३ माघ कृ. ९ स समर्थांनीं सज्जनगडीं देह ठेवला.

समर्थ बुद्धिवादी, विवेकशील ग्रंथकार होते. प्राचीन संस्कृत, प्राकृत ग्रंथांचें अध्ययन करून त्यांनीं आपल्या विचाराची बैठक तयार केली होती. मुकुंदराज, ज्ञानेश्वर, एकनाथ, दासोपंत वगैरे मराठी ग्रंथकारांच्या ग्रंथांचें त्यांनीं चांगलें अध्ययन केलें होतें. मुकुंदराजांचा 'विवेकसिंधु' दासोपंतांचा 'ग्रंथराज', त्र्यंबकरायांचा 'बालबोध' ह्या ग्रंथांशीं समर्थांच्या ग्रंथांचें बरेंच साम्य वाटतें. एकनाथांचें प्रपंचविज्ञान समर्थांनीं बरेच अट्टाहासानें सांगितलेलें दिसतें.

समर्थांचें वाङ्मय म्हणजे एक प्रकारचें त्यांचें आत्मचरित्रच आहे. ह्या ग्रंथनिर्मितींत कालनिर्देश कोठें नाहीं. 'करुणाष्टकें', 'अध्यात्मिक प्रकरणें', ' 'रामायण', 'दासबोध' व मधून मधून स्फुट प्रकरणें अशी एकंदर रामदासांच्या वाङ्मयमंदिराची रचना आहे.

करुणाष्टकांत समर्थांचें खरें हृदय आपणांस पाहावयास मिळतें. नाशिकच्या पुरश्चरणकाळांत हीं करुणाष्टकें रचिलीं असावींत. 'सावधान' ह्या शब्दानें सावध होऊन घर सोडलें खरें, पण वैरी मन संसारांतून पूर्ण बाहेर पडेना. अशा विकल मनस्थितींत भावनांचें जे उमाळे समर्थांच्या अंतःकरणांत दाटून आले त्यांचाच उद्रेक ह्या करुणाष्टकांत झाला. परमेश्वराकरितां समर्थांनीं केलेला आक्रोश ह्यांत सामावलेला आहे. ह्यांची रचना शके १५४७ ते ५२ पर्यंत झाली असावी. 'अचपळ मन माझें नावरे आवरीतां,' 'उदासीन हा काळ जातो गमेना। सदा सर्वदा थोर चिंता शमेना'। 'उठे मानसीं सर्व सोडूनि जावें। रघूनायका काय कैसें करावें ॥' अशा कांहीं ओळींवरून समर्थांच्या चित्ताची आर्तता आपल्या ध्यानीं येते.

ह्या करुणाष्टकांखेरीज अनुष्टुप्, व ओवी ह्या वृत्तांत सोळा अध्यात्मपर लघुकाव्यें समर्थांनीं रचिलीं आहेत. (१) षड्रिपु, (२) पंचीकरणयोग, (३) चतुर्थमान, (४) मानपंचक आणि (५) पंचमान ह्या अनुष्टुप्

छंदांतील काव्यांची ग्रंथसंख्या ५५५ आहे. ( १ ) पूर्वारंभ, (२) जुनाट पुरुष, ( ३ ) अंतर्भाव, (४) आत्माराम, (५ ) पंचसमासी,( ६ ) सप्त-समासी,( ७ ) सगुणध्यान, ( ८ ) निर्गुणध्यान, ( ९ ) मानसपूजा, (१०) एकवीस समासी ( ११ ) जनस्वभाव—गोसावी अशीं अकरा प्रकरणें ओवी-बद्ध असून त्यांची ओवीसंख्या २५६४ आहे. ह्या सर्वांचा विषय अध्यात्म हाच असून तो अत्यंत रसाळ रीतीनें समर्थांनीं सांगितला आहे.

‘ अनंता अंत नाहींरे । अलक्षा लक्षितां न ये ।
अपारा पार नाहीं रे । मायातीत निरंजनु ॥ ’

असा आपला अध्यात्माचा अनुभव समर्थांनीं सांगितला आहे. मानस-पूजा ह्या प्रकरणांतील—

‘ शिखरिणी वरपती सरारां । कढी वरपती फरारां ।
ढेंकर देती डरारां । सावकास ॥ ’

असें जेवणावळीचें वर्णन मोठें मजेदार आहे.

‘ जनस्वभाव ’ ह्या प्रकरणांत ‘ फाल्गुन मासींचा खेळ । जैसा अवघाचि बाष्कळ ॥ ’ असे दांभिकपणावर त्यांनीं कोरडे ओढले आहेत. ‘ एकवीस समासी’हें प्रकरण जुना दासबोध ह्या नांवानें ओळखलें जातें. ह्या प्रकरणांत

‘ अरे जयासी परमार्थ व्हावा । तेणें प्रपंच हा त्यजावा ।
प्रपंचीं परमार्थ करावा । हें तो ठाकेना सर्वथा ॥ ’

असें रामदासांनीं निक्षून सांगितलें आहे.

रामदासांनीं रामायणविषयक दोन काव्यग्रंथ लिहिले आहेत. एका रामा-यणांत फक्त युद्धकांडच वर्णिलें असून तें लहान आहे. दुसऱ्यांत युद्धकांड आणि सुंदरकांड अशीं दोन प्रकरणें आहेत. ह्यांत एकूण १४६२ श्लोक आहेत. नाथांच्या भावार्थरामायणांतील बराचसा ‘ भाव ’ ह्या रामायणांत व्यक्त झालेला दिसतो. ह्या रामायणकथेच्या मिषानें समर्थांनीं कांहीं राज-कारणाची शिकवण दिलेली आहे. अशी शिकवण हा जरी समर्थरामायणाचा

एक मुख्य भाग असला तरी त्यांतील काव्यात्मकतेकडे समर्थांनीं दुर्लक्ष केलेलें नाहीं. वीर आणि करुण रसाचा उत्तम परिपोष ह्यांत साधला आहे.

पूर्व-वयांत दासांना अभंग लिहिण्याचा नाद लागला होता. तेव्हां त्यांनीं 'चौदा ओवी शतें' रचिलीं. हे अभंग आहेत. समर्थ मात्र त्यांना ओवी-शतें म्हणतात. संसार असार आहे, तेव्हां त्यांत गुरफटून न राहतां रामचरणीं लीन व्हावें असाच साधारणपणें ह्या ओवी-शतांचा विषय आहे.

समर्थांची काव्यरचना अव्याहत चाललेली होती. ठळक असे मोठे ग्रंथ जरी त्यांनीं विशिष्ट काळांत रचिले असले तरी उदंड अशी स्फुट कविता त्यांनीं वेळोवेळीं लिहिली आहे. ह्यांतील कांहीं कविता अगदीं प्रासंगिक आहेत. मारुतीचा धांवा करितांना ते म्हणतात—

'कठिण हृदय जालें काय कारुण्य गेलें ।
न पवसि मज कां रे म्या तुझें काय केलें ॥'

समर्थांची रामभक्ति देखील खालील ओळींवरून स्पष्ट दिसून येते.

'रामेविण देश तो जाण विदेश। विदेशाचा देश राम करी।'
'राघवाचीं पदें मानसीं धरीन। विश्व उद्धरीन हेळामात्रें।'
हेळामात्रें मुक्त करीन या जना। तरीच पावना राघवाचा॥'

खालील ओळींमधील प्रयत्नवादाची शिकवण अमर आहे—

'वन्ही तो चेतवावा रे। चेतवीतांचि चेततो।'
'केल्यानें होत आहे रे। आधीं केलेंचि पाहिजे॥'
येत्न तो देव जाणावा। अंतरीं धरिता बरें॥'

'लोक हे राखतां राजी। सर्व राजीच होतसे।
अंतरें चुकतां तेथें। सर्व भाजीच होतसे॥'

'प्रसंग हा तडातडी। करा विवेक तांतडी।
सुचीत व्हा घडीघडी। प्रबोध घ्या खडाखडी॥'

समर्थांची ही खडखडीत वाणी राष्ट्राच्या जिव्हारीं जाऊन पोहोंचली.

समर्थांचे मनाचे श्लोक कोणास माहीत नाहींत; भुजंगप्रयातवृत्तांतील हे २०५ श्लोक म्हणजे मराठी गीताच आहे. ह्या श्लोकांची भाषा विचारांना आणि विचार भाषेला पोषक झाल्यामुळें हे श्लोक आज तीनशें वर्षें महाराष्ट्रानें हृदयाशीं धरले आहेत—

‘ मरे एक त्याचा दुजा शोक वाहे । अकस्मात तोही पुढें जात आहे ।’
‘ जगीं सर्व सूखी असा कोण आहे । विचारी मना तूंचि शोधूनि पाहें ।’

असा एक एक सवाल म्हणजे प्रचितीचा खडा बोल आहे. श्लोकांप्रमाणें समर्थांनीं पद्यरचनाहि बरीच केली. त्यांचीं हजार एक पदें उपलब्ध आहेत.

‘ रामवरदायिनी ’, ‘ आनंदवनभुवन ’ व ‘ अस्मानी सुलतानी ’ हीं ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचीं अशीं रामदासांचीं दोन स्वतंत्र प्रकरणें आहेत. ‘ रामवरदायिनी ’ हें प्रकरण तुळजापूरच्या भवानीला उद्देशून आहे. या स्तोत्रांत इतिहासाप्रमाणेंच समर्थांचें चरित्रहि गुंफलेलें आहे. महाराष्ट्र देशांत स्वराज्यसंस्थापना झाली आहे असें एक गोड स्वप्न समर्थांनीं ‘ आनंदवनभुवन काव्यां’त रेखाटलें आहे.

‘ बुडाला औरंग्या पापीं । म्लेंछसंव्हार जाहला ।
मोडलीं मांडलीं छेत्रें । आनंदवनभुवनीं ।। ’

अशा उल्लेखावरून समर्थांची स्वराज्यस्थापनेची तळमळ आणि शिवपराक्रमावरील विश्वास स्पष्ट दिसून येतो. इतरहि कांहीं प्रकरणें शिवछत्रपतीस उद्देशून लिहिलेलीं आहेत. दासबोधांतील दोन समास असेच आहेत.

‘ तीर्थक्षेत्रें मोडिलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं ।
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ।। ’

असा संदेश त्यांनीं शिवरायास दिला असून त्यांच्या कार्याबद्दल

‘ देवधर्म गोब्राह्मण । करावया संरक्षण ।
हृदयस्थ जाला नारायण । प्रेरणा केली ।। ’

असें समाधान व्यक्त केलें आहे. समर्थांच्या सर्वच काव्यसंसारांत त्यांचें आत्मचरित्र भरून राहिलें आहे.

समर्थांचा दासबोध म्हणजे दास–संप्रदायाचा ग्रंथराज समजला जातो.

एकवीस समासी, सात दशकी दासबोध आणि वीस दशकी दासबोध ह्या तीन टप्प्यांनीं दासबोधाची रचना झालेली दिसते. म्हणजे शके १५५४ पासून दासबोधाची रचना सुरू झाली होती असें म्हणावें लागतें. संपूर्ण दासबोध शके १६०३ च्या मार्गशीर्षांत समर्थांनीं आपल्या शिष्यसंप्रदायाच्या हवालीं केला. ह्यानंतर दोनच महिन्यांनीं समर्थांचें देहावसान झालें. ह्या ग्रंथाची ओवीसंख्या ७७५१ आहे. विषय प्रामुख्यानें अध्यात्मच आहे. सात दशकापर्यंत तर प्रपंचविज्ञानाचा मागमूसहि नाहीं. त्यानंतर तीर्थयात्रेनें राष्ट्राचें जें स्वरूप समर्थांनीं दाखविलें त्याचा परिणाम समर्थांच्या मनावर झाल्यामुळें त्यांनीं राजकारण, व्यवहारकारण यांचा प्रपंच पुढील भागांत केला. ग्रंथाच्या स्वरूपाबद्दल समर्थ स्पष्टच सांगतात—

‘ नवविधा भक्ति आणि ज्ञान । बोलिलें वैराग्याचें लक्षण ।
बहुधा अध्यात्म निरोपण । निरोपिलें ॥ ’

ह्या ग्रंथराजाचें निवेदन फार बहारीचें आहे. पूर्वार्धांत एकविधता असून सूत्रबद्धता आहे. उत्तरार्धांत मात्र अनेक विषयांचें निरूपण झाल्यामुळें सुसूत्रता राहिलेली नाहीं.

समर्थांनीं भागवतांचें अध्यात्म मुख्यतः सांगितलें आहे. त्यांना मुख्यतः परमार्थाचेंच निरूपण करावयाचें होतें. पण देशकालपरिस्थितीच्या निरीक्षणानें प्रपंचाचें हीन स्वरूप त्यांच्या ध्यानीं आलें. राष्ट्राच्या प्रपंचाचें हें दुबळें स्वरूप परमार्थाला तरी कसें पोषक ठरणार ? असा प्रश्न त्यांच्या पुढें उभा राहिला. म्हणून परमार्थाचें विशुद्ध स्वरूप लोकांना सांगावें व त्याला बळकट प्रपंचाची जोड द्यावी अशा हेतूनेंच समर्थांनीं आपलें तत्त्वज्ञान सांगितलें. नाहींतरी नाथांसारख्या भागवतांनीं दुसरें काय सांगितलें ? खरा देव तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणीं नसून आत्मा हाच देव आहे अशी त्यांनीं शिकवण दिली. त्यांचें तत्त्वज्ञान रेखीव व सुसंगत आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानांत परमार्थ व प्रपंच ह्याविषयीं कांहींना विसंगति वाटते. पण तशी विसंगति त्यांच्या तत्त्वज्ञानांत नाहीं. प्रयत्नवाद हें साधन व मायावाद हें साध्य या भूमिकेवरून रामदास बोलत आहेत हें लक्षांत घेतलें म्हणजे त्यांचें तत्त्वज्ञान लक्षांत येतें.

• • •

# वामनपंडित



जुन्या पंतकवींच्या यमकप्रियतेचा उल्लेख करावयाचा झाल्यास वामनपंडितांचें नांव प्रथम घ्यावें लागेल. 'यमक्या वामन' म्हणून समर्थांनीं केलेला उल्लेख प्रसिद्धच आहे. यमकाप्रमाणेंच मराठींतील श्लोकरचनेचाहि वामनपंडितांशीं बराच घनिष्ठ संबंध आहे, हें 'सुश्लोक वामनाचा' ह्या प्रसिद्ध उक्तींत सुप्रसिद्धच आहे. संस्कृत वृत्तांच्या वळणांतून मराठी कविता जी नव्यानें वाहूं लागली त्याचें श्रेय प्रामुख्यानें वामनपंडितांसच द्यावयास हवें.

वामनपंडितांचा काल निश्चितपणें समजण्यास कांहीं साधन नाहीं. एवढेंच काय पण वामनपंडित एक कां दोन असाहि वाद पुष्कळ वेळां पुढें मांडण्यांत येत असतो. वामनपंडिताबद्दलच्या निरनिराळया उल्लेखांची बेरीज करून कांहीं टीकाकारांनीं तर पांच वामनपंडित निर्माण केले आहेत.मूळ वामनपंडितांच्या काव्यांत सामराज वामन,रामदासी वामन अशा इतर कांहीं वामनांची व वामनशिष्यांची कविता हुबेहूब मिसळली गेल्यामुळें शांडिल्यगोत्री वामन,वासिष्ठगोत्री वामन, यमक्या वामन,अध्यात्मवादी वामन व शृंगारप्रिय वामन असे पांच वामन प्रसिद्ध टीकाकार कै. भिडे यांनीं निर्माण केले होते. काव्याची अंतर्गत रचना म्हणजे भाषाशैली, वर्णनशैली, वगैरे गोष्टी पाहतां यथार्थदीपिकाकार अध्यात्मवादी वामन व शृंगाररसाची मेजवानी देणारा वामन हे दोन नाहींत असा निर्वाळा महाराष्ट्र सारस्वतकार कै. वि. ल. भावे यांनींहि दिला आहे आणि 'प्राचीन मराठी कविपंचक' लिहिणाऱ्या प्रा.पंगूंनाहि तें मत मान्य आहे. यथार्थदीपिका, गीतासमश्लोकी, राधाविलास, भामाविलास, वनसुधा, योगवासिष्ठ, निगमसार वगैरे प्रसिद्ध काव्यरचना ज्या वामनपंडिताच्या नांवावर आहे तो वामनपंडित एकच होय.

वामनपंडितांच्या चरित्राबद्दल उपलब्ध माहिती फार कमी असल्यामुळें त्यांच्याबद्दल बरेच विपर्यस्त ग्रह निर्माण झाले आहेत. जी कांहीं त्रोटक माहिती मिळते ती रामदासी चरित्रकाराकडून मिळते. हनुमंतस्वामी,

गिरिधरस्वामी वगैरे समर्थ-सांप्रदायिकांनीं यथार्थदीपिकाकार वामनपंडितांचा उल्लेख केलेला आहे. वामनपंडितांचें सज्जनगडावर कीर्तन झालें होतें असा समर्थचरित्रकारांनीं उलेख केलेला आहे. पण ह्या दाससांप्रदायिकांचा दृष्टिकोन साहजिकपणेंच वामनपंडितांना समर्थांपेक्षां वामन म्हणजे लघु ठरविण्याचा असल्यानें वामनपंडितांचें यथार्थदर्शन त्यांच्या माहितींतून होत नाहीं. वामनपंडित हे शिवकालांतील एक प्रसिद्ध अध्यात्मवादी पंडित होते, ह्याबद्दल मात्र समर्थ-चरित्रकारांचें ऐकमत्य दिसतें.

वामनपंडितांचें उपनांव शेषे असें होतें. कांहीं ठिकाणीं लक्ष्मी-नृसिंह असा मातापित्यांच्या नांवांचा उल्लेख केलेला आढळतो. ते राहणार मूळचे विजापूरचे. शीघ्र बुद्धिमत्तेमुळें प्रथमपासूनच पंडितांच्या स्वभावाचा निस्पृहपणा हा एक विशेष होऊन बसला होता. त्यालाच पुढें विद्वत्तेचें संस्करण झाल्यानें त्या निस्पृहतेचें तापटपणांत रूपांतर झालें असावें. आणि हा तापटपणा ज्यांना पाहवला नाहीं त्यांनीं वामनपंडितांना गर्विष्ठ ठरविलें. विजापूरच्या बादशहानें वामनपंडितांना वर्षासन देऊं केलें असतां तें नाकारून व भिक्षावृत्ति स्वीकारून वामनपंडित सपत्नीक काशीस गेले.संपूर्ण अध्ययन झाल्यानंतर ते परत करवीरास आले. आपल्या विद्वत्तेच्या जोरावर त्यांनीं अनेकांना वादांत हरविलें. वामनपंडित उंटावर जाडे जाडे ग्रंथ लादून व दिवसा मशाल लावून विद्वानांच्या शोधार्थ हिंडत असत अशी एक आख्यायिका प्रसिद्ध आहे. करवीर, कोरेगांव ह्या ठिकाणीं रहात असतांना वामनपंडितांनीं भागवताचें अध्ययन केलें. त्यांच्या मनावर भागवतपंथाचा बराच परिणाम झाला. ह्याच सुमारास ते कीर्तन करूं लागले असावेत व तुकाराम, रामदास यांच्या भेटीचा योग ह्याच वेळेस आला असावा. भगवंताच्या सेवेचा एक मार्ग म्हणूनच त्यांनीं ' भामा-विलास, ' ' राधाविलास, ' ' वनसुधा, ' 'राधाभुजंग' वगैरे कृष्णचरित्रपर काव्यरचना ह्या सुमारास केली असावी. त्यांची ही कविता पंडिती कवितेकडे किंवा कलाकवितेकडे जरी झुकत असली तरी वामनपंडित

संपूर्णपणें कलाकवि ठरत नाहींत. त्यांनीं कविता आत्मोद्धारासाठींच लिहिली. ते पंतांच्यापेक्षां संतांनाच अधिक जवळ आहेत. ते अध्यात्मवादी पंडित होते. म्हणून त्यांचे 'यथार्थदीपिका', 'गीतासमश्लोकी', 'निगमसार' हे ग्रंथ अधिक प्रसिद्ध आहेत. त्यांच्या पुढें ज्ञानेश्वर, दासोपंत यांनीं लिहिलेल्या गीतेवरील टीका होत्या. तरी पण आपणांस गीतेचा जो अर्थ प्रतीत झाला आहे तो त्यांत नाहीं असें वाटल्यावरून पंडितांनीं यथार्थदीपिका रचिली आहे. अगोदरच्या टीकाकारांनीं विशिष्ट दृष्टिकोनानें गीतेकडे पाहिल्यामुळें त्यांच्या टीकेंत गीतेचा अर्थ यथार्थ रीतीनें व्यक्त झालेला नाहीं असें वामनपंडितांचें म्हणणें होतें. पंडितांच्या चरित्रांतील महत्त्वाचा प्रसंग म्हणजे गुरूपदेशाचा प्रसंग होय. मलयाचल पर्वतावर सच्चिदानंद यतींनीं त्यांना गुरुमंत्र दिला. हे यति म्हणजे तत्कालीन शृंगेरीचे शंकराचार्य होत. कित्येक भाविकांच्या मतें प्रत्यक्ष भगवंतांनीं येऊन पंडितांना मुक्तिमार्ग उपदेशिला असें मानलें जातें. ह्या गुरूपदेश–प्रसंगाचें वर्णन वामनपंडितांनीं आपल्या 'निगमसार' ह्या ग्रंथांत केलें आहे.

वामनपंडितांच्या जन्मकालाबद्दल एकवाक्यता नसली तरी शके १५२५-३०च्या दरम्यान त्यांचा जन्म झाला असें बहुतेकांकडून मानण्यांत येतें. निगमसार ह्या ग्रंथांत त्या ग्रंथाची रचना–काल शके १५९५ हा दिला आहे. त्यांतील वर्णनावरून वामनपंडित गुरूपदेशाच्या सुमारास ७० वर्षांचे असावेत असा अंदाज बांधण्यांत येतो. ह्यावरूनहि वामनपंडितांचा जन्मशक १५२५ च्या सुमारास झाला असावा ह्या मताला पुष्टि मिळते. त्यांचा निर्याणकाल शक १६१७ हा सर्वमान्य आहे. त्यांच्या मृत्यूनंतर दोनतीन वर्षांतच त्यांच्या पुण्यतिथीचा उत्सव चालविण्यासाठीं रामचंद्रपंत अमात्य व छत्रपति राजाराम यांनीं वामनशिष्य विश्वात्मक गोसावी यास एक चावर जमीन इनाम दिली होती. यावरून त्यांचें श्रेष्ठत्व तत्कालीन लोकांस पटलें होतें हें सिद्ध होतें.

वामनपंडितांची ग्रंथरचना अफाट आहे. 'यथार्थदीपिका', 'योगवासिष्ठ', 'निगमसार', 'गीतासमश्लोकी', 'हरिनामसुधा', 'श्रुतिसार',

' चित्सुधा ', ' चरमगुरुमंजरी, ' ' सीतास्वयंवर, ' ' भरतभाव, ' ' अहित्योद्धार, ' ' लोपामुद्रासंवाद, ' ' भामाविलास', ' शुकरंभासंवाद ', 'राधाविलास, ' ' राधाभुजंग, ' ' कृष्णजन्म, ' ' भागवतीरामायण ', ' बालक्रीडा ' वगैरे त्यांचीं सरस प्रकरणें सुप्रसिद्ध आहेत. भर्तृहरीच्या शतकत्रयाचीं आणि जगन्नाथाच्या गंगालहरीचीं त्यांनीं केलेलीं भाषांतरें मराठींतील उत्कृष्ट काव्यांत मोडतात. ' समश्लोकीगीते'च्या रचनेंतील पंडितांच्या कौशल्याची मोरोपंतांनीं सुद्धां स्तुति केली आहे. 'रीति समश्लोकीची अतुला साधेल काय नव्यास' असें पंत म्हणतात. त्यांच्या काव्यांत पंडितांचें भाषाप्रभुत्व ठळकपणें दिसून येतें. पंडितांच्या काव्यांत संस्कृतभक्ति, यमकप्रीति, शब्दचमत्कृतीची आवड असे कांहीं ठळक दोष आढळतात. सवाई, घनाक्षरी हीं वृत्तें मराठींत प्रथम आणण्याचा मान पंडितांचा आहे. वामनपंडितांच्या काव्यावर श्रीहर्ष, माघ ह्यांच्या काव्याचा परिणाम झाला असावा. म्हणूनच त्यांच्या काव्यांत गौडीरीतीचा प्रादुर्भाव जास्त झाला आहे. परंतु त्यांच्या काव्यरचनेचें स्वरूप अनुवादात्मक अथवा टीकात्मक असल्यामुळें साहजिक प्राकृतापेक्षां संस्कृतप्रचुर मराठी भाषा त्यांनीं योजणेंच अधिक साहजिक आहे. पंडितांच्या क्लिष्टतेबद्दल कुणीहि किती रुष्ट झाले तरी ' वनीं खेळती बाळ ते बल्लवांचे । तुरे खोविती मस्तकीं पल्लवांचे ।। ' ' गडबडा धरणीवरि लोळते । वदवती न कवीसहि लोळ'तें । ' वानोत निंदोत सुनीतिमंत । चळो असो वा कमला गृहांत । ' अशा कांहीं ओळी जिभेवर नाचूं लागल्या म्हणजे पंडितांच्या काव्याची श्रेष्ठता आपल्या ध्यानीं येते. शिवकालांतील रामदास, सामराज, नागेश, विठ्ठल व रघुनाथपंडित इत्यादि कवींहून वामनपंडित ज्येष्ठ होते. रामदास व वामनपंडित हे शिवकालीन वाङ्मयसागरांतील दोन प्रचंड दीपस्तंभ असून त्यांच्या प्रकाशानें पुढील अनेक पिढ्यांना निश्चित व दूरवर मार्गदर्शन केलें आहे. पंडितापासूनच आख्यानक कवितेस सुरवात झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

• • •

## रघुनाथपंडित



अल्पकाव्य निर्मितीनें महाराष्ट्र प्राचीन कविमंडळांत मानाचें स्थान जर कुणीं मिळविलें असेल तर 'नलदमयंतीस्वयंवराख्यान' कर्त्या रघुनाथपंडितानें.

ह्या श्रेष्ठ कवीच्या चारित्र्याविषयीं मात्र महाराष्ट्र–वाङ्मयाच्या इतिहासांत कांहीं निश्चित धागादोरा सांपडत नाहीं. एक ना दोन सात रघुनाथपंडितांचे निर्देश निरनिराळया संशोधकांनीं केले आहेत. नलदमयंतीस्वयंवराख्यान ह्या काव्यांतील शेवटच्या श्लोकांतील 'चंदावरकर' ह्या उल्लेखावरून रघुनाथपंडित हा चंदावरचा सारस्वतपंडित होय असा दावा रा. वालावलीकर ह्यांनीं मांडला आहे. तर अशाच कांहीं उल्लेखांचा आधार घेऊन रा. प्रियोळकर ह्यांनीं रघुनाथपंडित हा सारस्वत नसून शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधानमंडळांतील पंडितराव नांवाचा प्रधान जो देशस्थ रघुनाथपंडित तो हाच अशी आपली बाजू मांडली आहे. फारशी, अरबी वगैरे शब्दांवरून रघुनाथपंडित हा राजकारणांत वावरलेला असला पाहिजे. त्याच्या प्रासादिक रचनेवरून व सौष्ठवपूर्ण भाषाशैलीवरून रघुनाथपंडित व्युत्पन्नपंडित होता असें दिसतें. 'चंदावरकर' हा उल्लेखहि नाकारतां येत नाहीं. चंदावर हें गांव तंजावर प्रांतांतील; तेव्हां रघुनाथपंडित हा तंजावरकडचा राहणारा असला पाहिजे असेंहि मानावें लागतें. ह्या सर्व साधनांचा साकल्यानें विचार करून प्रा. पंगू ह्यांनीं 'नलदमयंतीस्वयंवराख्याना' चा कर्ता रघुनाथपंडित हा अष्टप्रधानांपैकीं नाहीं, किंवा चंदावरकर सारस्वत रघुनाथ भटहि नाहीं, तर तंजावर प्रांतींचा प्रथम व्यंकोजीकडे असलेला आणि नंतर शिवाजी महाराजांकडे आलेला प्रसिद्ध मुत्सद्दी रघुनाथ नारायण हणमंते होय असें सप्रमाण सिद्ध केलें आहे आणि तें खरें मानावें लागतें.

रघुनाथपंडित म्हणजे रघुनाथ नारायण हणमंते होत. त्यांचें वास्तव्य

तंजावरप्रांतीं शहाजीराजे व व्यंकोजीराजे ह्यांच्या पदरीं मुत्सद्दी म्हणून बरेच दिवस होते. त्यांचे वडील नारायण त्रिमल हणमंते हे प्रथम शहाजी-राजांबरोबर कर्नाटकप्रांतीं इ. स. १६३७ मध्यें गेले. ते बंगलूर येथें रहात असत. ते १६५३ मध्यें वारल्यावर रघुनाथपंडितांची बुद्धिमत्ता, शहाणपण व स्वामिभक्ति पाहून शहाजीराजांनीं त्यांना आपल्या कर्नाटकांतील जहा-गिरीचे दिवाण नेमलें. ही कामगिरी पंडितांनीं शेवटपर्यंत म्हणजे इ स. १६८२ पर्यंत उत्कृष्ट रीतीनें बजावली. कर्नाटकाकडील शिवाजीमहारा-जांच्या राजकारणांत उच्च प्रतीची मुत्सद्दीगिरी रघुनाथ नारायण ह्यांनीं दाखविली. मराठ्यांची सत्ता कर्नाटकांत स्थापण्यासाठीं रघुनाथ नारायण हणमंते ह्यांनीं शिवाजी महाराज ह्यांस अमोल सहाय्य केलें. व्यंकोजी राजे ह्यांनीं स्वराज्यसंस्थापनेच्या बाबतींत शिवाजी महाराजांस सहाय्य करावें अशी रघुनाथ नारायण ह्यांची इच्छा होती. त्यांनीं त्या दिशेनें प्रयत्नहि केले. परंतु शिवाजी महाराजांचें धडाडीचें राजकारण व्यंकोजी राजे ह्यांच्या मनीं उतरलें नाहीं. तेव्हां गोवळकोंड्याच्या स्वारीवर आलेल्या शिवाजी महाराजांना भेटून रघुनाथ नारायण ह्यांनीं त्यांना कर्नाटकावर स्वारी कर-ण्याचा सल्ला दिला. त्या सल्ल्याबरहुकूम शिवाजी महाराजांनीं कर्नाटका-वर स्वारी करून चंदीचंदावर, अरणी वगैरे प्रांत काबीज केला. ह्या नव्या जिंकलेल्या प्रांतावर महाराजांनीं आपल्या वतीचे मुख्य अधिकारी म्हणून रघुनाथ हणमंत्यांचीच नेमणूक केली. इ. स. १६७५–७६ च्या सुमारास रघुनाथ नारायण हणमंते शिवाजी महाराजांच्याकडे आले व त्यांनीं शिवाजी महाराजांच्या सांगण्यावरून त्यांनीं राजव्यवहारकोश रचिला. इ. स. १६७७ ते १६८१ पर्यंत रघुनाथपंडितांनीं कर्नाटकाकडील व्यवस्था अतिशय चोख ठेवली होती. इ. स. १६८० मध्यें शिवछत्रपति महा-राष्ट्रास सोडून गेल्यावर पंडितांना फार वाईट वाटलें. तरी पण महाराष्ट्रां-तील बेबंदशाही त्यांनीं कर्नाटकांत येऊं दिली नाहीं. संभाजी महाराजांच्या बेबंदराजवटीबद्दल पंडितांनीं त्यांची चांगलीच कानउघाडणी केली. परंतु

संभाजीराजांनीं त्यांच्यावर: न रागावतां त्यांच्या म्हणण्याप्रमाणें जुन्या प्रधानांना बंधमुक्त करण्याचें अभिवचन पंडितांना दिलें. जुन्या प्रधानावर संभाजीराजांनीं जे अत्याचार केले त्या प्रसंगालाच उद्देशून कदाचित् पंडितांचें कवि–मन म्हणालें असेल–' कठिण समय येतां कोण कामास येतो ? ' हाच प्रसंग स्वत: पंडितांवर व त्यांच्या बंधूवर आला तेव्हां हेंच मन म्हणालें—

' मजहि वध कराया पातकी पातला जो ।
वरुनि पति असा ही भूमिं कैसी न लाजो ॥ '

रघुनाथपंडित हे दाससंप्रदायी होते. त्यांचें ' रामदासवर्णन ' हें काव्य प्रसिद्ध आहे. रघुनाथपंडितांची काव्यनिर्मिति अल्प आहे. ' रामदासवर्णन ', ' गजेंद्रमोक्ष ' व ' नलदमयंतीस्वयंवराख्यान ' ही त्यांची काव्यत्रयी प्रसिद्ध आहे. ह्यांतील ' नलदमयंतीस्वयंवराख्यान ' ह्या नितान्त मधुर काव्यानें पंडितांना कविश्रेष्ठ ही मानाची पदवी दिली आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. पंडितांचा स्वभाव अत्यंत विनयी, अनुनयशील, सहानुभूतिपूर्ण व निःस्वार्थी होता. सामराज, रघुनाथपंडित व नागेश हे समकालीन होत. रघुनाथपंडित सामराजाप्रमाणेंच रसिक,राजदरबारपरिचित, बहुश्रुत व सूक्ष्मदर्शी होते, ह्याची त्यांचें काव्य पदोपदीं साक्ष देतें. दोघांनींहि संस्कृत पंचकाव्यापासून ऋण घेतलें आहे. रघुनाथपंडितांच्या इ. स. १६५३ ते इ. स. १६८१ पर्यंतच्या जीवनावर इतिहास प्रकाश टाकतो. परंतु त्यांच्या जन्ममृत्यु ह्या गोष्टीबद्दल त्यानें मौन धरलें आहे. तरी इ. स. १६८१ हें पंडितांच्या जीवनयात्रेचें महत्त्वपूर्ण असें शेवटचें वर्ष असावें असें वाटतें. त्यापुढील आयुष्य विपन्नावस्थेंत गेलें असावें असें कांहीं उल्लेखांवरून वाटतें.

' नलदमयंतीस्वयंवराख्यान ' हें पंडितांचें सर्वश्रेष्ठ काव्य आहे. ह्या काव्याची श्लोकसंख्या २४२ आहे. काव्याचें आख्यान महाभारतांतून

घेतलेलें असून रचना विदग्ध महाकाव्यांच्या रचनेबरहुकूम केली आहे. भाषेचे बाबतींत रघुनाथपंडित अर्वाचीन वाटतात. दिंडी हें वृत्त पंडितांनीं प्रथम वापरांत आणलें. त्यांचें वृत्तावरील प्रभुत्व असामान्य आहे. पंडितांची वर्णनशैली तर उत्कृष्टच आहे. प्रासादिक भाषाशैली, सुंदर स्वभावचित्रें, काव्याचें मूळचें सौंदर्य उठावून दाखवील अशी अलंकार-योजना, मोहक वर्णनें बहुतेक कवींत दुर्मिळ असणारा संयम हा गुण, ह्यामुळें हें काव्य मराठी काव्यांत चिरंजीव पद मिळविणारें झालें आहे. रघुनाथपंडितांची शब्दयोजना जशी असावयास पाहिजे तशी आहे. संस्कृत भाषेच्या द्वारां मराठी काव्यांत लालित्य आणण्याचें श्रेय जर कुणाला देतां येण्यासारखें असलें तर तें पंडितांनाच. हें काव्य लिहितांना पंडितांच्या पुढें श्रीहर्षाचें नैषधीय-चरित असावें. पंडितांचें हें काव्य इतकें सुरस आहे कीं पंडिती वळणाचें कोणतेंहि काव्य सुरसतेच्या बाबतींत ह्या काव्याच्या आसपासहि येणार नाहीं. संस्कृत महाकाव्याच्या धर्तीवर मराठीमध्यें सुद्धां रचना उत्कृष्ट होते हें पंडितांनीं आपल्या कृतीनें सिद्ध केलें आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी कीं या प्रकारची काव्यपरंपरा पंडितांच्याच बरोबर खंडित झाली. जरी विदग्ध महाकाव्यांचा आदर्श त्यांच्यापुढें होता, तरी हर्षाचें 'नैषध' व माघाचें 'शिशुपाल–वध' ह्या काव्यांतील शब्दचमत्कृतीची हौस, बंधरचना, यमकप्रियता इत्यादि दोष पंडितांनीं आपल्या काव्यांत आणलेले नाहींत. हंसक्षीरन्यायाप्रमाणें विदग्ध महाकाव्यांतील दोष टाळून नेमके गुण तेवढे त्यांनीं उचलले आहेत. म्हणूनच त्यांचें काव्य रसिकांच्या मान्यतेस उतरलें आहे. अनुप्रासासारखे शब्दालंकार त्यांनीं साधले असले तरी ते काव्यांतील वर्ण्यविषयाचें मोहकत्व उकलून दाखवतील असेच साधले आहेत. त्यांचे अलंकार रसाशीं सुसंगत असतात, विसंगत नसतात. प्रसाद हा तर त्यांच्या काव्याचा प्राण आहे. काव्य–वाचन म्हणजे मेंदूची मेहनत हा जो पंडिती काव्याविषयींचा साधारण समज तो रघुनाथ-पंडितांच्या काव्याविषयीं चुकीचा ठरतो. हें २४२ श्लोकांचें काव्य एकदां

वाचायला घेतल्यानंतर वाचून झाल्याखेरीज खालीं ठेवूं नये असें वाटायला लावणारें हें एकमेवाद्वितीयं मराठी काव्य आहे. अनुप्रासांची योजना शब्द-सौष्ठव व नादमाधुर्य साधण्यासाठीं केलेली आहे. ह्या कथेंत शृंगार असला तरी तो उत्तान नसून करुणाला पोषक असा आहे. रघुनाथपंडितच म्हणतात—

‘ कथा बोलूं हे मधुर सुधाधारा
होय शृंगारा करुणरसा थारा ॥ ’

पंडितांचें अलंकारचातुर्य वाखाणण्यासारखें आहे. अलंकारशास्त्री अलंकारांचीं उदाहरणें शोधतांना पंडितांच्याकडे धांव घेतात. त्यांतच त्यांचा मोठेपणा समजण्यासारखा आहे. पुढील दोन तीन उदाहरणें वानगीदाखल पाहण्यासारखीं आहेत.

( १ ) अनन्वय—‘ चंद्रासि लागति कळा; उपराग येतो; ।
गंगेसि भंग बहु पाणउतार होतो ॥
जें होय चूर्ण तरि मौक्तिक तें कशाला ! ।
नाहीं समान नळराज महा यशाला ॥ ’

(२) अतिशयोक्ति—‘ कदा नेणों ओढी, शरधितुनि काढी शर कदा ।
कदा धन्वी जोडी, वरिवरिहि सोडी तरि कदा ॥
विपक्षाच्या वक्षावरि विवरलक्षास्तव रणीं ।
कळे राजेंद्राची त्वरित शरसंधानकरणी ॥ ’

( ३ ) रूपक—‘ नळराजकथा सुधाचि साजे; ।
आणि दमयंती वरवर्णिनी विराजे ॥
श्लेष मिळणी उभयांसि होय जेथें ।
अधिकारी अधिकानुराग तेथें ॥

(४) अर्थान्तरन्यास—‘ तदितर खग भेणें वेगळाले पळाले ।
उपवन जळकेली जे कराया मिळाले ॥
स्वजन गवसला जो त्याजपाशीं नसे तो ।
कठिण समय येतां कोण कामास येतो ॥ ’

(५) अनुप्रास--' पनस जंबू जंबीर विविध निंबें ।
कुंद चंदन माकंद सुदाडिंबें ॥
तुंग नारिंगें विकसलीं कदंबें ।
वसति तेथें शुक सारिका कदंबें ॥ '
' खग मग नगरींचे गोपुरीं झेंप घाली ।
मृदुपवनगवाक्षीं बैसतां झोप आली ॥ '

(६) श्लेष-' ते शीतलोपचारी जागी झाली; हळूच मग बोले ।
' औषध नलगे मजला ', परिसुनि जननी बरें म्हणुनि डोले ॥ '

अशीं किती उदाहरणें द्यावयाचीं ? पाणबुड्यानें सागराच्या तळाशीं चार पांच बुड्या मारून मोत्यें काढलीं म्हणून सागराचें सारें भांडार तो आणतो थोडेंच ! रघुनाथपंडितांची वर्णनशैली किती सुंदर आहे हें पुढील एक दोन उदाहरणांवरून लक्षांत येईल.

( १ ) उपवन वर्णन—
' लतेतळीं रुंद निरुंद कालवे; । गळोनि तेथें मकरंद कालवे ॥
परागही सांद्र तयांत रंगती । फुलांसवें भृंगतती तरंगती ॥ '
उपरि सकंटक साचे, परंतु सांचे जयांत सुरसाचे, ।
घोंस असे फणसाचे षण्मासांचे कितीक वरसांचे ॥ '
' अमृतही पयही म्हणवीतसे उभय होय तसी रुचि वीतसे ।
मधुर सारस तें जळ गा तसें; मधुर सारस यास्तव गातसे ॥ '

( २ ) हंसाचें वर्णन--
' त्यांतील एक कलहंस तटीं निजेला । जो भागला, जलविहार विशेष केला ।
पोटींच एक पद, लांबविला दुजा; तो । पक्षीं तनू लपवि; भूप तया पहातो ॥ '
' कलकल कलहंसें फार केला सुटाया । फडफड निजपक्षीं दाविलें कीं उडाया ॥
नृपतिस मणिबंधीं टोंचिता होय चंचू । धरि सुदृढ जया तो काय सोडील पंचू ॥ '

● ● ●

# निरंजनमाधव



रसाळ स्तोत्रांनीं महाराष्ट्र–काव्यसंपदेचें वैभव वाढविण्याचें कार्य करणारा निरंजनमाधव हा महाराष्ट्राचा सर्वश्रेष्ठ असा आद्य स्तोत्रकार होऊन गेला असें म्हणावयास हरकत नाहीं.

प्राचीन मराठी कवीप्रमाणें निरंजनमाधवाच्या चारित्राविषयींहि फारशी माहिती उपलब्ध नाहीं. त्याच्या 'सांप्रदाय परिमळ' ह्या ग्रंथाच्या साह्यानें व कांहीं राजकीय पत्रव्यवहाराच्या साह्यानें निरंजनमाधवाविषयीं सुसंगत माहिती देण्याचा प्रा. पंगु ह्यांनीं यशस्वी प्रयत्न केला आहे. त्यांच्या मतें निरंजनमाधवाचा जन्म इ. स. १७०२ मध्यें झाला. त्याचें मूळ नांव बनाजी असें असावें. काव्याच्या शेवटीं माधवनंदन, कविनिरंजन, निरंजनयोगी असा टोपणनांवांचा उल्लेख आढळतो. योगसांप्रदाय स्वीकारल्यानंतर निरंजन हें नांव धारण केलें. आईचें नांव भागीरथी व वडिलांचें नांव माधव. कवीच्या 'सुभद्राचंपू' ह्या काव्यांतील 'विश्वामित्र कुलारविंद तरणी ऋग्वेद सिंधूमणी' ह्या उल्लेखावरून निरंजनमाधव ऋग्वेदी विश्वामित्र गोत्री ब्राह्मण असावा असें दिसतें. जन्मस्थलाबद्दल निश्चित माहिती नाहीं. कंची प्रांतांत पक्षतीर्थासमीप रामडोह येथें कवीनें आपलें बालपण घालविलें असावें. निरंजनमाधवाचें अध्ययन साताऱ्यास लक्ष्मीधर बरवे यांजजवळ झालें व त्यांच्याचपासून मंत्रोपदेश होऊन निरंजनमाधव दत्तसंप्रदायी बनला.

मराठी कवींत, राजकारणांत ज्याचें प्रत्यक्ष अंग असे असा हा एकच कवि होय. थोरले बाजीराव व नानासाहेब ह्यांनीं निरंजनमाधवास तंजावर, श्रीरंगपट्टण ह्या ठिकाणच्या वकिलातीच्या हुद्दयाचीं कामें सांगितलीं होतीं. शिवाय निजाम, फिरंगी यांच्याकडील वकिलातीचीं कामेंहि त्यानें उत्तम प्रकारें बजाविलीं. त्याच्या काव्यांत बाजीरावबद्दल पुढील उल्लेख आढळतो—

'शाहू भूपतीचा प्रधान। बाजीराव बल्लाळ रत्न।
परम यशस्वी पावनगुण। भूपाळ मंडळ शिरोमणी॥'

निरंजनमाधव वकिलातीच्या कामावर १७४१ ते १७५८ पर्यंत होता. १७२५–२६ च्या साखरखेड्याच्या लढाईंत हा बाजीरावाबरोबर होता. श्रीरंगपट्टण येथील वसुलीच्या कामावर असतांना नासिरजंग, दमाजी गायकवाड, सलाबतजंग ह्यांच्या हालचालीची माहिती तो पुणें दरबारीं पाठवीत असे. ह्या वकिलातीच्या कामगिरीवर असतांनाच कोणीतरी निरंजनमाधवाच्या विरुद्ध नानासाहेबांचें मन कलुषित केलें. बाबूजी नाईक बारामतीकर व नागपूरकर भोसले ह्यांच्याशीं निरंजनमाधव संगनमत करतो असें तर्कट कोणीं कर्ण–पिशाचानें नानासाहेबांच्या कानीं घातलें. ह्यामुळें कांहीं काल निरंजनमाधव नानासाहेबांच्या मर्जींतून उतरला. ह्यामुळें आलेल्या विषण्णतेचा विसर व्हावा म्हणून निरंजनमाधवानें काशीपासून रामेश्वरापर्यंत तीर्थाटन केलें. ह्यामुळें त्याच्या बहुश्रुततेंत भरच पडली. पुन्हां त्याच्या विषयींचा नानासाहेबांचा गैरसमज जरी दूर झाला तरी त्या प्रमाणांत निरंजनमाधवाची विषण्णता ओसरली नाहीं.

निरंजनमाधवाला लक्ष्मीधर बरवे यांजकडून इ. स. १७२४ मध्यें मंत्रोपदेश झाला होता. निरंजनमाधव ह्या मंत्रोपदेशामुळें दत्तसंप्रदायी बनला. इ. स. १७२७ मध्यें लक्ष्मीधर बरवे यांच्या मृत्यूची वार्ता समजल्यावर निरंजनमाधवास अत्यंत दुःख झालें. ह्या शोकसागरांत मग्न असतां गुरूनें स्वप्नांत येऊन सांगितलें, 'आजपासून सातवे दिवशीं आमची विभूति तुम्हास भेटेल'. सत्पुरुषाचा हा दृष्टान्त स्वप्नसृष्टींतून सत्यसृष्टींत उतरला. निरंजनमाधवांच्या बंधूमुळें निरंजनमाधवाचा बापजी पंडित नांवाच्या सत्पुरुषाशीं परिचय झाला. बापजी पंडित बाजीरावाचे स्नेही व हुशार वकील होते. बाजीरावानें बापजी पंडित व निरंजनमाधव ह्यांची एकत्र नेमणूक केल्यामुळें तर ह्या दोन सत्पुरुषांचें संघट्टन अधिकच वाढलें. बापजी पंडित ह्यांच्या सहवासांत निरंजनमाधवास योगसामर्थ्यांचें ज्ञान

प्राप्त झालें. बालावबोध, पंचीकरण, कपिलगीता ह्यांचा त्यानें परिचय करून घेतला. त्यानें इ. स. १७२७ मध्येंच बापजी पंडिताकडून ज्ञानमार्गी सिद्धेश्वर सांप्रदायाची दीक्षा घेतली. अशा रीतीनें दत्तसांप्रदायी बनाजी माधवाचा सिद्धेश्वर सांप्रदायी निरंजनमाधव झाला.

निरंजनमाधवानें लक्ष्मीधर बरवे यांजकडून दत्तसांप्रदायाची दीक्षा घेतली. बापजी पंडितांकडून सिद्धेश्वरसांप्रदायाची दीक्षा घेतली व तो स्वतः भागवतसांप्रदायी मनोवृत्तीचा होता. ह्यामुळें त्याच्या काव्यांत तिन्ही सांप्रदायांच्या तत्त्वज्ञानाचा सुंदर मेळ जमून आला आहे. सिद्धेश्वरसांप्रदायासारखा ज्ञानमार्ग स्वीकारल्यामुळें ‘विचार’ हा त्याच्या काव्याचा स्थायीभाव होऊन बसला आहे. देवतांचीं स्तोत्रें गातांना भागवताची भक्ति त्याच्या ठिकाणीं प्रतिबिंबित झालेली दिसते. ह्यामुळें त्याला संतांच्या पंगतींत बसवावें तर वृत्त, अलंकार, संस्कृतप्रचुर भाषा, रचनाप्रकारांचें वैपुल्य यांत त्यानें दाखविलेलें नैपुण्य पाहून त्याला पंतांच्या पंडित–कवींच्या पंगतींत बसवावें असें वाटतें. उपासनेच्या आणि काव्याच्या सर्व सांप्रदायाचा त्याच्या काव्यांत समन्वय झालेला दिसतो. शिव आणि विष्णु ह्या दोन्ही देवतांच्या ठिकाणीं त्याला एकच परमार्थस्वरूप दिसतें. त्याच्या काव्याचा विकास त्याच्या जीवनविकासाच्या संगतीनें झालेला दिसतो. ‘ सांबशिवस्तुति, ’ ‘ भवानीस्तोत्र, ’ ‘ हनुमंतस्तोत्र ’, ‘ व्यंकटेशस्तोत्र, ’ इत्यादि त्याच्या प्रसिद्ध स्तोत्रावरून त्याचें सर्वदेवता उपासना–प्रेम स्पष्ट दिसून येतें. त्याच्या काव्यांत गेयता हा महत्त्वाचा गुण आहे. भगवद्गीता; भागवत, वेदान्त, व्याकरण, सिद्धांतसूत्रकौमुदी, त्याचप्रमाणें पंचमहाकाव्यें इत्यादि ग्रंथांचा त्याचा व्यासंग दांडगा होता. अशा ह्या साहित्यशास्त्रज्ञ महाकवीबद्दल इतर कवींनीं उल्लेख केलेला आढळत नाहीं. प्राचीन कवींचा ‘सन्मणिमालेंत ’ सादर उल्लेख करणाऱ्या मोरोपंतांनीं देखील निरंजनमाधवाच्या बाबतींत मूकवृत्तीच धारण केली आहे. कदाचित् बाबूजी नाईक बारामतीकर आणि नानासाहेब पेशवे यांचे संबंध ह्याला कारण असावेत.

निरंजनमाधवानें खरी वाङ्मयसेवा १७५८ नंतरच केली. नाहीं म्हणावयास कृष्णानंदसिंधु हा ग्रंथ त्यानें १७३५ ते १७५२ ह्या कालांत रचला असावा. ह्यानंतर त्यानें 'चिद्बोधरामायण' हा ग्रंथ रचिला. ह्या ग्रंथावरून चमत्कृतिपूर्ण काव्यरचना करण्याची स्फूर्ति मोरोपंतांनीं निरंजनमाधवाच्या काव्यावरून घेतली असावी असे वाटतें. परंतु संस्कृत-प्रचुर शैलीमुळें मोरोपंतांच्या काव्यांत आलेली क्लिष्टता निरंजनमाधवाच्या काव्यांत दिसत नाहीं. ह्यानंतर 'वृत्तमुक्तावलि' हा ग्रंथ लिहिल्यानंतर इ. स. १७६३ मध्यें निरंजनमाधवानें आपला सुप्रसिद्ध ग्रंथ 'सांप्रदाय-परिमळ' हा लिहिला आहे. ह्या ओवीबद्ध ग्रंथांत कवीनें आपल्या सांप्रदायाची हकीकत आपल्या पत्नीस सांगितली आहे. कवि म्हणतो—

> तुझ्याच अर्थी जाण । म्यां पूर्वी ग्रंथ रचिले पार न ॥
> आतां संप्रदाय कथन । करणें वल्लभे तुजसाठीं ॥

कवीनें आपल्या कुलाची, सांप्रदायाची, राजकारणाची, कृष्णमूर्ति मिळाल्याची इत्थंभूत हकीकत गंगावतीस सांगितली आहे. निरंजनमाधवाच्या चरित्र–कथनाच्या दृष्टीनें हा ग्रंथ महत्त्वाचा आहे. परंतु प्राध्यापक पंगूंच्या मतें हा ग्रंथ निरंजनमाधवानें स्वतः लिहिला नसून, निरंजनमाधव गंगावतीस सांगतो आहे अशी कल्पना करून निरंजनमाधवाच्या शिष्यानें, कोणी निरंजनदासानें लिहिला असावा. ह्यानंतरचा ग्रंथ म्हणजे 'ज्ञानेश्वरविजय' हा होय. चरित्रग्रंथ ह्या दृष्टीनें हा ग्रंथ महत्त्वाचा आहे. ह्यानंतर १७६७ मध्यें त्यानें 'वृत्तावनमाला' हा वृत्तावरील ग्रंथ लिहिला. वृत्ताचें उदाहरण देतांना त्यानें त्या काव्यांत वृत्ताचें नांवहि खुबीनें योजिलें आहे. उदा०—

> 'जें इंद्रवज्रा गणना करीना । जें विष्णुचक्रा सहसा तुटेना ।
> दारिद्र्य माझें हरिलें कृपाळें । आलोकमात्रें अतिपुण्यशीळें ॥'

इ. स. १७६८ त लिहिलेला 'सुभद्राचंपू' हा ग्रंथ शृंगाररसप्रधान आहे. ह्यानंतर निरंजनमाधवानें 'वशिष्ठ सुशर्मा संवाद', 'रामकर्णामृत,'

'निरोष्ठ रामचरित' व 'वृत्तावतंस' हे ग्रंथ लिहिले. 'वृत्तावतंस' हा शेवटचा ग्रंथ त्यानें वयाच्या ७० व्या वर्षी लिहिला. ह्या मोठ्या ग्रंथाखेरीज मध्यंतरीं त्यानें हनुमंत, महालक्ष्मी, मल्हारी, व्यंकटेश, सांबशिव, भवानी, विठ्ठल, तुलसी, भागीरथी, गोदावरी, बनशंकरी इत्यादि देवतांचीं स्तोत्रें रचिलीं व शंकराचार्यांच्या 'स्वात्मानंदप्रकाश' ग्रंथावर टीका केली. इतकी विविध आणि विपुल काव्यरचना करणारा हा कवि महाराष्ट्राला अज्ञात असावा हें आश्चर्य आहे. त्याची बरीच काव्यसंपदा प्रकाशांत आणण्याचें श्रेय कै. पांगारकर ह्यांना आहे.

असा हा महाराष्ट्राचा आद्यस्तोत्रकार भगवंतापुढें स्तोत्रगायन करण्यासाठीं इ. स. १७७२ मध्यें स्वर्गास प्रयाण करिता झाला.

● ● ●

## महिपतीबोवा



चरित्रलेखनाची पद्धत महानुभावांच्या ' लीळाचरित्रा' पासून महाराष्ट्र-भाषेला माहीत आहे. त्यानंतरच्या काळांत नामदेवांचें 'श्रीज्ञानेश्वर-चरित्र' निरंजनमाधवाचा ' श्रीज्ञानेश्वरविजय ', गिरिधरस्वामींचा ' श्रीसमर्थ-प्रताप, ' नाभाजींचीं ' संतचरित्रें ' असे कांहीं ठळक चरित्रग्रंथ झाले. शिवाय भागवतपंथीय संतांनीं इतर संतांबद्दल आदरयुक्त चरित्र-उल्लेख बऱ्याच वेळां केलेला आढळतो. नाभाजीनंतरच्या काळांत उद्धवचिद्घन व दासोदिगंबर ह्यांचाहि चरित्रकार म्हणून महाराष्ट्र-वाङ्मयाच्या इतिहासांत मागोवा लागतो. परंतु श्रद्धायुक्त अंतःकरणाची जोड देऊन अत्यंत संशोधक वृत्तीनें चरित्र-लेखन करण्याचें कार्य महिपतीबोवा ताहराबादकर ह्यांनींच प्रथम केलें असें म्हणावयास हरकत नाहीं. चरित्राची गट्टी उत्तम साधावयाला चरित्रकार चरित्रनायकाच्या जीवनांत पूर्ण समरस होऊन जावा लागतो असें म्हणतात. चरित्रनायकाची वृत्ति ती चरित्रकाराची वृत्ति व्हावी लागते. संतांचीं चरित्रें लिहिणारा संतच असावयास पाहिजे होता. ह्या कसोटीला श्रीमहिपतीबोवा पूर्णपणें उतरले असें आपण म्हणणें म्हणजे पायरीला सोडून बोलल्यासारखें होणार आहे. आणि म्हणूनच महाराष्ट्राच्या आद्य चरित्रकाराचा मान महिपतीबोवा ताहराबादकर ह्यांनाच द्यावयास हवा.

महिपतींचे वडील दादोपंत कांबळे-कुलकर्णी हे मोगलांच्या पदरीं होते. मोगल दरबारची नोकरी सोडून ते ताहराबादेस त्यांच्या वयाच्या ४० व्या वर्षी आले. ते अत्यंत धार्मिक वृत्तीचे होते. दर महिन्यांत एकादशीस पंढरपूरची वारी करण्याचा त्यांचा क्रम चोवीस वर्षांच्या कालावधींत एकदांही चुकला नाहीं. वयाला साठी उलटून गेली तरी पुत्रमुख पाहण्याचा योग दादोपंतांना आला नाहीं. आपल्यामागें आपल्या घराण्याची पंढरीची वारी बंद पडणार याची त्यांना खंत वाटूं लागली. एकदां एकादशीस

म. ग्रं.
वा. क्र ...
दि. ...१०१...

पंढरीस गेले असतां त्यांनीं पंढरीच्या पांडुरंगापुढें हात जोडून मागणें केलें, ‘देवा, माझ्या घराण्याची पंढरीची वारी चालू राहूं दे.’ पांडुरंग भक्तांचा भुकेला. चंद्रभागेच्या वाळवंटीं आषाढी कार्तिकीला दिंड्या–पताकांचे भार यावयास पाहिजेत हीच मुळीं त्याची उत्कंठा. त्यानें दादोपंतांच्या हाकेला ओ दिली. विठ्ठलाच्या कृपेनें दादोपंतांनीं साठी उलटल्यानंतर शके १६१७ त पुत्रमुख पाहिलें. दादोपंतांनीं पुत्राचें नांव महिपती असें ठेविलें. महिपती रूपानें अतिशय सुंदर होते. राघूच्या चोंचेला लाजवेल अशी सोत्सुक नासिका, विशाल नेत्र आणि आकर्षक भव्य गौरवर्ण चेहरा; पाहणाऱ्याची नजर ठरत नसे चेहऱ्यावर आणि ठरली तर हलत नसे तेथून. त्यांच्या बुद्धीच्या तीक्ष्णतेला श्रद्धेनें मोहकत्व आणलें होतें. लहानपणीं बालबुद्धीचे त्यांचे खेळ चालावयाचे ते सुद्धां विठ्ठलाच्या भजनपूजनाचे. वयाच्या पांचव्या वर्षींच त्यांनीं वडिलांपाशीं पंढरीच्या वारीस जाण्याचा हट्ट घेतला. दादोपंतांची वृद्धावस्था झालेली.ते जाऊं शकत नव्हते. शेवटीं दोन विश्वासू माणसें बरोबर देऊन दादोपंतांनी महिपतींचा हट्ट पुरवला. विठ्ठलाचें सावळें स्वरूप पाहून महिपतींच्या नेत्रांतून घळघळां प्रेमाश्रु वाहूं लागले. पांडुरंगाची मूर्तीहि हसरी दिसत होती. त्याला भक्तांचें केवढें प्रेम. आणि हा तर भक्तांचा भक्त चरणापाशीं आलेला. नाहींतरी आजीचें मुलीपेक्षां नातीवरच अधिक प्रेम असतें.

महिपतीबोवांचें अध्ययन उत्तम प्रकारें झालेलें होतें. ज्ञानलालसेच्या जोडीला शीघ्र बुद्धिमत्ता लाभल्यामुळें कोणत्याहि विषयाचें आकलन त्यांना सहज होत असे. मराठीशिवाय संस्कृत, गुजराथी, कानडी व हिंदी ह्या भाषांचें ज्ञान महिपतीस उत्तम होतें. संस्कृत भाषेंतील प्रसिद्ध ग्रंथांचें अध्ययन त्यांनीं केलें होतें. त्यांच्या वेळेस उपलब्ध असलेले सर्व मराठी ग्रंथ त्यांच्या वाचनांत आले असावे असें त्यांच्या ग्रंथावरून वाटतें. तत्कालीन मराठी ग्रंथ हस्तलिखित असून ते अत्यंत दुर्मिळ असणार हें उघडच आहे. कै. ह. भ. प. पांगारकरांसारख्या आधुनिक पंडिताला सुद्धां

मराठी ग्रंथाचें वाचन किती कष्टानें करावें लागलें हें त्यांनीं आपल्या 'चरित्रचंद्रांत' दिलें आहे. मग महिपतींना तर ही गोष्ट किती कठीण गेली असेल ? असें असतांहि त्यांनीं केलेलें अध्ययन पाहून त्यांच्या ज्ञानलालसेविषयीं आश्चर्य वाटतें.

वडिलांचें वय झालेलें असल्यामुळें लौकरच महिपतींच्या शिरावरील पितृछत्र नाहींसें झालें. संसाराची जबाबदारी सोळा वर्षांच्या महिपतींवर येऊन पडली. ते ताहराबाद गांवचे कुलकर्णीपण करूं लागले. कुलकर्णीपणाच्या जोडीला ते जोशीपणहि करीत. ताहराबाद हा गांव एका मुसलमानास जहागीर म्हणून मिळालेला होता. त्याच्या कचेरीवर महिपतीबोवांना नेहमीं जावें लागत असे. एकदां कचेरींतून येऊन महिपतीबोवा स्नान करून देवपूजा करीत होते. इतक्यांत कचेरींतील शिपाई त्यांना बोलावण्यास आला. देवपूजा झाल्यावर येईन असा महिपतींनीं निरोप पाठविला. पण पुन्हा दोन बोलावणीं येऊन महिपतीबोवांच्या पूजेंत अडथळा आला. त्यांना फार विषाद वाटला. कशीबशी पूजा आटोपून ते त्या अविंध अधिकाऱ्याच्या कचेरीवर दाखल झाले. त्या माजोरी अधिकाऱ्यानें विलंब लावल्याबद्दल महिपतींवर वाटेल तसें तोंड सोडलें. परक्याची 'ताबेदारी पत्करल्यामुळें आपणांस विठ्ठलाचें पूजन अर्ध्यावर टाकावें लागलें व हा अपशब्दांचा आहेर स्वीकारावा लागला असें पाहून महिपती महाराजांनीं घरीं येऊन कानावरची लेखणी विठ्ठलचरणीं वाहिली व 'आजपासून ताबेदारीसाठीं लेखणी हातांत धरणार नाहीं,' अशी शपथ घेतली. ही शपथ महिपती महाराजांनीं तर पाळलीच, पण त्यांच्या पुढील सात पिढ्यांनीं ती शपथ पाळली असें त्यांचे वंशज श्री. भास्कर चिंतामण ताहराबादकर सांगतात. ह्यांचे थोरले बंधु कै. भिकाजी चिंतामण ताहराबादकर हे पुण्यांतील एक नांवाजलेले कीर्तनकार होते. कीर्तन करण्याचा हा आनुवंशिक गुण या घराण्यांत कायम चालत आलेला आहे. ही महिपती महाराजांची पुण्याई आहे असें त्यांचे वंशज मानतात.

महिपती महाराजांनीं विठ्ठलचरणीं ठेवलेल्या लेखणीचा संतांचीं चरित्रें लिहिण्यासाठीं सदुपयोग करण्याचें ठरविलें. ते वडिलांच्या पश्चात् पंढरीची वारी सतत करीत असत. संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांना ते आपले गुरु मानीत. ते म्हणतात—

‘ जो भक्ति-ज्ञान वैराग्यपुतळा । ज्याचे अंगीं अनंत कळा ।
तो सद्‌गुरु तुकाराम आम्हांसि जोडला । स्वप्नीं दिधला उपदेश ॥ ’

तुकाराम महाराजांनीं स्वप्नांत येऊन आपणांस संतचरित्रें लिहावयास सांगितलें असें महिपती महाराज सांगतात. तुकाराम महाराजांच्या कृपा-प्रसादानेंच त्यांना काव्यस्फूर्ति झाली.

संतांचीं चरित्रें गाणें हेंच महिपती महाराजांचें जीवितकार्य होतें. भक्तविजय हा त्यांचा पहिला ग्रंथ होय. तो त्यांनीं शके १६८४ मध्यें रचिला. म्हणजे वयाची पन्नाशी गांठण्याच्या सुमारास त्यांनीं ग्रंथ लेखनास सुरवात केली. भक्तविजय, संतलीलामृत, भक्तलीलामृत आणि संत-विजय हे त्यांचे चार प्रमुख चरित्र-ग्रंथ होत. संतविजय हा ग्रंथ अपूर्ण असून त्यांत फक्त श्री समर्थ रामदासस्वामींचें चारित्र वर्णिलें आहे. चरित्र-लेखनाच्या बाबतींत महिपती महाराजांनीं अत्यंत संशोधक वृत्ति दाखविली आहे. निरनिराळ्या संतांच्या वंशजांकडे जाऊन त्यांनीं माहिती गोळा करून चारित्र-लेखन केलें. प्रथम नाभाजी, उद्धवचिद्‌घन ह्यांच्या चरित्रांचा त्यांनीं आधार घेतला. परंतु त्यांतील अपुरेपणा लक्षांत आल्यानंतर त्यांनीं निरनिराळ्या लोकांकडून स्वतः जातीनें माहिती मिळवून चरित्रलेखन केलें. कांहीं संतांचीं त्यांनीं पुन्हा पुन्हा चरित्रें लिहिलीं आहेत. ह्यावरुन त्यांचें संतप्रेम दिसून येतें. महिपती महाराजांनीं ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, भानुदास, दामाजी, गोराकुंभार, रोहिदास वगैरे अनेक संतांचीं चरित्रें वर्णिलीं आहेत. महिपतींनीं लिहिलेलें तुकाराम महाराजांचें चरित्र फार रसाळ आहे. संतचरित्राखेरीज कथासारामृत, पंढरीमाहात्म्य, अनंतव्रत-कथा, दत्तात्रेयजन्म, तुलसीमाहात्म्य, पांडुरंग-स्तोत्र, मुक्ताभरण-व्रत, ऋषिपंचमी-

व्रत अशी इतर बरीच रचना महिपती महाराजांनीं केलेली आहे. ह्या ठळक ग्रंथरचनेखेरीज महिपती महाराजांचे कांहीं अभंग व स्फुट पदें प्रसिद्ध आहेत. महिपती महाराजांची एकंदर ग्रंथरचना ४०००० पदें एवढी आहे. ह्या अफाट काव्यसागराच्या थोरवीबद्दल कविवर्य मोरोपंत म्हणतात—

‘ महिपतिच्या वाणीतें सेवुनि तरतात जेंवि गंगेतें ।
विषयांत रंगले जे जनमानस सद्यशीं तरंगे ते ॥ ’

महिपती महाराजांचा दीर्घोद्योग, त्यांची भक्ति, व निष्ठा अतुल आहेत. त्यांचा ग्रंथरचनेचा प्रचंड उद्योग पाहून रसिक वाचकांस परमावधीचें कौतुक वाटतें. वारकरी संप्रदायांत असा एकहि पूज्य झालेला संत नाहीं, कीं ज्याला महिपती महाराजांनीं वर्णिलें नाहीं. ‘ महिपती महाराजांच्या तोलाचा संतचरित्रकार पृथ्वीच्या पाठीवर विरळाच सांपडेल ’ असें कै. ह. भ. प. पांगारकर म्हणतात. करुणापर अभंग, आरत्या, पदें, अभंगबद्ध संतचरित्रें अशी अजून किती तरी ग्रंथरचना प्रकाशित आहे. प्रत्येक ग्रंथाच्या शेवटीं त्या ग्रंथांत कोणता भाग आला आहे, हें महिपती महाराज सांगतात. ह्यावरून त्यांची ग्रंथलेखन–पद्धति किती शास्त्रशुद्ध आहे, हें सहज समजून येईल. आपण जें काय लिहीत आहोंत तें पांडुरंगाच्या कृपेनें लिहीत आहोंत, असा महिपती महाराजांचा ठाम समज होता. यामुळें स्वतःच्या कर्तबगारीसंबंधानें ज्यांत थोडा तरी अहंभाव व्यक्त झाला आहे, असा एकहि शब्द त्यांच्या कवितेंत आढळत नाहीं.

महिपती महाराजांच्या काव्यसागराची खरी गोडी चाखायची म्हणजे एक दोन आचमनांनीं कसें भागावें ? त्या काव्यसागरांत डुबावयासच पाहिजे. पण अल्पसमाधान म्हणून चार दोन तुषारांनीं पुनीत व्हावयासच काय हरकत आहे ?

( १ ) चर्मपूजा करणाऱ्या रोहिदासाची ब्राह्मणश्रेष्ठानें निंदा केल्यावर तो संतश्रेष्ठ म्हणतो—

‘ यावरी रोहिदास बोले वचन । विश्वव्यापक जगज्जीवन ।
तो गवाळ्यांत असोन । विटाळ कैसा मानितां ॥

जन्मतां आणि मरतां। ज्याचा विटाळ तुम्ही धरितां।
तेथें उत्तम पदार्थ कोणता। तुमचे दृष्टीस कोण दिसे ।।
अमंगळ या परीचें चाम। तेथें उत्तम आत्माराम।
निष्कलंक घनश्याम । सर्वांघटीं सारिखा ।। '

( २ ) ' अर्थाच्या प्रभा फांकतां जाण। बोधाचा शीतळ सुटला पवन।
तेणें जिज्ञासु वृक्षासी अंकुरण। फुटी पाहे एकसरें ।। '

ह्यांतील रूपकव्यहार ज्ञानेश्वरीचीच आठवण देते.

( ३ ) तुकाराम महाराजांचा द्वेष करणाऱ्याबद्दल महिपती महाराज म्हणतात—

' दातयाची ऐकूनि कीर्ति। कृपण उगेचि त्या धिक्कारिती।
कीं दिव्य औषधि चमकतां राती । रोग तळमळती चित्तांत ।। '

( ४ ) स्वतःच्या ग्रंथरचनेसंबंधानें महिपती म्हणतात—

' जैशी आज्ञा केली रुक्मिणीवरें । तितुकींच ग्रंथीं लिहिलीं अक्षरें ।
जैसा वाजविणार फुंकितो वारे । तैशीं वाजंत्रें वाजतीं ।। ' १ ।।

(५) ' विठो पंढरीच्या राया। जन्मा आलों कीर्ति गाया ।।'
धन्य देखिली पंढरी । तुझे पाय विटेवरी ।। २ ।।
सलगी केली या संतांसी । सुख वाटलें जीवासी ।। ३ ।।
मुखीं नाम गाय कीर्ति । दास तुझा महिपति '।। ४ ।।

( ६ ) वार्धक्यामुळें पंढरीची वारी चुकली तेव्हां महिपती महाराजांनीं पांडुरंगाला लिहिलेलें पत्र महाराजांच्या अंतःकरणाचा प्रेमळपणा व्यक्त करितें—

' सेविसि विज्ञापना ऐसी। येत होतों पंढरीसी।
... ... ... ... ... ... ... ...

अश्वावरूनि अकस्मात। ग्रामद्वारीं पडियेलों।।
तेणें देहदुःखें करून। विकळ मूर्च्छित पडलों जाण।
चित्तीं झालें तुझें स्मरण। अगाध महिमान संतांचें ।।
... ... ... ... ... ... ... ...

शेवटील हेत आहे साचा। संबंध तोंडीं या देहाचा।
ठाव इच्छितसें पायांचा। आणिक वाचा न बोले ॥’

महिपतींची वाणी फार रसाळ, प्रासादिक आणि साधी आहे. त्यांच्या ग्रंथांत भक्तिरस नुसता उचंबळून राहिला आहे. वर्णनें सुंदर आणि उपमा तर अत्यंत समर्पक आणि हृदयंगम आहेत. महिपती महाराज स्वभावानें फार नम्र, प्रेमळ आणि मोठे बहुश्रुत होते. तुकाराम महाराजांचे शिष्य असल्यामुळें कट्टे वैष्णव व भूतदयावादी होते. त्यांच्या वेळीं एकदां महाराष्ट्रांत दुष्काळ पडला होता. तेव्हां महाराजांनीं आपलें घर गरिबांकडून लुटवलें. पुढें दर तीन वर्षांनीं ते आपलें घर गरिबांकडून लुटवीत. पण पुढील पिढींत हा क्रम चालणें अशक्य आहे असें कांहीं लोकांनीं सांगितल्यावरें त्यांनीं ताहराबादेस एक विठ्ठल-मंदिर बांधलें. महिपती महाराजांचे थोरले चिरंजीव विठोबा ताहराबादकर हे कविवर्य मोरोपंताचे मित्र असून मोठे व्युत्पन्न—पंडित व कवि होते. त्यांच्याचमुळें मोरोपंतांनीं महिपतींचे ग्रंथ वाचले असावेत व ‘ माहिपती-स्तुति ’ हें काव्य लिहिलें असावें.

महिपती महाराज शके १७१२ ( स. १७९० ) श्रावण व. १२ या दिवशीं समाधिस्थ झाले.

• • •

# कविवर्य मोरोपंत :: १६ ::

मराठी कवितेला संस्कृत काव्याची प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या श्रेष्ठ पण्डित–कवींत अग्रेसरत्वाचा मान जर कोणाला द्यावयाचा असेल तर तो कविवर्य मोरोपंतांनाच. विपुलतेच्या दृष्टीनें पंतांच्या काव्याला सागराची उपमा द्यावयाची झाल्यास त्यांतील अमोघ काव्यगुणामुळें त्याला रत्नाकरच म्हणावयास हवें.

अशा ह्या श्रेष्ठ महाराष्ट्र–कवीचा जन्म पराडकरांच्या घराण्यांत झाला. हें पराडकर घराणें मूळचें रत्नागिरी जिल्ह्यांतील सौंदळ ह्या गांवचें. इ.स. १७००–१७१५ह्या सुमारास भट, भानु, पटवर्धन वगैरे जीं कांहीं घराणीं कोंकणांतून घाटावर आलीं, त्यांत पराडकरांचें घराणेंहि देशावर आलें. मोरोपंतांचे वडील रामाजीपंत हे पाध्ये बंधूबरोबर शके १६३५ च्या सुमारास ( १७१३ ) कोंकण सोडून कोल्हापुरांत पन्हाळ्यावर आले. इथेंच आल्यानंतर रामाजीपंतांचें कोल्हापूरच्या किर्लोस्कर घराण्यांतील मुलीशीं लग्न झालें. त्यांना चार मुलें झालीं. एक मुलगी आणि तीन मुलगे- मोरोपंतांचा जन्म शके १६५१ मध्यें पन्हाळ्यावर झाला. ह्या श्रेष्ठ कवीच्या जन्माचा मोठ्या आदरानें उल्लेख करतांना राजाराम प्रासादी नांवाच्या अठराव्या शतकांतील एका कवींनीं—

‘ चतुर्थीचें उभयतां व्रत । मातापिता अनुष्ठीत ।
जन्मांतरींचें थोर सुकृत । आले गणनाथ उदरासी । ’
‘ ते श्रीगुरु मोरोपंडित । गणपतीचा अवतार सत्य । ’

असें म्हटलें आहे.

पन्हाळ्याच्या निसर्गसंपन्न पार्श्वभूमीवरच मोरोपंतांचीं पहिलीं २३-२४ वर्षें गेलीं. ह्या सृष्टिसौंदर्याच्या अभ्यासाचा प्रतिध्वनि पुढें पंतांच्या काव्यांत ठायीं ठायीं उमटलेला दिसतो. पंतांचे वडील रामाजीपंत हे जेव्हां कोंकणांतून पन्हाळ्यावर आले तेव्हां त्यांच्या बरोबर केशव पाध्ये व गणेश

पाध्ये हे दोघे भाऊभाऊ पन्हाळ्यास आले होते. ह्या पाध्ये बंधूंनींच पंतांच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली होती. स्वतः पंतांनीं ' गुरु माझे श्रीराम, श्रीमत्केशव, गणेश हरि चवघे ' असा आपल्या गुरूंबद्दल उल्लेख केला आहे. श्रीराम म्हणजे पंतांचे वडील रामाजीपंत आणि हरि म्हणजे पंतांचें मौंजीबंधन करणारे पराडकर घराण्याचे कुलोपाध्याय हरिभटजी वरेकर हे होत. केशव आणि गणेश हे पाध्ये बंधु होत. पंतांची काव्यभक्ति त्यांच्या लहानपणींच दिसून येऊं लागली होती. दिसेल तें पोथीचें पान वाचावें, भिंतीवर कसल्या तरी ओळी खडूनें लिहाव्यात आणि नेहमीं कांहीं तरी गुणगुणत असावें ही ह्या बालपण्डित कवीची नेहमींची संवय होती. एकदां पंत पाध्यांच्या घरीं द्वादशीचा ब्राह्मण म्हणून जेवावयास गेले होते. पानें मांडावयास जरा वेळ आहे असें पाहून लंगोटीबहाद्दर पंत खडू घेऊन परसदारीं गेले आणि त्याच वेळेस तयार केलेला एक श्लोक त्यांनीं एका भिंतीवर लिहून काढला. हें पंतांचें पहिलें वहिलें काव्य आज कांहीं उपलब्ध नाहीं. पंतांनीं भिंतीवर लिहिलेला हा श्लोक दोन चार दिवसांनीं केशव पाध्ये ह्यांच्या पाहण्यांत आला. त्यांनीं ताबडतोब रामाजीपंतांना तो श्लोक दाखवून सांगितलें कीं, ' तुमचा मोरू बुद्धिवान् दिसतो, त्याला उद्यांपासून आमच्याकडे पढायला पाठवीत जा. ' अशा रीतीनें मोरोपंतांच्या विद्यार्जनास सुरवात झाली. श्रम करण्याची आवड, विनय, आज्ञाधारकत्व, ग्राहकत्व इत्यादि गुणांनीं मोरोपंतांनीं आपल्या गुरुजींचें प्रेम संपादन केलें. रघु,किरातादि संस्कृत पंच-महाकाव्यें,रसगंगाधर,काव्यप्रकाश इत्यादि संस्कृत ग्रंथांचें अध्ययन पंतांनीं ह्या गुरुद्वयाजवळ केलें. आपल्या सहाध्यायी बंधूंशीं वागण्यांत मोरोपंतांच्या स्वभावांतील सौजन्य वारंवार प्रतीत झालें. त्यांचा शांत, मनमिळाऊ, मितभाषणी व विद्याव्यासंगी स्वभाव सर्वांस हवाहवासा वाटे. आपणांमध्यें निर्माण झालेली विरक्ति, ईश्वरनिष्ठा हें गुरुभक्तीचेंच फळ होय, असें पंत वारंवार म्हणतात. पन्हाळ्याच्या प्रसन्न

निसर्गाच्या सहवासांत, केशव पाध्ये व गणेश पाध्ये ह्यांसारख्या निस्पृह आचार्यांच्या मार्गदर्शनत्वाखालीं पंतांनीं बारा वर्षें अध्ययन केलें. त्यांच्या मनांत काव्याचें बीजारोपण करणाऱ्या त्या नितांत सृष्टिसौंदर्याचा आणि त्या काव्यशक्तीला व्युत्पन्नतेची जोड देणाऱ्या निस्पृह गुरुदेवतेचा त्याग करण्याची पाळी पंतांवर लौकरच आली.

फडावर कारकुनी करीत असतांना मोरोपंतांच्या वडिलांच्या हातून राजसत्तेचा उपमर्द होण्याजोगी कांहीं गोष्ट घडली म्हणून ते बारामतीस बाबूजी नाइकांचे पदरीं जाऊन राहिले. पंत पन्हाळयासच राहिले. संसाराचें ओझें हलकें करण्यासाठीं वडिलांना मदत म्हणून ते पन्हाळयावर फडावर नोकरीस राहिले. येथेंच पंतजीवनांतील ‘ एका पैशाच्या चुकीची ’ सुप्रसिद्ध गोष्ट घडून आली. रात्रीं समई लावून हिशेबाच्या वह्या तपाशीत पंत, तीन घटका रात्र उलटून जातस्तवर जागत बसले होते. चूक सांपडल्यावर पंतांनीं एकदम टाळी वाजविली. हा प्रकार गडावरील एका सद्गृहस्थानें पाहिला. ते पंतांना म्हणाले, ‘मोरोबा, पाव आण्याची चूक शोधण्यासाठीं तूं जशी चित्ताची एकाग्रता केलीस, तशी भगवंताच्या आराधनेसाठीं केलीस तर तुझ्या जन्माचें सार्थक होईल. ’ ह्या उपदेशाचा मोरोपंतांच्या मनावर बराच परिणाम झाला. ह्यानंतर वयाच्या चोविसाव्या वर्षीं म्हणजे शके १६७५ मध्यें ते वडिलांना भेटण्यासाठीं म्हणून जे बारामतीस गेले ते परत पन्हाळयाला परतले नाहींत.

मोरोपंतांचे तीर्थरूप रामाजीपंत बारामतीस बाबूजी नाइकांच्या आश्रयीं कोठावळयाच्या कामावर होते. मोरोपंत पन्हाळा सोडून वडिलांच्या भेटीस म्हणून जे बारामतीस आले त्याला पांच सहा महिने झाले तरी त्यांचा आणि श्रीमंत बाबूजी नाईक बारामतीकर ह्यांचा प्रत्यक्ष बोलण्याचा प्रसंग आला नव्हता. नाइक हे पेशव्यांचे व्याही आणि कांहीं काळचे प्रतिस्पर्धी होते. आणि ह्याच स्पर्धेचा परिपाक पुढें रावबाजींच्या काळांत नाइकांच्या घरावरून नांगर फिरविण्यांत झाला होता. ह्या नाइकांच्या

पंगतीस नेहमीं पांचपन्नास आश्रित असत. त्यांत पन्नासावा नंबर रामाजीपंत पराडकरांचा असे आणि एकावन्नावा क्रमांक मोरोपंताचा असे. नाइकांच्या घरच्या मुलींना, सुनांना पंतांनीं कांहीं सीतासावित्रींचीं झोपाळ्यावर बसून म्हणावयाचीं गाणीं करून दिलीं. तीं त्यांनीं पाठ केलीं होतीं. तीं गाणीं एकदां नाइकांच्या ऐकण्यांत आलीं. तेव्हां त्यांनीं मोरोपंतांची चौकशी केली. नाइकांनीं पंतांकडून शिवकवचाचें श्लोकबद्ध भाषांतर करून घेतलें. तेव्हां नाइकांना पंतांच्या काव्यशक्तीची आणि व्युत्पन्नतेची खात्री पटली. दुसऱ्याच दिवशीं नाइकांनीं मोरोपंतांना पंगतींत आपल्या शेजारीं बसण्याचा मान दिला. पण वडिलांचा उपमर्द होऊं नये म्हणून पंत आपल्या पूर्वपरिचित जागेवरच बसले. शेवटीं नाइकांच्या कारभाऱ्यांनीं रामाजीपंतांना दुसऱ्या पाटावर नेऊन बसविलें, तेव्हां पंत तिसऱ्या पाटावर जाऊन बसले. ह्याच सुमारास पंतांनीं बाबूजी नाइकांच्या इच्छेखातर शिवलीलामृत आर्याबद्ध केलें. नाइकांनीं संतुष्ट होऊन मोरोपंतांना सालीना पांचशें रुपये देऊन पुराण सांगण्यास ठेवलें. अशा रीतीनें मोरोपंत बाबूजी नाइकांचे पुराणिक झाले.

नाइकांनीं पंतास बारामतीस एक घरहि करून दिलें होतें. पंतांचा घर-परिवार बराच मोठा होता. थोरले बंधु सोनोपंत जरी विभक्त असले तरी मोरोपंत आणि त्यांचे धाकटे बंधु आबाजीपंत हे एकत्रच असत. मोरो-पंतांच्या स्त्रीचें नांव रमाबाई असें होतें. पंतांना तीन पुत्र आणि तीन कन्या होत्या. आपला आणि आपले बंधु आबा यांचा असा पंचवीस तीस मंडळींचा परिवार पंतांच्या संसारांत होता. पंत हे फार प्रेमळ व कुटुंब-वत्सल होते. एवढ्या मोठ्या संसारव्यापानें कावून न जातां ते सर्वांशीं मोठ्या प्रेमानें वागत. त्यांचें आपल्या कुटुंबांतील सर्व व्यक्तींबद्दलचें प्रेम त्यांच्या ‘ गंगावकिलीं’त दिसून येतें. आपल्या बंधूबद्दल व भावजयीबद्दल त्यांनीं म्हटलें आहे—

‘ वदला प्रसन्नचित्तें साहित्य करूनि बंधु आता जा !
विष्णुपदा ! तारावा याची सगुणा तशीच बा भाजा ॥ ’

आपल्या यजमानाबद्दलहि त्यांनीं असेच कृतज्ञतेचे व प्रेमाचे उद्गार वारंवार व्यक्त केले आहेत. त्यांचें घर गोकुळासारखें गजबजलेले होतें. मोरोपंतासारखा प्रेमळ, सात्त्विक व साधु वृत्तीचा पुरुष कुटुंबाचा नेता असल्यावर त्या घरांत शांति व सौख्य नांदत असतील यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

मोरोपंत रामभक्त होते. अहमदनगरला एक वयोवृद्ध रामभक्त होता. त्याला मूलबाळ नसल्यानें आपल्या मागें रामाची पूजा अर्चा कशी होईल ह्याची त्याला मोठी काळजी वाटत होती. त्याच्या स्वप्नांत येऊन रामप्रभूनें माझा भक्त बारामतींत मोरोपंत पराडकर म्हणून आहे, त्याच्या स्वाधीन मला कर असें सांगितलें. त्या वृद्धानें आपणांजवळील रामपंचायतन बारामतीस येऊन मोरोपंतांच्या स्वाधीन केलें तेव्हांपासून मोरोपंत निष्ठावंत रामभक्त झाले. ते जसे भगवद्भक्त होते तसे ते कर्मनिष्ठहि होते.

पंतांच्या हयातींतच पंतांच्या आर्यांचा महाराष्ट्रांत सर्वत्र प्रसार होऊं लागला होता. विठोबा दादा चातुर्मास्ये नांवाच्या एका वृद्ध गृहस्थांना पंत आपले नवे ग्रंथ नेहमीं दाखवीत. रामजोशी, विठोबा ताहराबादकर वगैरे हरदासांचीं कीर्तनें पंतांच्या आर्यांशिवाय कधीं रंगत नसत. एकदां प्रसिद्ध महाराष्ट्र शाहीर रामजोशीबुवा यांचें कीर्तन एका देवळांत चाललें होतें. तेव्हां स्वतः पंत कीर्तनास उपस्थित होते. जोशीबुवांनीं पंतांच्याच भारतांतील एका आख्यानावर कीर्तन सुरूं केलें होतें. जोशीबुवांनीं पंतांच्या एका आर्येचा एक कथानकपर आणि एक वेदान्तपर असे दोन अर्थ लावून मोठ्या धिटाईनें पंतांच्या उदराकडे बोट करून म्हटलें, ‘ माझ्या अल्पमतीप्रमाणें जे दोन अर्थ सुचले ते मीं सांगितले, पण या विशाल उदरांत आणखी किती अर्थांचा समावेश झाला असेल हें त्याचें त्यासच ठाऊक. ’

मराठ्यांच्या सरंजामशाहींतले प्रसिद्ध सरदार धनाजी जाधव ह्यांचे नातू अमरसिंह जाधव ह्यांच्यामुळें पंतांना काशीयात्रेला जाण्याची संधि मिळाली. काशीयात्रेला जाण्याची कल्पना पंतांच्या मनांत पक्की होण्यास पंतांची पत्नी रमाबाई ह्यांचा आग्रह जास्त कारण झाला. ह्या काशीयात्रेच्या वेळेस सुप्रसिद्ध ' गंगावकिली ' पंतांनीं रचिली. शिवाय ' गंगारामायण ', ' काशीरामायण, ' ' विष्णुपदवकिली ' अशीं इतरहि प्रकरणें ह्या वेळेसच लिहिलीं असावीं. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे पंतांनीं आपली कविता काशीच्या पंडितांना दाखवून त्यांजकडून मान्यता मिळविली. प्राकृत ग्रंथ-संपत्ति काशीवासस्थ पंडितांस दाखवून त्यांजकडून प्राकृत भाषेचें गौरव मोरोपंतांनीं करविलें, वास्तव त्यांचे प्राकृत भाषेवर अनंत उपकार आहेत.

पंतांनीं आमरण विद्याव्यासंग सतत चालवून भगवंताची सेवा केली. पंतांनीं आपल्या जीवननाटकाच्या शेवटच्या अंकांत ' केकावलि स्तोत्रा' चें भरतवाक्य म्हणून ह्या जगाच्या रंगभूमीचा निरोप घेतला. शके १७१६ चा चैत्र महिन्यांतील रामनवमीचा उत्सव पंतांनीं नेहमींप्रमाणें थाटानें साजरा केला. उत्सवाचें पारणें दशमीस सुटलें आणि पंतांनीं एकादशीस अंथरूण धरलें. त्यांचा ताप वाढतच गेला. त्यांना आपली अखेर समजली. मरणसमयीं कोणी भोंवतीं जमून रडारड करूं नका, उलट आनंदानें राम-नामाचा गजर चालूं द्या, असें आतेष्टांस पंतांनीं बजावलें; आणि ह्या गज-रांतच शके १७१६ च्या चैत्र १५ स मंगळवारीं हनुमज्जयंतीच्या पर्वणी-वर पंतांनीं इहलोकाची यात्रा संपविली.

पंतांचा वाङ्मयसमुद्र अथांग आहे. पंतांची एकंदर साठ हजार कविता उपलब्ध आहे. इतर कांहीं दहा पंधरा हजार कविता अजून उजेडांत आली नसावी. अशा रीतीनें पंतांनीं एकूण पाऊण लाख कविता केली असावी. महाभारत किंवा आर्याभारत हा पंतांचा सर्वश्रेष्ठ ग्रंथ होय. आपल्या ग्रंथकर्तृ-त्वाच्या पहिल्या बहरांत पंतांनीं 'कुशलवोपाख्यान', ' ब्रह्मोत्तरखंडावरील आर्या ', मदालसा व हरिश्चंद्र यांचीं आख्यानें, सीतागीत, रुक्मिणीगीत आणि

सावित्रीगीत अशांसारखीं नायकांच्या जोगतीं गाणीं वगैरे स्फुट काव्यें लिहिलीं. मोठ्या काव्यांत मंत्ररामायण अगोदर लिहिलें असावें. प्रल्हाद-विजय, कृष्णविजय हीं मोठीं काव्यें आणि संशयरत्नमाला, आर्याकेकावलि, सन्मणिमाला, नामरसायन वगैरे किरकोळ प्रकरणांवरील आर्या ही सर्व कृति भारताच्या आधींचीच आहे. अशा या लहानमोठ्या स्फुट प्रकरणावर आपली लेखणी चालवून पाहून ती आतां आपल्या मनासारखी चालते अशी पंतांच्या मनाची खात्री झाल्याबरोबर त्यांनीं पहिला जो महाग्रंथ समग्र लिहिण्याकरितां हातीं घेतला तो महाभारत हा होय. कृष्णामाहात्म्य, व्यंकटेश-स्तोत्र, दुर्गादेवीस्तव, विनायक-माहात्म्य, दत्तदयोदय, सन्मनोरथ-राजि, प्रश्नोत्तरमाला, पतिव्रता—कीर्तन, गुरुस्तुति अशीं अनेक स्तोत्रें त्यांनीं रचिलीं. निरोष्ठ-रामायण, परंतु-रामायण अशीं त्यांचीं अष्टोत्तरशत रामायणें प्रसिद्ध आहेत. मंत्ररामायणाप्रमाणें पंतांचा मंत्रभागवत हा ग्रंथहि प्रसिद्ध आहे. हरिवंश, गीतार्या, रामरीति व श्लोककेकावलि हीं पंतांचीं अखेरचीं काव्यें असावीत.

पंतांच्या मंत्ररामायणांत ‘ श्रीराम जयराम जयजयराम ’ हा मंत्र अनुस्यूत केला आहे. त्याचप्रमाणें भागवतांत ‘ ॐ नमो भगवते वासु-देवाय ’ हा मंत्र पंतांनीं गोवून दाखविला आहे. त्याचप्रमाणें निरोष्ठ-रामायणांत पवर्गांतील वर्ण येऊं न देण्याची आटोकाट खटपट त्यांनीं केली आहे, तर परंतु-रामायणांत ‘ परंतु ’ चा उपयोग वारंवार केला आहे. यमकाच्या हव्यासानें जरी क्वचित् काव्याला कृत्रिमता आली असली तरी त्यामागील परिश्रमाचें कौतुकच करावेंसें वाटतें. उदा०——

‘ अनलसमीहित साधी राया ! वारा महीवरा ! कामा ।
अनलस मीहि तसा धीरा यावा रामही वराका मा ।। ’

त्याचप्रमाणें पंतांचें अनुप्रास—प्रेमहि विलक्षण आहे. उदा—

‘ देवि ! दयावति ! दवाडिसि दासाची दुःखदुर्दशा दूर । ’

संस्कृतप्रचुर भाषा वापरण्याचें पंतांचें प्रेम कधीं कधीं इतक्या पराकोटीला जातें कीं ते प्रसंगीं सबंध ओळच्या ओळ संस्कृतमध्यें लिहितात.

‘ ब्रूयात्क्षमी गभीरोऽसीति बत युधिष्ठिरं प्रभुं को न ।
निज नीचपण प्रकटिसि तूं श्वान भल्यावरीहि भुंकोन । ’

ह्या भारतांतील आर्येतील पहिली सबंध ओळ संस्कृतांत आहे. त्याचप्रमाणें—

‘ कृतान्तकटकामलध्वजजरा दिसों लागली;
पुरःसरगदांसवें झगडतां तनू भागली. ’

ह्या श्लोककेकावलींतील ओळीप्रमाणें लांबलचक समासाची योजनाहि पंत फार करतात. त्यामुळें काव्याला क्लिष्टता येते.

मोरोपंतांच्या काव्याबद्दल वादाचीं रणें आतांपर्यंत बहुत माजलीं आहेत. मोरोपंत हे कवीच नव्हेत इथपासून ते मोरोपंतासारखा महाकवि अजून महाराष्ट्रांत झाला नाहीं असें म्हणण्यापर्यंत निरनिराळ्या पंडितांची मजल गेली आहे. कै. कृष्णशास्त्री चिपळूणकर, कै. राजवाडे, डॉ. सहस्रबुद्धे इत्यादि विद्वानांनीं मोरोपंत हे कवीच नव्हत असा दावा मांडला. तर मोरोपंत हे सर्वश्रेष्ठ महाकवि होत अशी गर्जना कै. विष्णुशास्त्री व कै. पांगारकर ह्यांनीं ठोकली. प्रा. बनहट्टींनीं समतोल बुद्धीनें मोरोपंतांच्या काव्याचें समालोचन केलें आहे.

पंतांच्या काव्यांतील गुणांच्या मानानें दोषस्थळें फारच थोडीं आहेत. आणि म्हणूनच आज शेंदीडशें वर्षें मोरोपंतांचें काव्य शिरोधार्य मानलें जात आहे. मोरोपंतांच्या कवितेंत आढळणारा पहिला मोठा गुण म्हटला म्हणजे हा होय कीं त्यांनीं भाषेच्या शुद्धीकडे अत्यंत लक्ष दिलेलें आढळतें. ही गोष्ट पूर्वीच्या महाराष्ट्र-कवींत दिसून येत नाहीं. पंतांनीं महाराष्ट्र-कवितेस व्याकरणशुद्धतेचें पुरतें वळण लावून तिचें स्वरूप विशेष उज्ज्वल केलें आहे. मोरोपंतांच्या कवितेचा दुसरा गुण म्हणजे तिची प्रौढ रचना होय. अर्थदृष्ट्याहि पंतांचें काव्य प्रौढ व रसभरित असें आढळतें.

'प्रसन्नता व माधुर्य हेंच पंतांच्या काव्याचें स्वरूप आहे. पंतांचें अंतःकरण तन्मय होऊन त्यांच्या वाणीचा ओघ सहज रीतीनें वाहूं लागला म्हणजे तो प्रेमळ, उदात्त, गंभीर व प्रसन्न असाच असतो,' असें वनहट्टी म्हणतात.

संवादचातुर्य हा एक पंतकाव्यांचा लक्षांत ठेवण्यासारखा विशेष आहे. त्यांच्या काव्यांत वर्णन केलेल्या भूमिकांचीं संभाषणें नेहमींच अत्यंत उचित, जोरदार व समर्पक असतात. संभाषणांच्या बाबतींतलें पंतांचें चातुर्य केवळ अप्रतिम आहे. त्यांचें कृष्णकर्ण-संवाद, कर्णशल्य-संवाद, रुक्मिणीनारद-संवाद, कृष्णरुक्मिणी-संवाद मराठी वाङ्मयांत अगदीं अग्रस्थान पटकावून बसले आहेत. उदा.—

'हरिच्या पुनः पुन्हा कां काड्या नाकांत घालिसी शशका ।
यश काय पक्षिपतिचें येइल हें चार करूनि तुज मशका ॥'
'रक्षावा धर्म असा करिसी उपदेश तरि असे मान्य ।
रक्षितसों धर्मातें, आम्हांला धर्म ठाउका नान्य ॥'

ह्या भारतांतील आर्या पंतांच्या संभाषणचातुर्याची चुणुक दाखवितात. किंवा—

'तेव्हां गेला होता कोठें राधासुता तुझा धर्म'

ही ओळ तर सुभाषितासारखीच होऊन बसली आहे.

संवादचातुर्याप्रमाणें पंतांचें स्वभावरेखाटन आणि प्रसंगवर्णनेंहि अप्रतिम आहेत. कोणत्याहि रसाचा सहज परिपोष करणारी त्यांची वर्णनशैली आणि भाषावैभव डोळे दिपविण्याजोगें आहे.

'कुरुकटकासि पहातां तो उत्तर-बाळ फार गडबडला ।
स्वपर बळाबळ नेणुनि बालिश बहु बायकांत बडबडला ।'

हें विराटपुत्र उत्तराचें वर्णन किती मनोज्ञ आहे आणि त्याप्रमाणेंच— रुक्मिणी-हरणाच्या प्रसंगाचें पुढील वर्णन किती सुंदर आहे.

'हंसें मुक्ता नेली मग केला कलकलाट काकांनीं ।
हाकांनीं नभ भरलें जाय सुरांच्याहि नाद तो कानीं ॥'

कै. पांगारकर पंतांची भूमिका भगवद्भक्ताचीच मानतात. त्याप्रमाणें खरोखरच पंतांची प्रार्थनापर जी कविता आहे तींत त्यांचें अंतःकरण अधिक उत्कटपणें व्यक्त झालेलें दिसतें. विविध स्तोत्रें, संशयरत्नमाला, केकावलि ह्या कवितेंतील त्यांच्या कल्पनावैभवापेक्षांहि भावनेची मोहकता अधिक मोहक आहे.

'कीं मागें गुप्त उभा अससी प्रेमें उभारुनी बाहे ।
तरि काय बाळकाचे तूं सादर बोल ऐकसी बा हे ॥'

ह्या संशयरत्नमालेंतील आर्येतील परमेश्वरभेटीबद्दलची पंतांची श्रद्धा उल्लेखनीय आहे.

ह्या श्रेष्ठ रामभक्त पंडितकवींच्या काव्यरत्नाकरांत अशीं किती तरी अमोघ रत्नें आहेत. आणि म्हणूनच पंत हे महाराष्ट्र-पंडितकवींत अग्रगण्य आहेत.

• • •

# रामजोशी



उत्तर–पेशवाईचा काळ म्हणजे वैभव आणि ऐषआराम ह्यांच्या झगझगाटानें भारलेला मराठेशाहीच्या उन्मादाचा काळ होता. विलासाच्या विविधतेला सरदार लालचावलेले होते. अशा इष्काच्या राजवटीला सवाई माधवराव, रावबाजी ह्यांसारख्या शेवटच्या राजकर्त्यांनींहि हातभार लावला, त्यामुळें नृत्यगायनाच्या कलेला ह्या काळांत बहर आला. आणि म्हणूनच शाहिरांच्या लावण्या, त्यांचे पोवाडे डफतुणतुण्यांच्या साथीनें महाराष्ट्रांत ह्या काळांत घुमूं लागले. ही नव्या कलेच्या डफावरची पहिली थाप लोकशाहीर रामजोशी सोलापूरकर ह्यांनीं दिली. त्यानंतर अनंतफंदी, होनाजी बाळा, सगनभाऊ, परशुराम, प्रभाकर ही शाहिरांची प्रभावळ महाराष्ट्रांत चमकली. पण ह्या शाहीरमंडळाचा उस्ताद म्हणून जर इतिहास कुणाकडे अंगुलिनिर्देश करीत असेल तर तो लोकशाहीर रामजोशी सोलापूरकर ह्यांच्याकडेच.

रामजोशी यांचे पूर्वज धोंडभट यांस मुसलमानांपासून सोलापूरची जोशीपणाची वृत्ति मिळाली होती. त्यांच्या वंशांतील जगन्नाथपंत जोशी हे रामजोशी ह्यांचे वडील. जगन्नाथपंत ह्यांना मुद्गलभट व राम असे दोन मुलगे झाले. आपले चरित्रनायक रामजोशी ह्यांचा जन्म शके १६८४ ( इ. स. १७६१ ) मध्यें झाला. मुद्गलभट हे मोठे व्युत्पन्न-शास्त्री होते. त्यांनीं ‘ यदुवंश ’ नांवाचें संस्कृत भाषेंत काव्य लिहिलें होतें. वडिलांचा काळ लवकर झाल्यामुळें रामचें संगोपन मुद्गलभट ह्यांनींच केलें. घराण्याच्या जोशीवृत्तीला अनुलक्षून रामनें शास्त्राध्ययन करावें व ब्राह्मणधर्मानें वागावें असें मुद्गलभटांना वाटे. परंतु मुलाचे पाय पाळण्यांतून दिसल्याखेरीज थोडेच राहतात. धोंडी शाहिराच्या नादानें तमाशाला जावें, त्याला तमाशासाठीं कधीं त्याच्या नांवानें कधीं बिननांवीं लावण्या करून द्याव्यात आणि त्या स्वीकृत लावण्या सदानूकदा जिभेवर नाचत्या

ठेवाव्यात, हा रामजोशी ह्यांचा नित्यक्रम ठरून बसला होता. मुद्गलभटांनीं पंतांच्या केकावलीची प्रत करावयास सांगावी, तर जोशीबुवांनीं 'सुंदरा मनामधिं भरली' सारख्या लावणीच्या प्रती कराव्यात. मुद्गलभटांसारख्या सनातनधर्माभिमानी शास्त्र्यांना रामजोशी ह्यांच्या प्रतिभेचा हा स्वैराचार खपेना. त्यांनीं रामजोशी ह्यांना वयाच्या अठराव्या वर्षी घराबाहेर काढलें.

चार भिंतींच्या तुरुंगांतून सुटल्यावर जोशीबुवांची नवनवोन्मेष-शालिनी प्रतिभा गगनभराऱ्या मारूं लागली. त्यांचें नवें जीवन आतां सुरूं झालें. घरांतून बाहेर पडल्यावर तुळजापुरीं त्यांनीं एक वर्ष वास्तव्य केलें. तेथें देवीचा दृष्टान्त झाला. नंतर पंढरपुरास जाऊन व दोन वर्षे तेथें राहून बाबा पाध्ये ह्यांच्याजवळ रामजोशींनीं काव्यशास्त्र व व्याकरणशास्त्र विषयांचें अध्ययन केलें. बाबा पाध्यामुळेंच रामजोशी ह्यांना मोरोपंतांची थोरवी कळली व पुढें पंतांनाहि जोशीबुवांच्या अलौकिक प्रतिभेची ओळख बाबांच्याच करवीं झाली. अध्ययनाच्या बाबतींत जोशीबुवांनीं दाख-विलेली बुद्धीची तडफ पाहून बाबा पाध्ये खूष होत. पण जोशीबुवांच्या जिभेवर खेळणारी लावणीची लकेर ऐकून पाध्यांचेंहि पित्त खवळे. 'हटा-तटानें पटा रंगवुनि जटा धरिसि' ही लावणी रचणाऱ्या त्या लोकशाहिराला संस्कृत अध्ययनाची ती घटपटादि खटपट नेहमीं मानवणारी नव्हती. शेवटीं पाध्यांच्याकडेहि जोशीबुवांचें नीटसें न जमल्यामुळें जोशीबुवा कर्नाटकाकडे गेले. जोशीबुवांना बुद्धीची अलौकिक देणगी लाभली होती. कर्नाटकांत राहून त्यांनीं संस्कृताचें अगदीं पूर्ण अध्ययन केलें. अध्ययन पूर्ण झाल्यावर ते पंढरपुरीं पाध्यांच्याकडे परत आले. पाध्यांनीं जरी जोशी-बुवांना हांकलून दिलेलें होतें तरी त्यांचा पाध्यांविषयींचा आदर कमी झाला नव्हता. ते पाध्यांच्या घरीं एका कानडी विद्वान् ब्राह्मणाचा वेष घेऊन गेले व जेवण होईपर्यंत एकसारखें बाबांशीं अस्खलित संस्कृतमध्यें संभाषण करीत राहिले. जेवण झाल्यानंतर जोशीबुवांनीं आपलें खरें स्वरूप उघड करून बाबांच्या चरणीं मस्तक ठेवलें. शिष्याच्या ठायीं पराक्रम

आणि नम्रता ह्यांचा संगम झालेला पाहून जोशीबुवांनीं आपणांस फसविल्याबद्दल झालेला बाबांचा राग फार वेळ टिकला नाहीं. अशाच रीतीनें सोलापुरीं जाऊन बंधूंच्या आजारांत उत्तम प्रवचन करून रामजोशी ह्यांनीं त्यांचाहि राग शांत केला.

ह्यानंतर मात्र जोशीबुवांनीं आपल्या प्रतिभेचा काव्यरचनेसाठीं सरांस उपयोग करण्यास सुरवात केली. धोंडी शाहीर, चिमाबाई, बयाबाई ह्यांच्या समवेत जोशीबुवांचा तमाशाचा फड महाराष्ट्र गाजवूं लागला. महाराष्ट्रानेंहि ह्या कलावंतांचें कोडकौतुक कांहीं कमी केलें नाहीं. रामजोशी हे वृत्तीनें रंगेल होते. व्यवहार आणि कला ह्यांचें कधींच जमत नाहीं हें त्रिकालाबाधित सत्य जोशीबुवांच्या जीवनांत शंभर टक्के खरें झालेलें दिसतें. त्यांच्या मोहक रसवंतीनें त्यांना खोऱ्यानें ओढण्यासारखा पैसा दिला तरी त्यांच्या उधळेपणानें त्यांना नेहमीं सावकाराच्या पकडींत ठेवलें. 'रामजोशी यांची चिमा नायकीण ' त्यांचा रेशमी काढण्याचा झोपाळा, घोडा, कुत्रीं, माकडें, राघू वगैरे पशुपक्ष्यांचा समुदाय, तमाशाप्रिय विषयासक्त अनुयायांच्या झुंडी, यांचें वर्णन येथें करावयाचें कारण नाहीं. जोशीबुवा शाक्त होते एवढें सांगितलें म्हणजे कांहीं निराळें सांगायला नको. ' असें त्यांच्या मदिर–जीवनाचें शब्दचित्र कै. ह. भ. प. पांगारकर ह्यांनीं रेखाटलें आहे. सवाई माधवरावांच्या कारकिर्दींत पुणें दरबारीं रंगपंचमीच्या दिवशीं त्यांना मानाचा शिरपेंच देण्यांत आला. ह्या त्यांच्या रंगेल वृत्तींत मोरोपंतांनीं बदल घडवून आणला आणि लावणीकार रामजोशी कीर्तनकार रामजोशी झाले. एकदां पंढरपुरीं जोशीबुवांचें कीर्तन झालें होतें. जोशीबुवांच्या अत्याग्रहामुळें पंत कीर्तनास आले होते.परंतु नटाचें तोंड पाहूं नये अशा समजुतीनें पंत जोशीबुवाकडे पाठ करून कीर्तनास बसले. जोशीबुवांची गाणीं रसाळ, वक्तृत्व तेजाळ आणि त्याला त्यांनीं दिलेला वैराग्यपर लावण्यांचा मेळ ह्यामुळें कीर्तन चांगलेंच रंगलें. कीर्तनाचा रंग इतका चढत्या कमानीला चढला कीं ' वाहवा वाहवा ' म्हणत पंत धावत आले

आणि जोशीबुवांना कडकडून भेटले. अशी प्रभावी रसना तमाशापायीं खर्च करून लोकांना कुमार्गाला लावण्यापेक्षां कीर्तनाकडे खर्च करून लोकांना सुमार्गाला लावा असा पंतांनीं जोशीबुवांना उपदेश केला. ती मयूरवाणी शिरोधार्य मानून जोशीबुवांनीं तेव्हांपासून तमाशाचा डफ कायमचा टाकला.

जोशीबुवांच्या वाणींत कांहीं विलक्षण सामर्थ्य होतें. त्यांचें वक्तृत्व, त्यांची कवित्वस्फूर्ति, त्यांचें चातुर्य व त्यांची समयसूचकता, त्यांची रसिकता व गुणलुब्धता, हे गुण खरोखर अवर्णनीय आहेत. पेशवे-दरबारीं त्यांना अभिनव कालिदास अशी पदवी मिळाली होती. नीळकंठशास्त्री थत्ते ह्यांनीं त्यांचा मोठा सत्कार केला होता. त्यांच्या मोहक रसवंतीविषयीं बऱ्याच आख्यायिका उपलब्ध आहेत. उधळेपणाच्या वृत्तीमुळें जोशीबोवा नेहमींच कर्जबाजारी असत. एकदां त्यांचे एक सावकार त्यांच्या कीर्तनास उपस्थित होते. हरदासाचें कथननैपुण्य पाहून ते सावकार इतके खूष झाले कीं त्या आनंदाच्या भरांत जोशीबुवांच्या नांवें असलेले पांच हजारांचे कर्जरोखे त्यांनीं फाडून टाकले. जोशीबुवा ब्राह्मण असून तमाशासारखा हीन व्यवसाय करतात असें पाहून त्यांना वाळींत टाकण्यासाठीं रागावून आलेले श्री. शंकराचार्य त्यांच्या वैराग्यपर लावण्या ऐकून हसत परत गेले. वीर, शृंगार, करुण इत्यादि रसांची निर्मिति ते आपल्या कीर्तनांत अति सहजतेनें करीत असत. पेशव्यांचे सेनासागर परशुरामभाऊ पटवर्धन एकदां कीर्तनास उपस्थित होते. तेव्हां बुवांनीं महाभारतांतील कर्णार्जुन-युद्धाचें आख्यान लावलें होतें. कर्णाची उदात्तता, अर्जुनाचें शौर्य आणि श्रीकृष्णाचें चातुर्य ह्यांच्या वर्णनांनीं कीर्तनाची तिरंगी मौज वाढत होती. धरित्रीनें कर्णाच्या रथाचें चाक गिळिलें होतें. श्रीकृष्णानें अर्जुनाला इषारा दिला. 'सोड बाण, हीच संधि आहे.' ताबडतोब कर्ण संतापानें ओरडला, 'हें अधर्मयुद्ध आहे.' जोशीबुवांनीं उच्चारलेले हे शब्द भाऊंच्या अंतरीं जाऊन आदळले आणि भाऊ अस्तन्या सावरीतच उठून गरजले,

' कोण माझ्या समोर अधर्मयुद्ध करतो आहे ? ' तेव्हां शेजारीं बसलेल्या कारभाऱ्यानें हळूच कानांत सांगितलें, ' हा कीर्तनांतील प्रसंग आहे. '

जोशीबुवांनीं पंतांच्या आर्यांचा दांडगा अभ्यास केला होता. कीर्तनांत पंतांच्या आर्या म्हणावयाची प्रथा जोशीबुवांनींच सुरू केली होती. पंत स्वतःच जोशीबुवांना म्हणाले होते, ' मी ह्या आर्यांचा एवढा खटाटोप तुम्हां कीर्तनकारांसाठींच करीत आहे. ' पंतांच्या आर्यांनीं जोशीबुवा जितके पावन झाले तितके दुसरे कुणी झाले नाहींत. पंतांनीं आपली आर्यारूपी कन्या मलाच दिली असें जोशीबुवा मोठ्या अभिमानानें एका आर्येत सांगतात. ती आर्या पुढीलप्रमाणें—

' जैसी जनकें दिधली सच्चिद्घन राम जो सिता त्याला।
तैसी मयुरें दिधली स्वार्या ती रामजोसि तात्याला ॥ '

ह्यांतील आणि पुढील एका आर्येतील यमकचातुर्य पाहिलें म्हणजे पंतांचें आर्यारचना–कौशल्य जोशीबुवांनीं किती हुबेहूब उचललें होतें हें दिसून येतें. एकदां इचलकरंजीकर घोरपड्यांच्या इथें जोशीबुवांचें कीर्तन उभें होतें. जोशीबुवांची बिदागी जरा जास्तच असे, तेव्हां त्याबद्दल खाशामंडळींत जरा कुजबुज चालू झाली होती. ती जोशीबुवांच्या कानावर येतांच त्यांनीं समयसूचकतेनें तेथल्या तेथेंच पुढील आर्या रचून म्हणूनहि दाखविली.

' भोजासम कविताप्रिय कर्णापरि दानशूर घोरपडे ।
ऐसे असतां माझ्या देणगिचा कां तुम्हांस घोर पडे ॥ '

पंतांच्या आर्या जोशीबुवा नेहमीं कथेंत म्हणत. पंतांच्या आर्यांना विविध अर्थ असत. आणि त्या अर्थांचे निरनिराळे पैलू शोधून काढण्यांत कीर्तनकारांना मोठा अभिमान वाटे. एकदां पंत स्वतः जोशीबुवांच्या कीर्तनास हजर होते. तेव्हां जोशीबुवांनीं पंतांचीच एक आर्या निरूपणास घेतली होती. त्या आर्येचा एक वेदान्तपर व एक आख्यानाला धरून असलेला असे दोन अर्थ सांगितल्यावर जोशीबुवा पंतांच्या तुंदिलतनूकडे

हात करून म्हणाले, ‘ माझ्या अल्पमतीला सुचले ते दोन अर्थ मीं आपणांस सांगितले; परंतु ह्या विशाल उदरांत अजून किती अर्थ सामावला आहे कुणास ठाऊक ?

जोशीबुवांना पन्नाशी उलटल्यावर काशीयात्रेस जाण्याची इच्छा झाली. त्या इच्छेप्रमाणें त्यांनीं पुण्याला येऊन दोन दिवस परडी फिरविली. दोन दिवसांत १५००० रुपये बिदागी जमली. ह्यावरून जोशीबुवांची लोकप्रियता किती असामान्य होती हें दिसून येतें. लोकांनीं काशीयात्रेला जाण्यासाठीं त्यांना पंधरा हजारांची थैली बांधून दिली, परंतु जोशीबुवांच्या विलासी मित्रांनीं ती रिकामी केली. जोशीबुवांची काशीयात्रेला जाण्याची इच्छा पूर्ण झाली नाहीं. ते ह्याच वेळेस शके १७३४ ( इ. स. १८१२) मध्यें पुण्यास मृत्यु पावले.

शाहिरांचा, लावणीकारांचा उस्ताद म्हणून जरी रामजोशी ओळखले जात असले तरी त्यांचें वाङ्मय मात्र फारसें उपलब्ध नाहीं. शृंगारपर लावण्या, वैराग्यपर लावण्या, आर्या, ऐतिहासिक लावण्या अशी चतुर्विध वाङ्मयनिर्मिति जोशीबुवांनीं केली आहे. त्यांची रचनेची हातोटी फार सरस असून काव्यांतील प्रसाद हा गुण मोठा श्रेष्ठ दर्जाचा आहे. ते व्युत्पन्नपंडित असल्यामुळें छेकापह्नुति, कूटें, कोडीं वगैरे रचनेची आतषबाजी दाखविणारी काव्यरचनाहि त्यांनीं केली आहे. सुब्रावबाबांच्या मठासमोर म्हटलेलीं

‘ हटातटानें पटा रंगवुनि जटा धरिसि कां शिरीं ।
मठाची उठाठेव कां करी ॥ ’

ही लावणी त्यांचें अनुप्रास–कौशल्य आणि त्यांच्या वाणीचा आवेश दाखविते.

‘ कोण्या ग सुभगाची मदनमंजरी । सांग सखे सुंदरी ॥ ’ ह्या लावणींतील शृंगार त्यांची प्रतिभा जितक्या मोहकतेने रंगविते, तितक्याच

मोहकतेनें ' नरजन्मामधिं नरा करुनि घे नरनारायण गडी । तरी सार्थक मानवकुडी ॥ '

ह्या लावणींतील वैराग्य फुलविते.

' ब्राह्मणी राज्य जोरदार घोड्यावर स्वार होते शिपाई ।
जबर सदि कैकांनिं पाहिली शत्रु ठेविले नाहीं ॥ '

असें ते सवाईमाधवरावांच्या ब्राह्मणीराज्याचें वर्णन करतात.

जोशीबुवांची लावणीची रचना अतिशय सफाईची असल्यामुळें त्यांच्या लावण्यांतील कांहीं चरण सुभाषितांसारखे बनले आहेत.

उदा० —' घालुनी गळ्यामधिं तुळशीचीं लाकडें । हीं काय भवाला
दुरि करतिल माकडें ॥

' वित्त पाहतां पित्त येतसे चित्त पाहिजे मला ।
असें हरि म्हणतो नुमजे तुला ॥ '

' कितीक येती कितीक जाती थिरटी होते काळाची ॥ '

छेकापह्नुति तर रामजोशांचीच म्हणून ओळखली जाते.

' अंबरगत परि पयोधरातें रगडुनि पळतो दुरी । '

' तो नंदाचा मूल काय गे ? छे मारुत मेघोदरीं ॥ '

ही जोशीबुवांची छेकापह्नुति दिल्याखेरीज अलंकारावरचें कोणतेंहि पुस्तक पूर्ण झालेलें नाहीं.

● ● ●

# अनंतफंदी

रावबाजींची अमदानी चालू होती. पेशवाईच्या सरत्या बहराचे दिवस ते. विझता दिवा मोठा होतो त्याप्रमाणें पेशवाईच्या वैभवाचा विलासी झगझगाट सगळीकडे भरून राहिला होता. नानाफडणिसांची उंच मान खालीं झाली होती आणि माणकेश्वरांचा कारभार चालू झाला होता. अशा त्या काळची एक गोष्ट—

नानाफडणविसांनीं बांधलेल्या बेलबागेंत एका प्रसिद्ध हरिदासाचें हरि-कीर्तन चाललें होतें. कीर्तनाला चांगलाच रंग भरला होता. इतक्यांत पेशव्यांचे कारभारी माणकेश्वर देवदर्शनास आले. सर्वांनीं उठून खडी ताजीम दिली. देवदर्शन झाल्यावर कीर्तनश्रवणाचा लाभ घ्यावा म्हणून माणकेश्वर मानाच्या ठिकाणीं लोडाला टेकून बसले. खालीं बसतां बसतां त्यांची आणि कीर्तनकाराची नजरभेट झाली आणि नजरेनें नजर ओळखली. माणकेश्वर आपलें नाक सहज उडवीत जरा आसमंतात् खवचट नजर टाकीत हरदासाला म्हणाले, '.डफ तुणतुणें टाकून हा तंबोरा कधीं घेतला !' हरदासहि कांहीं कमी नव्हता. त्यानें आपल्या हास्यावर विनयाचें पांघरूण टाकून उत्तर दिलें, 'आपण तंबोरा खालीं ठेवलात आणि तोच आम्हीं उचलला.' 'रामा रामा' च्या गजरांत माणकेश्वरांचें गुरगुरणें कोणास ऐकूं गेलें नाहीं.

माणकेश्वर पूर्वाश्रमीं कीर्तनकारच होते, हें सहज विनयानें सुचविणारा हरदास दुसरा तिसरा कोणी नसून महाराष्ट्राचा प्रसिद्ध शाहीर आणि लावणीकार अनंतफंदी हाच होता.

अनंतफंदी हा कवि मूळचा संगमनेरचा. संगमनेरच्या घोलप आड-नांवाच्या यजुर्वेदी ब्राह्मणघराण्यांत शके १६६६ मध्यें यांचा जन्म झाला. त्यांच्या आईचें नांव राऊबाई असें होतें. लहानपणीं हा अनंतफंदी अत्यंत उनाड होता. वडिलांचें छत्र बालपणींच नाहींसें झाल्यामुळें

अनंताच्या शिक्षणाकडे कोणीं विशेष लक्ष दिलें नाहीं. नेहमीं रानावनांत हिंडावें, चिंचा बोरें पाडावींत, नदींत दिवसभर डुंबावें आणि लावण्या ऐकत रात्रीच्या रात्री जागून काढाव्या, असा त्यांचा क्रम ठरलेला असे. राऊबाई बिचारी ह्या उनाड अंतूला बोलून बोलून दमली. अशीच एक दिवस ती त्याला बरेंच रागें भरली, तेव्हां हे बुवा जे रुसून निघून गेले ते भवानीबुवा नांवाच्या एका महंताच्या मठांत जाऊन झोपले. आई त्यांना शोधीत शोधीत मठापाशीं आली. पाहते तों मठांत अनंतराव झोपलेले. तिनें त्यांना घरीं जाण्याविषयीं पुष्कळ विनविलें, पण मुलगा ऐकेना. इतक्यांत भवानीबुवा मठांत आले. त्यांना पाहतांच राऊबाईंनीं अनंतरावांचे गुण त्या बुवांना सांगितले व त्यांना कांहीं सुधारण्याचा मार्ग सांगा असें विनविलें. ह्या भवानीबुवांबद्दल बऱ्याच आख्यायिका प्रचलित होत्या. ते ज्या कोणाशीं तिरसटपणें वागत त्यांच्यावर त्यांचा कृपाप्रसाद झाला असें लोक समजत. राऊबाईचें बोलणें ऐकल्यावर ह्या भवानीबुवांनीं अनंतावर एक दगड भिरकाविला व त्याला जाण्यास सांगितलें. अनंत आईबरोबर घरीं गेला तो लावणी गुणगुणतच. आई म्हणाली, 'कुठली रे लावणी गुणगुणतोस भरल्या घरांत ?' 'कुठली कसली ? मींच केली आतां.' अनंत म्हणाला. ह्या वेळेपासून अनंत लावण्या करूं लागला. त्याला भवानीबोवापासून कवित्वस्फूर्ति मिळाली असें मानण्यांत येतें.

दिवसभर निरनिराळ्या विषयांवर लावण्या, पोवाडे रचावेत आणि रात्रीं आसपासच्या गांवांतील एखाद्या तमाशाच्या फडास हजर रहावें हाच अनंताचा दिनक्रम ठरला होता. त्या वेळीं मलकफंदी नांवाचा एक मुसलमान अवलिया आपल्या बेछूट वर्तनानें प्रसिद्धीस आला होता. तशीच अनंताची वागणूक असल्यामुळें सर्व लोक त्याला अनंत घोलप असें म्हणण्याऐवजीं अनंतफंदी असें म्हणूं लागले. शेवटीं रतनफंदी, मलकफंदी व राघवफंदी असे साथीदार अनंतफंदीनें गोळा केले व

तमाशाच्या डफावर थाप दिली. महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यांत ही थाप चांगलीच घुमली. जेथें तेथें त्यांच्या तमाशाच्या कड्याभोंवतीं रसिक लोकांचें कडे जमूं लागलें. पुणें दरबारांतहि त्यांच्या डफाची थाप ऐकूं गेली. दरबारनें अनंतफंदींच्या कलेचें चांगलेंच कोडकौतुक केलें. अशी मुलुखगिरी करीत अनंतफंदींचा तमाशा एकदां होळकरशाहींत गेला.

होळकरशाहींत कै. साध्वी अहिल्याबाई यांची राजवट चालू होती. कोणाहि कलावंताची कला आपल्या राजवटींतून रिकाम्या हातीं जाऊं नये म्हणून अहिल्याबाईंनीं अनंतफंदींच्या तमाशाचें दरबारीं स्वागत करावयाचें ठरविलें. फंदींच्या कवनाचा बहर पाहून मातुश्री अहिल्यादेवी संतुष्ट झाल्या. पण असें उत्कृष्ट कवित्व तमाशाच्या कारणीं खर्ची पडावें याचें त्यांना वैषम्य वाटलं. तमाशा झाल्यावर त्यांनीं अनंतफंदींना खाशा बैठकींत बोलावून घेतलें व सांगितलें, ' तुम्ही ब्राह्मण असून आपलें थोर कवित्व तमाशासारख्या व्यवसायाच्या कारणीं लावतां हें आमच्या मनास येत नाहीं. परमेश्वरानें दिलेली ही वाक्चातुरी त्याच्याच गुणगायनांत खर्च करावी व लोकोद्धार करावा. ' अहिल्यादेवींचें म्हणणें अनंतफंदीस रुचलें व त्यांनीं डफ टाकून हातीं चिपळ्या घेतल्या.

एकदां संगमनेरीं अनंतस्वामी नांवाच्या साधूंची पुण्यतिथि होती. गांवच्या पाटलानें पुण्यतिथीनिमित्त तमाशा करण्याचा आग्रह अनंतफंदींना केला. नाइलाजानें टाकलेला डफ अनंतफंदींना पुन्हां हातीं घ्यावा लागला. डफावरची थाप चांगलीच रंगली. तमाशा चालू असतां जवळूनच अहिल्यादेवींची स्वारी लवाजम्यासहित पुण्यास चालली होती. चौकशीअंतीं अनंतफंदींचा तमाशा उभा आहे हें कळतांच अहिल्यादेवींना फार राग आला. त्या फंदींना कांहींतरी कडक शासन करण्यासाठीं तमाशाकडे वाटचाल करूं लागल्या. आपणांस शासन करण्यासाठीं अहिल्यादेवी येत आहेत हें फंदींना तात्बडतोब कळलें. त्यांनीं लगेच आपल्या साथीदारांना घालवून दिलें व तमाशाच्या फडाचें रूपांतर कीर्तनाच्या बैठकींत केलें. संतापलेल्या

अहिल्यादेवी येऊन पाहतात तों ' हरि तुझि मुरली घरघेणी ' ह्या मध्व-नाथांच्या पदावर कीर्तन चाललेलें होतें. कृष्णकथेसारखी गोड कथा आणि फंदींची रसाळ वाणी, मग काय रंग भरल्याशिवाय थोडाच राहणार ? अनंत-फंदींचें हें पहिलें वहिलें कीर्तन चांगलेंच रंगलें. साध्वी अहिल्यादेवींनीं संतुष्ट होऊन अनंतफंदींना बहुमोल वस्त्रें, द्रव्य देऊन त्यांचा सन्मान केला. ह्या प्रसंगानंतर मात्र अनंतफंदींनीं तमाशा कधींच केला नाहीं. हातीं तंबोरा घेऊन भगवद्भजनीं त्यांनीं वाक्संपदा खर्च केली. म्हणूनच माणके-श्वर त्यांना म्हणाले होते ' हें कधीं घेतलेंत ? '

अनंतफंदी हे पेशवाईतील एक नामांकित कवि होते. मोरोपंत, शिव-दिनकेसरी, रामजोशी व होनाजी बाळा हे कवि अनंतफंदींचे समकालीन होत. त्यांच्या काव्यावरून त्यांचें मराठी व उर्दू या दोन भाषांचें चांगलें अध्ययन झालें होतें असें दिसतें. त्यांची तारुण्यांतील कविता बहुतेक शृंगारयुक्त अशी आहे. त्यांनीं आपल्या आयुष्याचा उत्तर--भाग कीर्तन करण्यांत घालविला. उत्तम वक्तृत्व व उत्तम प्रतिभा यांची देणगी त्यांना लाभली असल्यामुळें सर्व महाराष्ट्रभर ते उत्तम कीर्तनकार म्हणून प्रसिद्धीस आले. फंदींचे समकालीन कवि होनाजी बाळा यांनीं केलेल्या पुढील लावणी-वरून, तत्कालीन कीर्तनकारांत फंदींची योग्यता केवढी मोठी होती हें लक्षांत येईल—

' फंदी अनंत कवनाचा सागर अजिंक्य ज्याचा हातखंडा ।
चमत्कार चहुंकडे चालतो सृष्टीवर ज्याचा झेंडा ' ॥
' समोर गातां कुणी टिकेना मनामधीं बसली कर्की ।
धन ज्याचा हातचा मळ केवळ तो रुपयांचा हंडा ॥ '

ह्या उल्लेखावरून अनंतफंदींची श्रेष्ठता लक्षात येण्यासारखी आहे. ह्या त्यांच्या गुणांचें चीज पेशवाईत झाल्याशिवाय राहिलें नाहीं. त्यांना पेशव्यां-कडून होणाऱ्या प्राप्तीमुळें दुसरा व्यवसाय करण्याची जरूरी कधीं पडली

नाहीं. अनंतफंदींचें शीघ्रकवित्व व रसाळ रचना ह्यांबद्दल पुढील आख्यायिका प्रसिद्ध आहे. ते एकदां माळव्यांतून दक्षिणेंत येत असतां सातपुड्याच्या जंगलांत भिल्लांकडून लुटले गेले. अनंतफंदींनीं ताबडतोब कडें सावरून त्या भिल्ल टोळीच्या नायकावरून एक सुंदर लावणी रचून म्हणून दाखविली. त्या लावणीनें ते दरवडेखोर इतके खूष झाले कीं त्यांनीं अनंतफंदींचें लुटलेलें द्रव्य तर त्यांना परत दिलेंच, पण बिदागीदाखल आपणांजवळचें पुष्कळ द्रव्य त्यांनीं फंदींना दिलें.

पोवाडे, लावण्या अशी बरीच काव्यरचना अनंतफंदींनीं केली. उत्तरपेशवाईतील घटना समजण्याच्या दृष्टीनें अनंतफंदींच्या काव्याचें ऐतिहासिक महत्त्व बरेंच आहे. ' माधव–ग्रंथ ' नांवाचा ओवीबद्ध सहा अध्यायी ग्रंथ तर ह्या दृष्टीनें फार महत्त्वाचा आहे. सवाई माधवरावांच्या भीषण मृत्यूनंतर बाजीराव पेशवेपदीं विराजमान होईपर्यंतच्या कालांत शिंदे व परशुराम भाऊ पटवर्धन ह्यांच्यांत राजकारणाच्या कशा उलाढाली झाल्या ह्याचें साद्यंत वर्णन ह्या ग्रंथांत आहे. ' स्वस्ति श्री माधव कवन सुंदर.। संमत बाजी रघुनाथ पत्राधार । त्या पत्रावरोनि हा विस्तार । प्रथमोऽध्याय गोड ॥ ' असाच उल्लेख प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं आहे. ह्यावरून रावबाजींच्या पत्रावरून ह्या ग्रंथाची फंदींनीं रचना केलेली आहे असें दिसतें. नाना फडणविसांच्या मनांत बाजीरावाच्या धाकट्या भावास–चिमाजीस–पेशवाईपदावर बसवावें असें होतें व परशुरामभाऊंच्या साह्यानें त्यांनीं आपल्या या व्यूहाची रचनाहि त्याबरहुकूम केली होती. परंतु शिंद्यांच्या सामर्थ्यापुढें नानांना हात टेकावे लागले व बाजीरावास पेशवे म्हणून मान्यता द्यावी लागली. हा सर्व भाग अनंतफंदींनीं ह्यांत अत्यंत सरस रीतीनें वर्णिला आहे. त्यांतील भावनांचा कल्लोळ फंदींच्या कवित्वाची आपणांस ओळख पटवितात. 'एकचि जाला हलकल्लोळ । नाना पिटीत वक्षस्थळ । जीवजंतु समस्त पक्षीकूळ । शोकार्णवीं पाडियले ॥ ' असें त्यांनीं सवाई माधवरावांच्या मृत्यूनें झालेल्या शोकाचें वर्णन केलें आहे. ' टाकोनिया उत्तम

चंदन । मग कां धुंडावें बाभुळवन । हिरा टाकोनिया देदीप्यमान । मग कां गारा वेचाव्या ॥ बाजीरावाला सोडून दत्तक घेण्याच्या नानाच्या कल्पनेची निर्भर्त्सना करितांना असे किती तरी दृष्टान्त फंदींनीं दिले आहेत. 'शिंदे तुम्हांस कांहीं करणार नाहीं असें नानांस अभिवचन देणाऱ्या बाजीरावाच्या तोंडीं त्यांनीं पुढील दृष्टान्त घातला आहे. 'लोह जरी परिसावरी । आदळूनिया ताडिला जरी । तरी तो लोहाचें सुवर्णची करी । स्वभावगुण न टाकी ॥ ' बंडामुळें झालेल्या अंदाधुंदीचें वर्णनहि आतिशय हृदयद्रावक आहे. उदा० 'हरतऱ्हेचे मार द्यावे । तावुनिया तप्त तवे । मोटमोठाले नरवरी नवे । उभे करावे त्यावरी ॥ एक मस्तकीं एक तळी । चावकांनीं झळाळी । उष्णवरती तळतळी । हस्त सकळी मारावया ॥ कर्णघ्राणीं दारू भरिती । वरूनि वत्ती लाविती । तिळमात्र दया नुपजे चित्तीं । शिवाय कुरवोड्या वेगळ्या ॥ ' हें वर्णन यमपुरीचीच आठवण देतें. 'अन्नावांचून चालले प्राण । लोक जाहले निर्धन । मायांच्या गळां मिठी घालून । मुलें बाळें आक्रंदती ॥ अन्नाकरितां प्राण गेले । अधम केचें रस्त्यांत मेले । तेथें भिकारी अवतरले । त्या प्रेताला भक्षावयाला ॥ ' असा भयंकर दुष्काळ त्या बंडामुळें महाराष्ट्रांत अवतीर्ण झाला होता. हाच ग्रंथ कीर्तनांत आख्यान-रूपानें सांगतां यावा म्हणून फंदींनीं तो निरनिराळ्या वृत्तांत रचिला आहे.

माधवग्रंथाखेरीज इतर अनेक पोवाडे अनंत फंदींनीं रचिले आहेत. खर्ड्याची लढाई, शेवटल्या बाजीरावाचा पोवाडा, नाना फडनविसाचा पोवाडा, यशवंतराव होळकराचा पोवाडा, फत्तेसिंग गायकवाडाचा पोवाडा असे कांहीं पोवाडे काव्यदृष्ट्या व ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे आहेत. दुसऱ्या बाजीरावाच्या सांगण्यावरून फंदींनीं जो पोवाडा रचिला त्यांत फंदींचा स्पष्टवक्तेपणा चांगलाच दिसून येतो. त्यांनीं रावबाजींच्या कारभारावर पुढीलप्रमाणें टीका केली आहे.

'वडिलांचे हातचे चाकर । त्यांस न मिळे भाकर ।
अजागळ ते तूप साखर । चारूनि व्यर्थ पोशिलें ॥ '

द्रव्य देउनि आणिक आणिक । नवे तितके केले धनिक ।
जुन्याची तिंबुनि कणीक । राज्य आपुलें हरविलें ॥

खर्ड्याच्या लढाईवरील पोवाडा वाचून फंदींची तपशील देण्याची कमाल वाटते. सर्व सरदारांच्या गुणरूपवर्णनांतील विविधता फार रम्य आहे.

फंदींचें खरें काव्य त्यांच्या लावण्यांत प्रकट झालें आहे. फंदींच्या पंचवीस तीस लावण्या उत्तम म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या चंद्रावळीचें सौंदर्य तर सांगून समजण्यासारखें नाहीं. रसिकानें ती लावणी वाचावयासच पाहिजे. ' मंजूल शब्द जशि टाहो करिति कोयाळ । कंठांतून पिक दिसे अशी वेल्हाळ । नासीक चोंच राव्याची देह कोमळ । भर मव्वाशेर वजन चंद्रावळ ॥ ' अशा कांहीं ओळी बानगीदाखल देतां येतील. अनंतफंदींचे फटके मोठे चटकदार आहेत. ' विकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्गा सोडुं नको ॥ ' हा फटका कोणाला माहीत नाहीं ? असेच त्यांचे चारपांच उपदेशपर फटके आहेत. पोवाड्याखेरीज बाजीरावाच्या कारकिर्दीवर व दुष्काळावर फंदीच्या चारपांच लावण्या आहेत. ' जमाना आला उफराटा ' ह्या लावणींत काळ कसा बदलला आहे ह्याचें मोठें बहरदार वर्णन फंदींनीं केलें आहे. ' लेक बापाशीं लावी आनभापी । शिष्य गांजितो गुरूशीं । जावई सासूला म्हणतो तूं काशी । लवंडून देतो मातिशीं ॥' असें वर्णन फंदींनीं केलें आहे.फंदींनीं कांहीं हिंदी लावण्या केल्या आहेत. उदा० ' बारा बरसका पठा देखो अंगीं नयनपर झुरमुर डारी ॥ '

फंदींच्या पत्नीचें नांव म्हाळसाबाई असें होतें. त्यांना श्रीपतफंदी व बापूफंदी असे दोन पुत्र होते. श्रीपतफंदींचें काव्य सवाई फंदी ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. अनंतफंदी आपल्या वयाच्या ७५ व्या वर्षी शके १७४१ त मरण पावले.

• • •

सवाई माधवरावांच्या कारकिर्दीत ज्या शाहिरांचें पुणें दरबारीं कोड-कौतुक झालें त्यांत प्रभाकराला विशेष मानाचें स्थान आहे.

दातारांचें घराणें मूळचें रत्नागिरी जिल्ह्यांतील हर्णैनजीक मुरूड या गांवचें. देशांत नशीब काढण्यासाठीं कोंकणांतील जीं अनेक घराणीं इकडे आलीं त्यांत दातारांचेंहि घराणें होतें. जनार्दनपंत दातार हे नाशिक जिल्ह्यांतील गंगापूर ह्या गांवीं स्थाईक झाले होते. हे जनार्दनपंत दातार. हेच प्रभाकरपंताचे वडील. गंगापूर येथें शके १६९१ मध्यें (इ. सन १७६९) महाराष्ट्राच्या ह्या श्रेष्ठ शाहिराचा जन्म झाला. प्रभाकरपंताखेरीज जनार्दनपंतांना आणखी दोन पुत्र झाले. पण ते अल्पवयी ठरले. जनार्दन-पंतांचा कारकुनी पेशा असल्यामुळें मोडी, बालबोध लिहिणें वाचणें, जमाखर्च असें जें कारकुनीपेशाला उपयुक्त तें शिक्षण जनार्दनपंतांनीं प्रभाकरपंतांना दिलें होतें. त्या कालाला अनुसरून प्रभाकरपंतांचें लग्न बरेंच लौकर झालें होतें. पण पहिलें कुटुंब दुर्दैवानें लौकर निवर्तल्यामुळें प्रभाकरपंतांनीं दुसरें लग्न केलें. प्रभाकरपंतांचें कुटुंब मुरबाड येथील साठ्यांच्या घराण्यांतील होतें. लौकरच संसाराची जबाबदारी प्रभाकर-पंतांवर पडली. ते आपलें कुटुंब व विधवा भावजय ह्यांना घेऊन पुण्यास आले. पुणें हें राजधानीचें शहर होतें. ज्याला कुणाला नशीब काढावेंसें वाटे तो त्या वेळेस पुण्याचा रस्ता धरी. ह्याला प्रभाकरपंतहि अपवाद नव्हते. ते पुण्यास आले त्या वेळेस वयानें वीस बावीस वर्षांचे होते.

इ. स. १७९० मध्यें प्रभाकरपंत पुण्यास आले. पुण्यांत आल्यावर लौकरच त्यांना खंडेराव रास्ते यांचे पदरीं शागीर्दपेशांत कारकुनीची नोकरी मिळाली. इंग्रजांचें निशाण शनिवारवाड्यावर चढविणारे प्रसिद्ध बाळाजीपंत नातू ह्या वेळेस रास्त्यांच्याकडे शागिर्दपेशांत होते. नोकरीच्या निमित्तानें पुण्यास आलेले प्रभाकरपंत पुण्याच्या त्या वेळच्या त्या रंगेल वातावरणानें शाहीर प्रभाकर झाले. त्या काळांत पेशवाईचें वैभव कळसास

पोंचलें होतें. सवाई माधवराव नुकतेच वयांत येऊन पेशवाईची राजवट सांभाळूं लागले होते. पुणें शहर श्रीमंतीनें, स्वराज्याच्या उत्साही जोमानें, तत्कालीन विद्येच्या गौरवानें आणि ह्या सर्वांच्या आनुषंगिक ऐषआरामानें केवळ गजबजलेलें होतें. रामजोशी, अनंतफंदी ह्यांच्या कवनाच्या लहरी रोज कर्णरंध्रावर आदळत होत्या. होनाजी बाळा, सगनभाऊ ह्यांचा दाट परिचय होण्याचा योग प्रभाकरपंतांना आला होता. कलगी-तुऱ्याचे सवाल-जबाब काव्यमय अंतःकरणाचें पडदे उकलीत होते. रामजोशीसारख्या लोकशाहिराच्या पागोट्यांत प्रत्यक्ष पेशव्यांनीं खोवलेला मानाचा तुरा पाहून प्रभाकरपंतांना सरस्वतीदेवीची यथाशक्ति उपासना करण्याची स्फूर्ति झाली. गुणी माणसांच्या गुणांचें कौतुक पुण्यांत नेहमींच होत होतें. आपणही सगनभाऊ, होनाजी बाळा यांच्या तोडीचें कवन करून मानाचा तोडा मिळवावा अशी ईर्षा प्रभाकरपंतांनीं मनीं धरली. लौकरच ते पुण्यांतील नामवंत शाहीर म्हणून समजले जाऊं लागले.

प्रभाकरपंतांनीं पोवाडे, पदें, लावण्या वगैरे विपुल काव्य-रचना करून रसिकांना माना डोलविण्यास लावलें. ते स्वतः कीर्तन किंवा तमाशा करीत नसत. त्यांचे पोवाडे व लावण्या गंगु हैबती, महादबा सुतार व गंगाधर हे तमाशांत गात असत. ही सर्व मंडळी प्रभाकरपंतांच्या बैठकींतील असत. त्या मंडळींचें सुद्धां स्वतंत्र असें थोडें कवन प्रसिद्ध आहे. प्रभाकरपंत ह्यांना हिंदी व उर्दू या भाषा चांगल्या येत असाव्यात असें त्यांच्या कवनावरून वाटतें.

प्रभाकरपंत ह्यांना एक मुलगा व चार मुली झाल्या. प्रभाकरपंतांची सांपत्तिक स्थिति समाधानकारक अशी कधींच नव्हती. आरंभीं शागीर्द-पेशाच्या वेतनांत त्यांना आपल्या संसाराचा गाडा हाकावा लागत होता. क्वचित् सणावारीं बक्षिसी म्हणून रास्ते सरदारांकडून थोडेंफार द्रव्य-साहाय्य होत असे. त्यामुळें पोट उपाशी कधीं राहिलें नाहीं. पण भरल्या पोटाचा ढेकरहि त्यांनीं कधीं दिला नाहीं. त्यांचे उत्तर-वयांत त्यांना रास्ते

सरदाराकडून ऐंशी रुपयांचें वर्षासन मिळालें. त्यांचें म्हातारपण एकंदरींत बरेंच कष्टाचें गेलें, इतकें कीं,

प्रभाकर कवि भ्रमर गुंतला कर्जाच्या कमळांत ।
द्रव्यकृपेचा प्रकाश पडल्या सुटून जाइल स्वकुळांत ॥

असे आपल्या हलाखीचे त्यांनीं एका पोवाड्यांत उद्गार काढले आहेत. उत्तर वयांत मुंबई, ठाणें यांसारख्या शहरांतहि सटरफटर माणसांवर कवनें करून प्रभाकर द्रव्याची याचना करीत हिंडत असत. सवाई माधवरावांचा भरलेला ऐश्वर्यसंपन्न दरबार पाहून ज्यानें त्यावर कवन करून म्हटलें, त्याला उत्तरवयांत ठाण्याच्या कचेरीचें वर्णन करणें भाग पडावें, ज्यानें पेशव्यांचीं आणि त्यांच्या शिंदे-होळकर, गायकवाड, पटवर्धन इत्यादि सरदारांचीं वर्णनें आपल्या रसवंतीनें गाइलीं, त्याला मुंबईकडल्या पारशांचीं, सोनारांचीं आणि इतर लुंग्यासुंग्यांचीं वर्णनें करीत सुटण्याची पाळी यावी आणि वाग्देवीच्या गळ्याला दोरी बांधून दरवेशाच्या अस्वलीप्रमाणें तिला दारोदार नाचविण्याची पाळी यावी, हा दैवदुर्विलास होय !

प्रभाकरपंत गौरवर्णी, सडपातळ आणि साधारण मध्यम अशा बांध्याच होते. त्यांची प्रकृति सुदृढ आणि निकोप अशी असे. तत्कालीन प्रतिष्ठित पेशवाई थाटाची त्यांची राहणी असे. थोडीशी रंगेलपणाची झांक त्यांच्या राहणींत असे. स्वभाव अत्यंत मनमिळाऊ आणि आनंदी असल्यानें प्रभाकरपंतांच्या व्यक्तित्वाची प्रभा त्यांच्या प्रभावळीवर तावडतोब पसरे. प्रभाकरपंत शके १७६५ मध्यें (इ. स. १८४३) वयाच्या ७५ व्या वर्षी मरण पावले.

प्रभाकरपंतांची उपलब्ध कविता पदें, पोवाडे, लावण्या, अशी तीन प्रकारची आहे. पदांची संख्या ३०-३१ असून ती पौराणिक विषयावर आहे. कांहीं देवतांच्या स्तुतिपर अशीं पदें आहेत. गणपति ह्या देवतेला नमन म्हणून रचलेलीं ‘ गण ’ ह्या नांवाचीं दोन पदें आहेत. ह्या स्तुतिपर पदांतील प्रभाकरपंतांची वर्णनशैली वाखाणण्यासारखी आहे ‘ सिंदुरमर्दना विघ्नहरा हे । मति दे गजानना परशुधरा हे । संकटनाशना सिद्धिवरा हे ।

मूषकवाहनाद्वयमातुरा हे । गौरीसुता सभे लंबोदरा ये ॥ ' अशी विशेषणांची सांखळीच्या सांखळी प्रभाकरपंत गुंफितात. गणपतीप्रमाणेंच शंकर, राम इत्यादि देवतांच्या स्तुतीचीं पदें पंतांनीं रचिलीं आहेत. ' शंकर-पार्वती संवाद, ' ' लक्ष्मीपार्वती संवाद, ' ' लक्ष्मण निर्भर्त्सना ' ' मंदोदरी रावण–संवाद ' अशीं संवादपदें पंतांनीं मोठ्या खुमारीनें रचलीं आहेत. ' भस्मभूषणा मदनशोषणा पशुपतिगंगाधरा, ध्यान कुणाचें करितां सांगा त्रिपुरांतक सुंदरा । ' असें पार्वतीनें विचारल्यावरून ' रामसखा हृदयस्थ ध्यातसे हिमनगप्रिय बालिके ' असें शंकरानें उत्तर दिलें. ज्याच्या नामानें हलाहल शांत झालें अशा रामाचें माहात्म्य शंकराच्या तोंडून प्रभाकरपंतांनीं फार सुंदर रीतीनें गाइलें आहे. त्यांतल्यात्यांत ' लक्ष्मी–पार्वती संवाद ' हें पद तर फारच बहारदार आहे.लक्ष्मी आपल्या पतीचें महत्त्व सांगून शंकराची निर्भर्त्सना करते, तर पार्वती विष्णूची निर्भर्त्सना करीत आहे अशा रीतीनें ह्या संवादाची रचना केलेली आहे. ह्या निर्भर्त्सनेंतील विरोधाभास आणि विरोधभक्ति फारच सुंदर आहे. ' नंदीवहन सर्पांचा सदोदित कारि कमरे लंगुटा । कसा आवडतो शंकर गिरजे सांग तुला मजप्रती । लक्ष जन्मिचें पातक म्हणउन पडलिस ऐशा हतीं ॥ ' असा लक्ष्मीनें टोमणा दिल्यावर पार्वती म्हणते, ' भोळा माझा सांब लक्षुमी उगाच निंदूं नका । आदी अंत नसे अगम्य सुख तें अप्राप्त ब्रह्मादिकां । सोळा सहस्र शत एक मुख्य तुम्ही अग्रजणी नायिका । कार्यवाह तो कृष्ण कसा करी पूर्ण मनोरथ सखा ॥...मच्छ कूर्म हा सूकर झाला सिंह वामन श्रीपती । जन्म गेला पहा अशा खालिं म्हणे लक्ष्मीस पार्वती ॥ ' परमेश्वराचें अनादि अनंत स्वरूप वर्णन करून त्याच्या दशावतारांचें चित्रणहि निर्भर्त्सनेच्या छायेंत केलें आहे. विरोधभक्ति म्हणतात ती ही. हें पद मोठें असून अशाच सरस स्थळांनीं युक्त असें आहे. म्हणूनच ' प्रभाकराच्या कवना गुणिजन हेत धरुन भावतीं ॥ ' असा आत्मविश्वास प्रभाकरपंत व्यक्त करतात. ' लक्ष्मणनिर्भर्त्सना ' ह्या काव्यांत सुवर्ण-मृग शोधण्यास गेलेल्या रामास पाहण्यासाठीं लक्ष्मण जाईना म्हणून

सीतेनें केलेली त्याची निर्भर्त्सना कवीनें वर्णिली आहे. पतिव्रतेच्या शब्दाची धार म्हणजे काय चीज आहे हें ह्या निर्भर्त्सनेंत आपणांस पहावयास मिळतें. रावणाचें मन वळविण्याचा प्रयत्न मंदोदरीनें कसा केला ह्याचें वर्णन 'रावण—मंदोदरीसंवाद' ह्या पदांत आलें आहे. सात्त्विक वृत्ति आणि तामसवृत्ति ह्यांचा संघर्ष ह्या काव्यांत वाचावयास मिळतो. 'भूपाळी कृष्णाची,' 'दृष्ट कृष्णाची,' 'कृष्णलीला' 'मुरली' अशीं सुप्रसिद्ध कृष्णचरित्रावरील पांचसहा पदें मोठीं हृदयंगम आहेत. ह्यांतील भक्तिरस सरस आहे. कृष्णलीला ही कविता हिंदींत लिहिलेली आहे. मुरलीचें सामर्थ्य पुढीलप्रमाणें पंतांनीं वर्णिलें आहे. 'तृण त्यागुन सर्वहि धेनु वत्सांविण घालिती पान्हा । स्तन आदरें वदनीं देतां पय प्राशन करिना तान्हा ॥' 'नव पल्लव तरुंना फुटती । गर-गर्जुन मधुकर उडती । अंतरिक्षीं तारे तुटती ॥' वरीलप्रमाणेंच 'अक्रूर,' 'द्रौपदीचा धावा,' 'कालिया-मर्दन,' 'सुदाम—चरित्र' हींहि कृष्णचरित्रावरचीं सुंदर पदें आहेत. ह्यांतील करुणरसाचा व भक्तिरसाचा परिपोष सुंदर आहे. 'आकाश-चुंबीत बुरूज दिसती ।— कनकाद्रीचे हुंडे भासती । अक्षई बरते वीर असती ॥... पाचुहिऱ्यांचे कळस चमकती । कळसांवरते हंस खेळती । खणोखणयांनीं पक्षी बोलती ॥' हें 'सुदामचरित्रा'तील द्वारकेचें वर्णन प्रभाकरपंतांची प्रभावी वर्णनशैली पटवितें. ह्याशिवाय 'काशीवर्णन,' 'पंढरीवर्णन' वगैरे वर्णनपर अशीं पांचसहा पदें पंतांनीं लिहिलीं आहेत.

प्रभाकरपंतांची पोवाडेरचना ऐतिहासिकदृष्ट्या व काव्यदृष्ट्या महत्त्वाची आहे. पेशवाईच्या काळांतील इतिहासावर आधारलेले पांचसहा पोवाडे आहेत. त्यांत 'सवाई माधवराव पेशवे—रंग,' 'सवाई माधवराव पेशवे मृत्यु, 'दुसरे बाजीराव पेशवे,' 'खर्ड्यांची लढाई' हे पोवाडे महत्त्वाचे आहेत. सवाई माधवरावांच्या कारकिर्दींत पुण्याला जी रंगपंचमी साजरी झाली ती इतिहासांत नमूद आहे.सवालाख रुपयांचा रंग त्या वेळेस पुण्यांत उडाला असें शाहीर म्हणतात. प्रभाकरपंतांनीं 'जसा रंग श्रीरंग खेळले वृंदावनि द्वापारांत । तसा रंग श्रीमंत खेळले कलियुगांत अति

आदरांत । ' अशी बहारदार सुरवात केली आहे. पोवाड्याच्या सुरवातीचा थाट प्रभाकरपंतांना फार बहारीचा साधतो. ' सवाईमाधवराव मृत्यु ' ह्या पोवाड्याची सुरवातहि त्यांनीं ' कमी नव्हते पृथ्वींत अवंतर प्राणी न्यायाला । औक्ष कसें कमि झालें सवाई माधवरायाला॥'अशी करुणाजनक केली आहे. 'खर्ड्याच्या लढाईचा पोवाडा'बराच मोठा असून सैन्य,सरदार, मोहिमा यांचें वीररसपोषक बहारीचें वर्णन पंतांनीं केलें आहे. सैन्याचे हाल त्यांनीं 'बहुत खराबी जहाली । मोहोऱ्यावरची फौज सैनिकांसहित रस्ते नाहली ॥ त्यांत उन्हाची काहली । रुपयाचें दीडशेर पाणी अशी कठीण वेळा वाहाली ॥ ' असे वर्णिले आहेत. ' लगी बाण बोथाड्या दाट। विनाड्स्याचा खळखळाट । अंबाऱ्यांचा मागें थाट । त्यामागें हुजुरात अचाट । सत्तर हत्ती पुढें जुनाट । मधून फुटेना मुंगीस वाट । अुगारिल्या जरी दुरूनी ताट । तरी तें खालीं कधीं पडेना ॥' असें सैन्यांच्या थाटाचें त्यांनीं थाटामाटानें वर्णन केलें आहे.दुसऱ्या बाजीरावाच्या जीवनावर पंतांनीं दोन दोन पोवाडे रचिले आहेत. ह्याशिवाय पेशवाईचें वृत्त संक्षेपानें सांगणारे पोवाडे पंतांनीं लिहिले आहेत. साध्वी अहिल्याबाई ह्या पुण्यशील स्त्रीचें चरित्र त्यांनीं एका पोवाड्यांत गायिलें आहे. त्यांनीं आपल्या वार्धक्यांत सयाजीराव गायकवाड, सरदार आंग्रे,नाना शंकर शेट ह्यांच्या उदारतेचें वर्णन पोवाड्यांतून वर्णिलें आहे.

प्रभाकरपंतांचें लावणी वाङ्मय बरेंच विस्तृत आहे. शंभर सव्वाशें लावण्या प्रभाकरपंतांच्या म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांतील कांहीं हिंदी भाषेंत लिहिलेल्या आहेत. ह्या लावण्यांत शृंगाररस हाच प्रमुख रस आहे.

स्त्रीसौंदर्याचें वर्णन हें तर या लावण्यांतील लावण्यच आहे.प्रत्येक कवनाशेवटीं 'गंगु हैबती म्हणे,' 'महादेव गुणिराज कवीचे छंद गोड अंगिकारा, ' प्रभाकराला म्हणे गंगाधर लाव फुलांचा लाल तुरा ' असे उल्लेख आहेत. त्यावरून गंगू हैबती, महादेव, गंगाधर हे प्रभाकराचें काव्य म्हणत असावेत असें दिसतें.

IRBK-0103391

IRBK-0103391